अभिराष्ट्रेण वर्धताम्



# माणूस

मराठी

मासिकपत्र

५० न. पै.

ऑक्टोबर

१९६१

नामवंत लेखकांची नामावली नाही —

बहुरंगी आर्टप्लेट्सच्या जाहिराती नाहीत —

शेकडो पृष्ठांचीं आश्वासनें नाहीत —

तरीहि ' माणूस 'चा साधा, आटोपशीर व सर्वांगसुंदर दिवाळी अंक घराघरांतून वाचला जाईल.
कारण ' माणूस 'ची निवड वैशिष्ट्यपूर्ण व समयोचित असते असा वाचकांचा विश्वास आहे.
पण आग्रहच असेल तर हीं दोन-तीन नांवें पाहा.

★ चित्रपटसृष्टींतील एक जादुगार कलावंत वॉल्ट डिस्ने ....

**प्र. न. जोशी**

★ ' दक्षिण कोरियाची राजधानी सउल ' एक मनोज्ञ प्रवासवर्णन ....

**प्रभाकर पाध्ये**

★ शिवाय वि. स. खांडेकर, व्यंकटेश माडगुळकर, अनंत काणेकर

इत्यादींचें निवडक लिखाण आहेच.

— वर्गणीसंबंधीं —

मासिकाची वार्षिक वर्गणी ५ रु.

किरकोळ अंक : ५० नये पैसे

पत्ता बदलावयाचा असल्यास नव्या पत्त्या-सोबत जुना पत्ताहि लिहावा.

पत्रव्यवहाराचा पत्ता

संपादक । व्यवस्थापक

'माणूस' मराठी मासिक पत्र

४१९ नारायण पेठ, पुणें २.


— अभिराष्ट्रेण वर्धताम् —





संपादक

श्री. ग. माजगांवकर

वर्ष १ लें) ऑक्टोबर १९६१ (अंक ५ वा


★

## लेखकांसाठी सूचना

(१) साहित्य पाठवितांना कागदाच्या एका बाजूस सुवाच्य अक्षरांत मजकूर लिहिलेला असावा.

(२) साहित्याच्या स्वीकृतीबाबत साधारणतः एक महिन्यांत निर्णय कळविला जातो.

(३) पुरेसें पोस्टेज सोबत नसल्यास नको असलेलें साहित्य लगेच निकालांत काढलें जातें.

या मासिकांत व्यक्त झालेलीं मतें 'माणूस' मासिकपत्राच्या चालकांचीं अधिकृत मतें असतातच असें नाहीं.


प्रकाशित लेख, चित्रें इत्यादींबाबतचे सर्व हक्क स्वाधीन.


★

## या अंकांत


- पुणे ही शूर नगरी .... ३
- जुन्या व नव्या चुली .... ९
- पदार्थ कसे टिकवावेत .... १२
- नवरात्र आणि विजयादशमी .... १३
- बुद्धिबळाच्या पटावर .... १४
- नवें वाचन—नवें चिंतन .... १५
- तेनसिंगची पट्टशिष्या कु. अदीति पंत .... १६
- पुरुषांच्या सहा जाती .... १८
- नेपोलियन : कांही स्मृतिरेखा .... २२


★

## पत्रव्यवहार

थोड्या अवधींत आपल्या मासिकाने वैशिष्ट्यपूर्ण असें स्वतःचें स्थान निर्माण केलें आहे यांत संशय नाही. प्रत्येक पान वाचनीय करण्याची आपली जिद्द प्रशंसनीय आहे. बहकलेल्या मराठी अभिरुचीला आपलें 'माणूस' ताळ्यावर आणेल असा विश्वास वाटतो.

—डॉ. प्र. न. जोशी

ऑगस्ट-सप्टेंबरचा 'माणूस'चा जोड-अंक सकाळीं मिळाला. दुपारला समग्र वाचून काढला. फारच समाधान वाटलें. अंकांत पानोपानीं नावीन्य दिसून आलें. फैजपूरची कहाणी अतिशय उद्बोधक आहे. 'पानशेत, नवमहाराष्ट्राची प्रयोगभूमि' हा खरा शास्त्रज्ञाचा व तत्त्वज्ञाचा लेख आहे. स्थापत्यविद्येकडे 'माणसा'नें कसें पाहावें याचें स्पष्ट दिग्दर्शन त्यांत आहे.

—डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे

या अंकाचा पहिल्यानेच डोळ्यांत भरणारा ठसठशीत विशेष म्हणजे त्याची समयज्ञता. ता. १२ जुलैला पुण्यावर कोसळलेली महापुराची आपत्ति व तीमुळें व्यथित झालेलीं मराठी वाचकांचीं मनें लक्षांत घेऊनच हा अंक संपादित केला आहे.... याच पद्धतीनें न दर्जानें संपादन अखंडितपणें चालू राहिलें तर हा खरा माणुसकी असणारा 'माणूस' अल्पावधींतच लोकप्रिय होईल यांत शंका नाही.

—डॉ. के. ना. वाटवे.

★

## पुरुषार्थ-ईर्ष्या निर्मिणारा 'माणूस'चा अंक

'माणूस' मासिकाचा ऑगस्ट-सप्टेंबरचा अंक सर्वांगसुंदर झाला आहे. संपादकांनी लेखांची निवड मार्मिकपणें व कौशल्याने केली आहे. एस्. बी. जोशी यांचा लेख, 'शूर नगरी पुणे' चा पहिला लेखांक, दि. बा. मोकाशी यांचें लंडनच्या हवाई हल्ल्याचें वर्णन करणारा अनुवाद— हीं वर्णनें वाचून पुणेकरांच्याच काय पण साऱ्या मराठी जनतेच्या मनांत पुरुषार्थाची ईर्ष्या निर्माण व्हावी आणि त्यांनी धीरोदात्तपणें आणि नव्या उत्साहाने कामाला लागावें.

इतका उत्कृष्ट अंक वाचकांच्या हातीं दिल्याबद्दल संपादकांना आणि लेखकांना धन्यवाद !

—एस्. एम्. जोशी.
('लोकमित्र'मधील अभिप्राय)

★

एकेक टपोरें मोतीं वेंचून त्यांचा एक सुंदर हार तयार करून तो गिऱ्हाइकाच्या ओंजळींत टाकावा, त्याप्रमाणे शेलके लेख जमवून या नव्या मासिकाने आपला हा तिसरा-चौथा जोड अंक वाचकांच्या हातीं दिला आहे. त्या अंकांतील संग्राह्य उतारे आम्हीं आमच्या वाचकांच्यासाठी द्यावयाचें योजिलें, तर समग्र अंकच उतरून द्यावा लागेल.

पुण्याच्या जलप्रलयावर आतापर्यंत लेखांचा पूर आला आहे, पण त्यासंबंधी येथे 'माणूस' जें बोलत आहे तें खरोखर विचारांना प्रेरणा देणारें आहे.

हें नवें मासिक महाराष्ट्र-शारदेच्या अंगणांत लौकरच चांगलें रांगूं-बागडूं शकेल अशी आम्हाला आशा आहे.

—दा. न. शिखरे
('महात्मा' मासिकांतून)

★

'माणूस'च्या प्रतिनिधींनी संग्रहित व संकलित केलेलें पानशेत धरणाच्या पुण्यांतील प्रलयाचें इतिहासकथन....

# पुणें ... ही शूर नगरी



लेखांक : दुसरा

—१—

धरण फुटलें ! धरण फुटलें !

संतापलेल्या अंबीने अखेर धरण फोडलें ! सतत तीन दिवस धडका देऊन अखेर तिने पानशेतचें धरण उडविलें ! चार वर्षे अविश्रांत मर मर कष्ट करून बांधलेलें हें धरण उडालें. गेल्या तीन दिवसांच्या त्याच्या अत्यवस्थ तब्येतींतून त्याला वांचविण्यासाठी सतत ५० तास तडफडणाऱ्या, जीव पाखडणाऱ्या पानशेतच्या शेकडो भगीरथांच्या डोळ्यादेखत धरणाला खिंडार पडलें आणि आर्त आरोळी उठली, 'धरण फुटलें ! धरण फुटलें !'

लोक सैरावैरा धावत सुटले. अकाळविकाळ, आक्रस्ताळी अंबी भयंकर चवताळून मातीच्या प्रचंड हत्तीची दाणादाण उडवीत होती. आक्रंदत होती. आपल्या लक्षावधि धारा एकदम खुपसून धरणाची छाती तिने फाडली होती आणि ती बेहोष-भरधाव सुटली होती. त्या तिच्या वेगाआवेगापुढे वादळाचेहि पंख खुंटले होते. पृथ्वीचें हृदय फाटलें होतें ! आकाशाने डोळे मिटले होते. किनाऱ्यांचे बंध सुटले होते. तुषारांचें धुकें उठलें होतें. धरण फुटलें होतें ! धरण फुटलें होतें !

पानशेतचीं मनें वेडीपिशीं झालीं होतीं. बुद्धि बधीर झाली होती. दृष्टि शून्य झाली होती. त्यांनी आजवर केलेलें त्यांच्या रक्ताचें पाणी त्यांच्या काळजांतून धो धो धो भळाळत होतें. धरण फुटलें होतें ! इतिहासाचें पान फाटलें होतें. पहाटेचें स्वप्न विरघळत होतें !

कैलास गदगदा हलविणाऱ्या रावणाहूनहि अफाट बळाचा जलासूर पुण्याचा बळी घेण्यासाठी गर्जत गर्जत तुफान वेगाने तुटून पडला होता !

—२—

आणि पुण्याच्या नभोवाणीवर मंगल प्रभात उमलली होती. सनईचे मंजुळ सूर रेशमाच्या लडीसारखे उलगडत होते. घड्याळांत सकाळचे सात वाजले होते. पुण्याचे विभागीय कमिशनर मा. शंकरराव मोहिते ७–२५ च्या डेक्कन क्वीननें मुंबईला निघाले. त्यांची नेहमीसारखीच सरकारी कामकाजाची कसलीशी मिटिंग-बिटिंग होती.

लोक चहा पीत होते. वृत्तपत्र वाचीत होते. पुण्याच्या सर्वच पत्रांत, 'पानशेत धरणास धोका नाही ! घाबरण्याचें कारण नाही !' अशा आशयाच्या ठळक बातम्या होत्या. आदल्याच म्हणजे दि. ११ जुलैच्या सायंकाळीं महापालिकेच्या सभेंत म्यु. कमिशनर मा. स. बा. कुलकर्णी यांचें झालेलें भाषण 'सकाळ' मध्ये होतें. ते म्हणाले होते, '....पानशेत धरणाचे कमी-अधिक पाण्यामुळे आपणास धोका होणार नाही, याची दक्षता घेण्यांत येत आहे. तज्ज्ञांचे मतें पानशेत धरणास धोका नाही !'

चहाचे पेले संपले. वृत्तपत्रें वाचून झालीं. लोक उद्योगाला लागले. डेक्कन क्वीन सुटली. मा. मोहितेसाहेब मुंबईला गेले. कुणी मंडईला

गेले. कुणी हिंडायला गेले. कुणी नळावर भांडायला गेले. कुणी स्नानगृहांत आंघोळीला गेले. बायका घरकामांत गुंतल्या. नभोवाणीवर नेहमीप्रमाणेच गोड गोड संगीत गुंजत राहिलं. मध्येंच एकदा पोलिसांची गाडी रस्त्यावरून सूचना देत गेली. 'नदीचें पाणी वाढण्याची शक्यता आहे ! तरी लोकांनी सावध राहावें !' ही ती सूचना. तरी पण कोणाच्याच मनांत चलबिचल झाली नाही. लोकांची कल्पना अशी की, नदीला थोडंफार पाणी येईल इतकंच. धोका बिका कांही नाही ! तसा धोका असेल तर रेडिओवरून आणि ध्वनिक्षेपकावरून आपल्याला धोक्याचं स्वरूप स्पष्टपणें सांगतीलच की ! अन् पेपरवाले गप्प बसतील का ? झट्कन् जादा अंक ओरडत येईल. पण रेडिओ गोड गातोय, सगळं सुरळीत चाललंय्, धोकाबिका काही नाही ! नदीचं पाणी चढलंच तरी चढून चढून किती चढेल ? १९५८ इतकं ! मुठेचा सर्वात मोठा पूर तो. म्हणजे घाबरून पळावं असं कांहीच नाही.

—आणि पानशेतचा जलासूर पुण्याचा फन्ना उडविण्यासाठी तुफान दौडत येत होता ! लोक संथपणें वागत होते ! त्यांना माहीतच नव्हतं की, एक प्रचंड धरण फुटलं आहे आणि सहाशे सत्तावन्न कोटि घनफूट पाण्याचा लोंढा पुण्यावर चालून येत आहे ! धरण फुटलंय् हें त्यांना कुणीं सांगितलंच नाही !

पानशेतचं खिंडार जास्त जास्तच विदारत होतं. सुरुवातीला सत्तर फुटाची जखम होती. आता ती एक हजार फूट फाटली होती. अक्षरशः समुद्रच खळबळून वाहत होता. खडकवासल्याचें धरण हां हां म्हणतां भरत चाललें होतें. खडकवासल्याच्या धरणावरील अधिकाऱ्यांची तारांबळ उडाली होती. ह्या धरणाच्या सर्व मोऱ्या उघडल्या होत्या. पाण्याचा लोट व दाब इतका भयंकर होता—त्या मोठ्या थोरल्या मोऱ्यांच्या बोगद्यांतून राक्षसी पिचकाऱ्याप्रमाणें पाणी फुंकरलें जात होतें. मुठा भयप्रद आवेशाने वाहूं लागली होती. दुथडी ! उसळत ! घुसळत ! फेसाळत ! रोंरावत !

सर्व मोऱ्या मोकळ्या सोडूनहि खडकवासल्याचं धरण तुडुंब भरलं. तेथील अधिकाऱ्यांच्या तोंडचं पाणी पळालं. हेंहि धरण आतां फुटणार की काय, ही धास्ती काळजांत धडधडूं लागली. ह्या धरणाची लांबी आहे ४८०० फूट आणि उंची आहे ९० फूट. आणि दर्या फुगला—फुगला, भयंकर झपाट्याने फुगला आणि खडकवासल्याच्या धरणावरून धो धो धो धबधबा कोसळण्यास सुरुवात झाली ! ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत ४८०० फूट लांबीचा अखंड धबधबा ! जणू नायगारा ! पाण्याच्या ह्या राक्षसी थैमानाकडे सुन्नपणें बघत राहण्यापलीकडे दुसरें कांहीहि करणें तेथील अधिकाऱ्यांच्या हातीं उरलें नाही.

खडकवासल्यापासून नदीच्या दोन्ही तीरावरचीं गांवें आधीच जीव घेऊन पळालीं होतीं. त्यांचीं घरें-वावरें मात्र मुठेला गवसलीं. त्यांचा चोळामोळा करीत मुठा पुण्यावर निघाली. ह्या खेड्यांतील सहाशे बत्तीस घरें तिने उडवलीं.

—आणि पुण्याला अजून कशाचा मागमूसहि नव्हता ! पुण्यांतल्या अनुभवी वयोवृद्धांना वाटत होतं की, पाणी आपल्या ओट्याला लागेल. फार फार तर जोत्याला लागेल ! पाण्याचा प्रलयकारी लोंढा कालियासारखा फणा पिंजारून सुसाट येत होता.

—३—

सकाळचे ९॥ वाजले होते. संभाजी पुलावरून बसेस वगैरे वाहनांची व नागरिकांची रहदारी चालू होती. नदीचें पाणी चढलें होतें, पण अजून डोळ्यांत भरण्याइतकें नव्हतें. लोक आपसांत बोलत होते. कुणी म्हणत, 'आज ओंकारेश्वराला स्नान होणार ! कुणी म्हणत, 'छे ! धरणांतलं जादा पाणी सोडून दिलेलं दिसतंय हें ! एवढ्याशा पाण्याने ओंकारेश्वराला कधी स्नान असतं ?'

म्हणजे धरण फुटलंय ह्याची कुणाला गंधवार्ताहि नव्हती. पहिल्या काळलाटेने खडकवासल्याच्या धरणावरून उडी घेतली आहे हें कुणालाहि ठाऊक नव्हतं !

नदी-किनारीं एका शिवालयांत एक वृद्ध तपोनिधि अध्ययनांत मग्न होता. मंदिराबाहेर पोरंसोरं नदीच्या पाण्याची गम्मत बघत होतीं. वयाची सत्तरी मुठेचे महापूर बघण्यांत त्या ब्राह्मणाने ओलांडली होती. त्याला आता त्या 'एवढ्याशा' चढल्या पाण्याचं कांहीच कौतुक नव्हतं. आश्चर्य तर त्याहूनहि नव्हतं. पोलिसांच्या मोघम इशाऱ्यांतहि त्याला कांही विशेष वाटलं नाही. एकदा-दोनदा त्याने बाहेर डोकावून पाहिलं, तेव्हा तर पोलीसहि नदीची गम्मत पाहत उभे असलेले त्याला दिसले ! हं ! म्हणजे गम्मत पाहत उभं राहण्याइतपतच पाणी येत आहे; म्यावं अन् आपली अमोल पोथ्या-पुस्तकं, लिखाण आणि दौतलेखणी घेऊन दूर पळत सुटावं असं कांही त्या ब्राह्मणाला वाटलंच नाही. कारण धरण फुटलंय् आणि थोड्याच वेळांत आपल्या घरादाराचा साफ विध्वंस होणार आहे हें त्याला ठाऊकच नव्हतं ! हा असा 'अज्ञानी' तपोनिधि कोण ?— विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव !

नव्या पुलापाशी परीट व परटिणी घाटावर धुणीं धुवीत होत्या. घाटाची एकेक पायरी बुडत होती. एकेक पायरी वरवर येत तीं माणसें धुणीं धुवीत होतीं. असं आज येड्यावानी कां म्हनून पानी चढतंय् हे त्यास्नी उमगच ना !

घरोघरचीं मुलेंबाळें जेवलीं. शाळेंत गेलीं. मोठीं माणसें कामावर गेलीं. घरीं उरलीं लहान मुलं, स्त्रिया आणि म्हातारे-कोतारे !

—मुठेचं पाणी झपाट्याने वाढत होतं. संभाजी पुलावर लोक गंमत बघत होते. नदीच्या अगदी कांठावर असलेल्या पुलाच्या वाडींतील लोकांना अजूनहि भविष्य कळलेलं नव्हतं ! अंजनीबाई भोसले तिथेच राहत (होत्या !). त्यांच्या घरीं फक्त दोनच माणसं. त्या आणि त्यांची वृद्ध आई. अंजनीबाई जेवल्या. प्लॅस्टीकची जाळीदार पिशवी घेऊन नोकरीवर गेल्या. घरीं एकटी आई चुलीपासलीं कामंधामं करीत राहिली. अशीच गोष्ट अनेकांची. श्री. दीनानाथ टाकळकर त्यांतच ! ह्यावेळीं सकाळचे १०॥ वाजले होते.

संभाजी पुलाच्या कमानी निम्म्या बुडाल्या ! सबंध बुडाल्या ! आणि—आणि एकच कल्लोळ उसळला ! एक महाप्रचंड लाट आक्रंदत, फेसाळत येतांना दिसली ! आली—आली—आली अन् धडाडकन् पुला-

वर आदळली! एकदम प्रचंड भुईनळ्यांसारखे उंचच उंच फवारे उडाले. लोकांची व वाहनांची धावपळ उडाली. पुलावर पाण्याचा सडा पडला. पोलिसांनी रस्ते रोखून रहदारी बंद करण्यास सुरुवात केली. शिट्यांची फुर्रऽ फुर्रऽ सुरू झाली. तेवढ्यांत एक बस पुलावरून डेक्कनकडे भरधाव गेली. तेवढ्यांत आणखी एक बस पुलावर आली. पाव हिस्सा पूल ओलांडते न ओलांडते तोंच आणखी एक रावणलाट भरवेगाने येतांना त्या बसमधल्या व इतर लोकांनीहि पाहिली! भयंकर आक्रोश उठला. बस पुढेच धावत होती! ही बस आता त्या लाटेंत सापडणार, सापडणार—! आली—लाट आली! तेवढ्यांत त्या बस-ड्रायव्हरने इतक्या शिताफीने अन् वेगाने गाडीला रिव्हर्स दिला की, अर्धा मिनीट उशीर झाला असता तर अनेकांसह ती बस मृत्यूच्या दाढेंत गेली असती! सीताफळबागेंतील डॉ. कोटूरकरांच्या वहिनी त्या बसमध्ये होत्या. बस मागे सटकली आणि ती लाट पुलावरून उड्या टाकीत गेली! क्षणांत संभाजी पूल बुडाला! पुलाच्या ऐल व पैल रस्त्यावर पाणी मुसंड्या देत घुसलें. लोकांचे डोळे खडाखड उघडले गेले. सर्वत्र एकच दाणादाण उडाली. लोक आक्रोश करीत घराघरांतून बाहेर पडण्याची घाई करूं लागले. कुणी जेवतां जेवतां, कुणी उघडेबोडके, अंगावरच्या एका वस्त्रानिशी! सर्वत्र एकच ओरडा उठला, 'पाणी आलें! पाणी आलें!' रस्त्या रस्त्यांवर तरुण, प्रौढ पुरुष, पोलीस, बारा-चौदा वयाची मुलें आणि ज्याला गप्प बसवेना असा प्रत्येकजण, लोकांना घराबाहेर काढण्यासाठी, 'बाहेर पडा! पळा पळा! पाणी भयंकर वाढतंय्!' असें ओरडत, घराघरांत शिरून सांगत धावत होता. नव्या पेठेंत श्री. दगडोबा गांजवे यांनी तर लोकांना अक्षरशः धक्के देऊन बाहेर काढायला सुरुवात केली. असाच प्रकार अनेकांनी सुरू केला होता. लोक अत्यंत अत्यंत बेसावध होते. नदीकांठच्या सर्व रस्त्यांवर मुठेने पहिली पायघडी घळऽळकन् उलगडली. दुसरी लाट आली. तिने अनेकांच्या घरांतच पाऊल टाकलें. पाणी विलक्षण झपाट्याने चढूं लागलें.

याचवेळीं एक प्रेतयात्रा लकडीपूल स्मशनांत जाण्यासाठी आली. प्रेतवाहक समोर पाणी पाहून चकीतच झाले. अलका टॉकीजपाशी ते आले आणि एक तुफानी लाट—लाट नव्हे, मृत्युच तो!—समोरून धुसफुसत येतांना पाहून प्रेतवाहकांनी तें प्रेत तसेंच खाली टाकून वाट फुटेल तिकडे पळ काढला! आता त्या प्रेताचा अंत्यविधि? हुंः ऽ अनेक जिवंतांचा अंत्यविधि करायला निघालेल्या मुठेला तें प्रेत जड नव्हतें!

एक लाख वस्तीच्या किनाऱ्यावर दुथडी हाहाःकार उडाला होता. मुलेंबाळें घेऊन पाण्यांतून भराभरा चालतांहि येत नव्हतें. पाण्याला ओढ यमपाशासारखी होती!

विठलवाडीचें पुंडलिकाचें उंच मंदिर हां हां म्हणतां बुडालें! वरचा फक्त हातभर कळस बुडायचा राहिला. जणू केवळ अंगुली पाण्यावर काढून पुंडलीक पांडुरंगाला खुणेने सांगत होता, 'मी इथे आहें! मी इथे आहें!'

मुठेच्या दोन्ही कांठावरचे लहानमोठे असंख्य वृक्ष भराभर पाण्यांत मोडून कोसळत होते. ताडीचीं झाडें पार वाहून जात होतीं पण मोडत नव्हतीं. दोन प्रचंड आम्रवृक्षांची जोडी शेजारीं शेजारीं उभी होती. त्या दोघांच्या मधून तुफानी प्रवाह वाहत होता व एक ताडीच्या उंच झाडावर आपटत होता. त्या माऱ्याने तें ताडीचें झाड अक्षरशः मोरपिसासारखें थरथर थरथर करीत होतें. अखेर ते दोन्ही आम्रवृक्ष कोसळले. ताड लाटेखाली बुडाला.

पाणी संभाजी पुलावर बारा फूट चढलें! वाटेंत जें दिसेल तें वेढीत, ओढीत, पाडीत पाणी धावत होतें. दोन्ही तीरावरचीं घरें धडाधड पडत होतीं. पेशवाईंतील प्रचंड वाडे कोसळत होते. धुळीचे लोट उसळत होते. आर्त किंकाळ्या उठत होत्या. ओंकारेश्वरापुढची भव्य चिरेबंदी दीपमाळ केळीच्या नाजुक खुंटासारखी ओढली मुठेने! संभाजी पुलाजवळचें खंडोजीबाबांचें विशाल सुंदर विठ्ठल मंदिर तिने काड्यांच्या पेटीसारखे भिरकावून दिलें. नव्या पुलाच्या पूर्वेस पात्रांत असलेलें सायसंगीन शिवमंदिर आठवतं का? गेलीं दीडशे वर्षे पुराशी झुंजत होतं तें. कधी चिरासुद्धा निखळला नाही त्याचा. पण मुठेने आपलें बळ एकवटून पार ठोकरून लावलें तें! सहाशें वर्षांपूर्वीची शेखसल्ला दर्ग्यांतील मशीद मुठेने उधळून दिली. तीन-तीन, चार-चार मजली हवेल्या पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें कोसळल्या. एवढा बळाचा बळवंत शनिवारवाडा! त्याचींहि दोन भिंताडें गडगडलीं. लहानसहान घरझोपड्यांची काय कथा! पुलाची वाडी, सबंध वाडीच्या वाडी उद्ध्वस्त! नारायण पेठेची किनारपट्टी उद्ध्वस्त! शनिवार पेठेंतील पेशवाई वस्ती उद्ध्वस्त! कसबा पेठ उद्ध्वस्त! मंगळवार उद्ध्वस्त! संभाजी पूल, संगम पूल, वेलस्ली पूल, उद्ध्वस्त! उद्ध्वस्त! उद्ध्वस्त!

कोर्टासमोरील पंधरा लाख रुपयांचा सरकारी धान्यसाठा उद्ध्वस्त! एकोणीस हजार तीनशे चौऱ्याहत्तर संसार उद्ध्वस्त!

—४—

पाणी इतक्या झपाट्याने चढत होतें की, आत्ता पावलाशी तर क्षणांत गुडघ्याशी! आत्ता गुडघ्याशी तर लगेच कमरेशी! पाणी घरांत घुसूं लागल्यावर लोक भराभरा बाहेर धावत सुटले. कित्येकजण आपल्या घराच्या दुसऱ्या-तिसऱ्या मजल्यावर जाऊन बसले. त्यांना वाटलें इथे पाणी येणारच नाही!

घरांचे निम्मे मजले बुडाले. अजूनहि हजारो लोक पाण्यांत अडकले होते. पाणी वाढतेंच आहे असें दिसल्यावर दुसरे मजलेवाल्यांची तारांबळ उडाली. अन् मग ह्या सर्वांचे प्राण वांचविण्यासाठी पुण्यातील तरुणांनी जीं साहसें केलीं, ज्या युक्त्या केल्या, ज्या करामती केल्या त्या लोकविलक्षणच! पूरग्रस्त भागांतील व सुरक्षित भागांतील असंख्य तरुण-प्रौढ माणसें लोकांचे प्राण वांचविण्यासाठी धावत निघालीं. आपण होऊन धावत निघालीं. पक्ष, जाती, धर्म इत्यादि भेद आपोआप भिरकावले गेले. माणूस माणसासाठी धावत सुटला. माणसाचा जीव घेण्यासाठी पाणी दौडत होतें. एका महाभूताशी मानवाची शर्यत आणि झुंज एकदमच लागली. आणि मग अनेक प्रकृतीचीं, संस्कृतीचीं आणि विकारांचीं माणसेंहि आपापली भूमिका वठवावयास सज्ज झालीं. अगदी न कळत! आपआपल्या स्थायीभावानुसार! अन् एकूण त्या साऱ्या तुफान कल्लोळांत नदीच्या ऐल व पैल तीरावर मनुष्य स्वभा-

वाचें जें दुथडी दर्शन घडलें तें खरोखरच विलक्षण, अलौकिक, दिपविणारें, रडविणारें, हसविणारें, संताप आणणारें, अभिमानाने भारावून टाकणारें आणि लाजेने मान खाली घालायला लावणारेंहि! मानव मानव म्हणतात तो कसा दिसला अन् कसा वागला ह्या महासंकटांत? जशी ज्याच्या अंतःकरणाने खूण केली तसा तो वागला!

अशा त्या मानवाचें हें दर्शन! ही गाथा!

—५—

पाणी एकदम घरांतच घुसलं! आता वांचवायचं तरी काय काय? सगळंच प्यारं! माणसं खरं प्रेम कशावर करतात तें इथ दिसलं. पाणी पुलाच्या वाडींत शिरलें. श्री. आनंद परांजपे नांवाचे एक तरुण घाईघाईने एका घरांत शिरले. त्यांच्या मागोमाग पाणीहि उंबरठ्यांत आलें. त्या घरांत फक्त एकच स्त्री होती. तीहि विधवा! ती गोंधळून रडवेल्या स्थितींत थरथरत उभी होती! घाईनें श्री. परांजपे तिला म्हणाले, "बाई, बाहेर निघा! पैसा-अडका असेल तर तेवढाच घ्या! इतर सामानाचा मोह सोडा! हें घर आत्ता बुडेल!"

ती बाई रडूं लागली. श्री. परांजपे पुन्हा तिला म्हणाले, "चला लौकर बाहेर! तुम्हांला काय घ्यायचंय् बरोबर? मी देतों झटकन् काढून! सांगा लौकर!"

तेव्हा त्या बाईने भिंतीवरील टांगलेल्या एका फोटोकडे बोट करीत म्हटलें, "कांही नको! तेवढा फोटो काढून द्या!"

अन् तेवढा फोटोच घेऊन ती बाहेर पडली. तो तिच्या नवऱ्याचा फोटो होता!

अलका टॉकीजशेजारील '१७५ नारायण'मधील विठ्ठलमंदिरांत भसकन् पाणी शिरलें. देवळांत राहाणारीं बरींच माणसें पळालीं, पण कांही अडकलीं. जीं अडकलीं तीं भराभरा देवळावर चढलीं. श्री. जगन्नाथ सोनार हे त्यांतच होते. एकूण दहाजण. त्यांत एक स्त्री! हीं माणसें वांचलीं. पण खाली देवळाच्या सभामंडपांत काय घडत होतें? पाणी गळ्याइतकें चढलें होतें. इथेच राहणारा शंकर नथू परदेशी नांवाचा पंचावन्न वर्षांचा आंधळा गृहस्थ आपल्या ऐंशी वर्षांच्या आईला पाण्यांतून बाहेर आणण्यासाठी धडपडत होता! आईचें नांव जमनाबाई. परदेशीने आईला आपल्या पाठीवर घेतलें होतें. तो पोहत पोहत त्या तुडुंब सभामंडपांतून बाहेर पडण्यासाठी हात मारीत होता. सर्वत्र अंधार होता! कारण डोळेच आंधळे होते! पाणी चढत होतें. तो कसाबसा सभामंडपांतील गरुडापर्यंत आला. तेवढ्यांत एक लाट देवळांत जोराने घुसली. नाका-तोंडांत पाणी गेलें. जोराचा हिसका बसला आणि पाठीवरची आई निसटली! गेली! डोळे ताणताणून तो मुलगा आपल्या आईला शोधूं लागला. हाका मारूं लागला. हाताने लाटा चापसूं लागला, पण हाय! त्याचें मातृसुख मुठेने केव्हाच हिरावून घेतलें होतें! महाप्रलयांत आसवांची भर पडली! श्री. शंकर परदेशी याच्या संसारांत त्याला फक्त एकच नात्याचें माणूस होतें. तेवढी आईच केवळ!

परदेशी अखेर देवळांतून बाहेर आला. पोहत पोहत कडेच्या एका भिंतीला लागला. भिंतीवर तो चाचपडत चालला आणि त्याच क्षणीं त्याच्या अंगावर एक साप चढला! देवळावरच्या लोकांनी तें पाहिलें. ते ओरडले, 'शंकररावांच्या अंगावर साप!' पण सुदैवाने साप पाण्यांत पडला व वरच्या लोकांनी हाताचा आधार देऊन परदेशीला देवळावर घेतलें. कांही वेळाने तो साप पुन्हा आला! भवती अथांग दर्या आणि एक मोठा साप! मृत्यु नाच करीत होता, पण सापाला देवळाच्या शिखरावर चढतां येईना. अखेर तो साप जवळच्या उंबरावर गेला.

ओंकारेश्वराजवळच्या एका पेशवाई भव्य वाड्यांत एक खानदानी आसामी आपल्या देवघरांत बसलेली होती. स्वारी सोवळं नेसून देवाची यथासांग पूजा करीत होती. एवढ्यांत बाहेर कल्लोळ उसळला! 'धावा, पळा! पाणी आलं!' वाड्यांतून लोक भराभर बाहेर धावले. कुणीतरी देवघरांत येऊन सांगितलें, 'आण्णासाहेब, उठा! पूर आला! भयंकर पूर!'

क्षणभर आण्णासाहेबांनी भवती पाहिलें. बाहेर भयंकर तुफान उसळलें होतें. क्षण क्षण मोलाचा होता. आण्णासाहेबांनी देव ताम्हनांत घेतले, हात जोडले आणि ते उठले. तसेच सोवळें नेसलेले आण्णासाहेब देव घेऊन घराबाहेर पडले! थोड्याच वेळांत मुठेने तो पेशवाई वाडा उद्ध्वस्त करून टाकला. आज त्या वाड्याचा उत्तर-दरवाजा व वरच्या महालाचा सांगाडा फक्त उभा आहे. ह्या वाड्यांतील आसामी म्हणजे सरदार आण्णासाहेब रायरीकर!

नारायण पेठेंत नदीकांठीं राहत असलेल्या संगीततज्ज्ञ रानडे यांना मुठेने वेढलें. श्री. रानडे यांनी अत्यंत श्रम व अभ्यास करून संगीतावर लेखन केलं होतं. मुठा सबंध इमारतच गिळणार असें दिसूं लागतांच रानडे यांनी आपलें लिखाण फक्त उचललें! पागोट्याप्रमाणे तें दप्तर त्यांनी डोक्यावर बांधलें आणि खवळलेल्या त्या अथांग महाप्रलयांत ते उतरले! पोहत जाऊन वांचवायचें! काय? प्राण? अहं! लेखन! विद्या! तें वांचवतां वांचवतां प्राणहि वांचवावयाचे. चाळीस वर्षांनंतर श्री. रानडे पुरांत पोहावयास उतरत होते. वाहत येणाऱ्या असंख्य सामानसुमानाची धडक चुकवीत चुकवीत, जागजागीं घरांचा आधार घेत घेत चार तासांनी ते आपल्या ग्रंथासह सुखरूप जमिनीला लागले.

घराघरांत पाणी शिरूं लागलें, तसें तें दुकानांतहि शिरूं लागलें. प्राण वांचविण्यालाहि वेळ अपुरा होता. हातांत घेऊन पळतां येईल येवढंच कांही तरी उचलून पळत सुटणें भाग होतें. अन् मग अनेक व्यापारी आपल्या हिशेबाच्या चोपड्या घेऊन पळत होते! दुकान बुडायचं तें बुडणारच, पण निघारी उधारी तरी बुडूं नये!

एक मारवाडी नोटांचीं पुडकीं घेऊन पळत होता, पण अखेर मुठेने त्याला गाठून ठार मारलेंच.

पाणी चढलें आणि शाळा चालकांनी आपआपल्या शाळा सोडून दिल्या. तीं लहान लहान मुलें मोकळीं सुटलीं. कुणी पाणी बघायला धावलीं. कुणाचीं घरें पुराच्या भागांत होतीं तिकडे तीं जाऊं लागलीं आणि मग त्यांतून किती तरी करुण कथा घडल्या.

एक सायकलवाला गृहस्थ गुडघाभर पाण्यांतून सायकल हाताने

रेटीत चालला होता. एवढ्यांत त्याला मागून मुलांच्या रडण्या-ओरडण्याचा आवाज आला. त्याच क्षणीं एक भली मोठी लाट कमरेला भिडली. त्या गृहस्थाने सायकल सावरीत मागें वळून पाहिलें. दोन लहान शाळकरी मुलें छातीइतक्या पाण्यांत धावरून ओरडत होतीं. त्या गृहस्थाने एकदम त्या पोरांकडे झेप घेतली. सायकल सोडून दिली. दोघा मुलांना बगलेंत घेऊन त्याने भराभरा बाहेर काढलें. मुलं वांचलीं. सायकल गेली!

स्वतःचीं घरें नष्ट झालीं तरीहि दुसऱ्याचे संसार व माणसें वांचवावयास सबंध दिवसभर धडपडत असलेले कितीतरी लोक होते. आमच्या प्रत्यक्ष परिचयाचेहि अनेक आहेत त्यांत.

मंगळवारांतील एक वकील श्री. रहमान यांनी मोटरच्या ट्यूबचा उपयोग करून किती तरी कुटुंबें पांच पांच पुरुष अथांग पाण्यांतून काढून बाहेर आणलीं.

श्री. केशवराव हिरवे नांवाचे एक नागरिक जोगेश्वरी रस्त्यावर राहतात. ऑफिसांतून परतत होते ते. पुराच्या पाण्याने त्यांना दारूवाला पुलाजवळ अडवलें. हा पूर कशाचा अन् ह्या भलत्या ठिकाणीं हा आलाच कसा हें त्यांना समजेना, पण लोक पुरांत अडकलेले त्यांनी पाहिले. त्यांनी एकदम पाण्यांत उडी घेतली. माणसांना वांचविण्यास सुरुवात केली. पांच तास हा गृहस्थ पाण्यांत हीं कामें करीत होता. श्री. हिरवे हे दमेकरी आहेत. अशक्त आहेत. नेहमीच आजारी असतात, पण त्यांच्या अंतःकरणाने त्यांना दुखणें विसरून आज हें काम कर असं खुणावलं असावं!

अशीं उदाहरणें किती तरी.

हजारोंना संकटांत मदतीचा हात मिळाला. ते वांचले. पण असेहि कित्येक अभागी होते की, त्यांच्यापर्यंत मृत्यूशिवाय कोणाचाहि हात पोहोचूं शकला नाही! मेलीं तीं माणसें! त्यांतील कांहीजण असे मेले—

पुलाच्या वाडीतील एका देवळाचा पुजारी, पुराचा वेढा पडला म्हणून देवळाच्या शिखरावर चढला. ह्या पुजाऱ्याचं नांव गुरुबा. शिखरालाहि पाण्याचा वेढा पडला. कोणीहि सखा सांगाती जवळ नव्हता. पाणी चढत चाललें! आपण नक्की बुडणार हें तो समजून चुकला. पैल तीरावरून हें करुण चित्र दिसत होतें. पण हळहळण्याशिवाय कोणीहि कांही करूं शकणार नव्हता. शिखरावर लाटा आपटत होत्या. गुरुबा मृत्यूच्या जिभेच्या शेंड्यावर उभा होता! त्याने हात जोडलेले होते. अगदी शांत उभा होता तो! जणूं तो नदीच्या पात्रांत संध्या करीत होता! आणि अखेर एका लाटेने तें शिखर उडविलें! हात जोडलेला गुरुबा हात जोडूनच उडाला! गेला!

'नारायण १५३।१' मध्ये राहणारे श्री. हिराचंद गुजराथी यांचें सहा माणसांचें कुटुंबच इमारतीसकट मुठेंत पडलें. सुपांतले दाणे वैरले जावे तसें हें कुटुंब पडलें. अवघ्या पुण्याला ही करुणकथा माहीत आहे. त्यांतील श्री. हिराचंद हे शेवटच्या बुडत्या क्षणापर्यंत कांही वेगळेच वागत होते, जगत होते. तोंडाने रामनाम घेत होते. त्यांचा एक पाय प्लॅस्टरमध्ये होता. ते त्यामुळे पंगू होते. कांहीहि करून मला वांचवाच असा आग्रह त्यांनी मदतगारांना केलाहि. सर्वांचे प्रयत्न विफल झाले आणि हें कुटुंब अखेर गेलें! पण पाण्यांत पडल्यावरहि श्री. हिराचंद हे हात वर करून मदत करणाऱ्यांना नमस्कार करून बुडाले! जणू कांही त्यांनी अगदी ठरवूनच जलसमाधि घेतली!

अनेकांना तर मुठेने तोंडसुद्धा उघडूं दिलें नाही. इलेक्ट्रिक कंपनींतील श्री. पानसे, सोमवार ३० मधील गोकुळगीर, शिवाजीनगर ७१७ व ७१८ मधील बायकामुलें अशींच मुक्याने मेलीं. मृत्यूने एकदम झडप घातली. कांठावरचीं घरें म्हणजे मुठेच्या ओठावरचीं घरें. मुठा आपली कराल जिभ दोन्ही ओठांवरून फिरवीत होती. अनेक घरें कोसळत होतीं. भोवरे उठत होते. हलक्या फुलक्या वस्तु उसळी घेऊन वाहत होत्या. माणसें तडफडा हात हलवीत 'वांचवा, वांचवा!' असा आक्रोश करीत होतीं. पाण्यांत पडत होतीं. एखादी उसळी घेऊन त्यांचीं डोकीं पाण्यावर क्षणभर दिसत होतीं. अन् पुढच्याच क्षणीं सारा देखावा लुप्त होत होता!

डेक्कन जिमखान्यावरचें 'कॅफे डेक्कन क्वीन' असेंच उडालें. त्याचे मालक व आणखी एक इसम लाटेंत मिसळले. लाटेने त्यांना फराफरा ओढीत न्यायला सुरुवात केली, पण त्यांचें आयुष्य अजून संपलेलें नव्हतें. हे दोन्ही जीव एका झाडाला अडकले व लटकले! तें झाड त्यांनी घट्ट धरून ठेवलें. वाहत येणारीं लाकडें, पत्रे आणि वाटेल तें सामान त्यांना चाटून ओरबाडून जात होतें. दुपारीं बारा वाजल्यापासून रात्रीं साडे आठपर्यंत ते दोघेजण त्या झाडाला मिठी मारून बसले होते. अखंड साडे आठ तास! माणसाला जीव किती प्यारा असतो बघा! एरवी सतत साडे आठ तास पराच्या गादीवर बसून नाचगाणं ऐकायला बसा म्हणून म्हटलं तरी ते बसतील का?

ते ज्या झाडाला बिलगले होते तें झाड डॉ. मधु-मालती गुणे यांच्या रुग्णालयालगतचें होतें. रात्रीं पाणी उतरल्यावर डॉ. मधुमालतीबाईंनी त्या दोघांना त्या अवघड बगाडावरून काढून आणलं. त्यांच्या जखमांवर उपचार केले. रात्रभर आपल्या रुग्णालयांतच त्यांना राहून घेतलं. दुसऱ्या दिवशीं त्यांनी त्यांची त्यांच्या घरीं पाठवणी केली. स्वतः डॉ. सौ. गुणे यांच्या इमारतीचे दोन मजले पाण्यांत बुडाले होते. 'कॅफे डेक्कन क्वीनचा' मात्र जागेवर मागमूसहि उरला नव्हता!

'शनवार २२५' मधील श्री. रमाबाई पाटणकर यांचें सर्वस्व गेलें, तरीहि ही बाई सुस्काराहि न सोडतां भुकेल्या पुरग्रस्तांच्या मुखीं चार घास घालण्यासाठी व त्यांच्या निवाऱ्यासाठी धडपडत होती. त्यांचा मुलगा मधुसूदन हाहि लोकांना पुरांतून वांचविण्यांत व मदत करण्यांत सबंध दिवसभर गुंतलेला होता. डॉ. मधुमालती, श्री. रमाबाई, पार्वतीबाई पेठकर आणि सौ. सरस्वतीबाई आपटे यांच्यासारख्या किती तरी जणींनी या कालांत असंख्यांचं आईपण घेतलं होतं.

—६—

अशी कधी कोणीं कल्पना तरी केली होती का की, तान्ह्या मुलांपासून सत्तरींतल्या वृद्धांपर्यंतचीं माणसं—त्यांत बायकासुद्धा तीन तीन मजली घरांच्या छपरावरून वानराप्रमाणे हिंडतांना दिसतील! ह्या छप्परावरून त्या छपरावर अन् तिथून दुसऱ्या छपरावर! मुठेनें ही सर्कस त्यांना करायला लावली. घराचे सर्व मजले बुडाल्यावर

पोटमाळ्यावरून बत्त्याने छपराचा भाग उघडा करून लोक छपरावर चढत होते अन् सुरक्षिततेसाठी हातां-पायांवर चालत चालत दुसऱ्या एखाद्या घरावर जात होते. केवढें विलक्षण दृश्य हें! म्हाताऱ्या आजी-आजोबांना ही अशी वानरचाल करतांना पाहून भीति वाटायची, कौतुक वाटायचं, काळजांत भडभडून यायचं अन् नकळत खुदकन् हसूंहि यायचं! आजीबाई छपरावर! पण हसूं आलं की, आपलंच मन आपल्यावरच डोळे वटारून, ओठ चाऊन म्हणायचं, 'शूः ऽऽ! चांगलं नाही असं हसणं!'—तरी पण हसूं यायचंच!

घराच्या छपरावरच काय, पण झाडावरसुद्धा अशीं माणसें बसलीं होतीं!

'नारायण १६०' ह्या घराचं नांव होतं 'गंगापूर'. ह्या 'गंगापूर'च्या रांगेतील घरें भराभर पाण्यांत विरघळत होतीं. 'नारायण १५९' मध्ये पंढरपूरचें अकलूजकर कुटुंब पाहुणे आलें होतें. श्री. अकलूजकर यांचें वय सुमारे सत्तर. त्यांना पॅरलिसीस् झालेला. त्यामुळे निम्में अंग गेलेलें. सुमारे पंधरा दिवसांपूर्वी ते पुण्याला आले होते. अगदी नुकतेंच त्यांचें कसलेंसें ऑपरेशन झालें होतें. डॉक्टरांनी महिनाभर पूर्ण विश्रांति घेण्याचा व हालचाल न करण्याचा सख्त सल्ला त्यांना दिला होता, म्हणून ते 'नारायण १५९' मध्ये विश्रांतीसाठी राहिले होते. त्यांच्याबरोबर त्यांच्या वृद्ध पत्नी, शरच्चंद्र नांवाचे चिरंजीव, सून व सहा वर्षांची नात असा परिवार होता. श्री. शरच्चंद्र यांच्या एका हातांत कांही थोडें व्यंग आहे.

महापुराचें हें संकट अचानकच उद्‌भवलें. अकलूजकर मंडळी खालच्या मजल्यावरून वरच्या मजल्यावर गेली. पाणी वाढतच होतें. इमारती पडत होत्या. हें पाहून त्यांना आपल्या घराबद्दलहि संशय आला! म्हणून त्या घराला लागून असलेल्या 'गंगापूर' इमारतींत गॅलरीवरून उतरून ही सर्व मंडळी गेली. त्यांनी 'गंगापूर'मध्ये पाऊल टाकलं आणि थोड्याच वेळांत खरोखरच तें (नारायण १५९) घर पाण्यांत कोलमडलें! समोरच असलेली 'लॉंग लाईफ' नांवाची इमारतहि धुड्मकन्ऽ कोसळली! 'लॉंग लाईफ'चें आयुष्य संपलें!

पाणी चढतच होतें. 'गंगापूर'मध्ये यावेळीं सुमारे सतरा माणसें बसलेलीं होतीं. पहिला मजला बुडून दुसऱ्या मजल्यावर पाणी आलें म्हणून सर्वजण तिसऱ्या मजल्यावर गेले, पण लौकरच तिसऱ्या मजल्यावरहि पाणी आलें! तेव्हा ही सर्व मंडळी माळ्यावर व तेथून छपरावर चढली! भराभर घरें कोसळतांना दिसत. सर्वांच्या काळजांत चर्रऽ होई. हेंहि घर कोसळलें तर—? अशी कांहीतरी कल्पना डोक्यांत चमकून जाई. जवळच अनाथ हिंदु महिलाश्रमाच्या छपरावर अशाच अनेक मुली मुठींत जीव धरून बसलेल्या होत्या.

श्री. अकलूजकर स्वतः सर्व बाजूंनी किती लुळे-पांगळे झाले होते. पण सर्वांत शांत व गंभीर होते तेच. स्वतःहोऊन कांहीहि हालचाल करण्याचें बळ त्यांच्यांत नव्हतें. ह्या सतरा जणांत सौ. दीक्षित, सौ. सुशिला खासनीस, ह्या दोघींचीं दोन अगदीं तान्ही मुलें, शिवाय इतर चार लहान मुलें, चिटणीस नांवाच्या एक प्रौढ महिला, शशिकांत नातू नांवाचे एक तरुण (पण पोहतां न येणारे!) अन्य कांही पुरुष व संपूर्ण अकलूजकर कुटुंब अशी मंडळी होती. पण यांत आणखी एक तरुण होते. त्यांचें नांव विठ्ठल वासुदेव मोडक. वास्तविक ते मदतीला म्हणून आले. पाणी तुफान चढलं. अन् इथेच अडकले. श्री. मोडक हे फारच धीट होते. भवतालचीं भयंकर दृश्यें पाहून सर्वांचीं मनें हादरत होतीं. त्यांना ते धीर देत होते.

या 'गंगापूर' ला लागूनच एक लिंबाचें झाड होतें. (अर्थात् तें अजूनहि आहेच.) हें झाड तीनचतुर्थांश पाण्यांत बुडलेलें होतें. अन् ह्या लिंबावर एक ठेंगणासा, लहानशी तुरळक दाढी असलेला, पंचविशींतला एक तरुण बसलेला होता. या तरुणाचं नांव अरुण श्रीपाद भट. हे भटजी लोकांना मदत करायला आले आणि वेगवान पाण्याच्या गराड्यांत अडकले, म्हणून ते या लिंबावर चढले. तूर्त मुक्काम तिथेच! त्यांना 'गंगापूर' वरच्या ह्या सर्वांची अवस्था दिसत होती. इतकेंच नव्हें तर, 'गंगापूर' हि केव्हा कोसळेल याचा नेम उरलेला नव्हता! तें पाहून श्री. भट त्या सर्वांना म्हणाले की, 'तुम्ही सर्वजण ह्या लिंबाच्या झाडावर या! तुमच्या छपराला लागून असलेल्या या फांदीवरून या!'

अहो कसं शक्य आहे येणं! दोन तान्हीं मुलं, लहान पांच मुलं, चार स्त्रिया, त्यांत एक म्हातारी आणि सर्वांगाने गलितगात्र झालेले वृद्ध अकलूजकर! कसं यायचं त्यांनी झाडावर? अन् तिथे बसायचं तरी कसं त्यावर? पण तरीहि भटांचं निमंत्रण अत्याग्रहाचंच! एवढा कां त्यांचा आग्रह? त्याचं कारण फार भयंकर होतं. ज्या छपरावर ही माणसें बसलीं होतीं, त्या छपराखालची एका बाजूची भिंत हळू हळू ढासळत असलेली भटांना दिसत होती! 'गंगापूर' कोसळणार ही त्यांना खात्री होती, पण 'तुमच्या खालची भिंत कोसळतीय्' म्हणून सांगितलं तर सर्वांची भीतीनेच दाणादाण उडेल, म्हणून तसं न सांगतां ते फक्त आग्रह करीत होते. एवढ्यांत अवघी सात घरें टाकून असलेलें '१५३।१ नारायण' हें तीन मजली घर कोसळलें व श्री. हिराचंद गुजराथी यांचें सहा जणांचें कुटुंब मुठेने जिवंत गिळलें!

श्री. भटांनी वाहत जाणारी एक खुर्ची वरच्यावर पकडली. ती फांद्यांच्या बेचक्यांत बसविली. शेजारी हयात असलेल्या एका घरांत लिंबावरूनच गेले. तेथून त्यांनी एक बाकडें आणलें. तेंहि झाडाच्या फांदींत कैची साधून बसविलें आणि आग्रह धरला की, 'आता तरी याच! न जाणो तुमची 'गंगापूर' पडेल!'

श्री. वि. वा. मोडकांनीहि सर्वांना धीर व प्रोत्साहन दिलें आणि काय आश्चर्य! चार महिन्याच्या तान्हुल्यापासून पासष्ट वर्षांच्या वृद्धेपर्यंत सर्वांना जपून आणून ह्या दोघा तरुणांनी लिंबावर बसविलें! अखेर श्री. अकलूजकरांनाहि त्यांनी आणलें व बाकावर बसविलें! केवढें विलक्षण दृश्य हें! ज्यांना डॉक्टरने हलूंसुद्धा नका म्हणून बजावलं होतं ते अर्धांगगलित वृद्ध गृहस्थ भर महापुरांत लिंबाच्या झाडावर! लेकुरवाळ्या आया, बाया, वृद्धासुद्धा तिथेच! खालून मुठाबाई तुडुंब वाहत्येय्! अधून मधून मुलें रडताहेत,जरा समजूत घातली की, शांत होताहेत. भवताली भीषण मजा दिसते आहे!

हीं माणसें लिंबावर होतीं, त्याचवेळीं पडलेल्या 'लॉंग लाइफ' पाशी अडकलेल्या एका फळकुटावर सात-आठ कोंबड्या ओळीने बसून पाण्यावर हेलकावे खात होत्या!

(पान २७ वर पहा)

# उपयोगी संसार...

- यंत्रें येतीं घरां
- स्वयंपाक घरांतील उपसूचना
- आमचे सण समारंभ
- बुद्धिबळाच्या पटावर
- नवें वाचन-नवें चिंतन

## • जुन्या व नव्या चुली

आक्टोबर महिन्यांत घरोघरीं दिवाळीची तयारी सुरू होईल. घराघरांतून तळणाचे वास येऊं लागतील, पण हीं कामें काढावयाच्या आधी कांही गृहिणींचे मनांत नवीन स्टोव्ह किंवा इलेक्ट्रीक शेगडी किंवा गॅसची चूल घ्यावी असें असेल. अशा कांही जुन्या व नव्या चुलींची माहिती दिली तर ती आवडेल असें वाटून हा लेख लिहिला आहे.

आज बाजारांत विजेच्या शेगड्या पांच रुपयांपासून पन्नास रुपयांपर्यंत मिळतात. या शेगड्या हजार वॅटपासून दोन हजार वॅटपर्यंतच्या असतात. यापैकी स्वयंपाकाच्या दृष्टीने पंधराशे वॅटची शेगडी तरी लागते. ज्या स्वस्त शेगड्या आहेत त्यांचेवर रंगाचा स्प्रे मारलेला असतो. हा रंग अर्थातच टिकत नाही. या शेगड्यांचा सर्व पत्रा किंवा नटबोलट पुढे इतके गंजतात, की शेगडीचें भूत दिसूं लागतेंच, पण दुरुस्ती करतांना हे गंजलेले भाग निघतां निघत नाहीत.

जास्त किंमतीच्या शेगडीच्या पत्र्यावर रंग न मारतां एनॅमेलभांड्याप्रमाणें थर दिलेला असतो. या शेगड्या टिकण्यास पुष्कळच चांगल्या असतात. त्यांची किंमत पन्नास रुपयांचे जवळपास आहे.

विजेच्या बहुतेक सर्व शेगड्या उघड्याच असतात. उघड्या म्हणजे तारेचं जें वेटोळं लाल होऊन उष्णता मिळते तें वर असतं व या वेटोळ्यापासून साधारण दोन-तीन सुतांवर भांडं बसतं. भांड्यांत पाणी घेऊन तें या शेगडीवर ठेवतांना निथळणारे थेंब या वेटोळ्यावर पडतातच, पण त्याशिवाय ही वेटोळ्याची तार जर थोडी वर आली तर भांड्याला हात लावतांच धक्का बसण्याचा संभव असतो. यासाठी इलेक्ट्रीकच्या हलक्या शेगड्या घेऊं नयेत.

अशा रीतीने भांड्याचा संबंध या तापणाऱ्या तारेशी यऊं नये म्हणून यावर हॉटप्लेट म्हणून एक पत्रा बसवलेली शेगडीहि विकत मिळते. या हॉटप्लेटची किंमत ६५ रु. च्या जवळपास पडते. शगडीची किंमत शिवाय.

इलेक्ट्रीक शेगडी अतिशय वीज खाते. आपले घरांतले दिवे साधारण २५ ते ६० वॅटचे असतात. त्यावरून ही शेगडी किती खाते हें कळेल. पंधराशे वॅट शेगडी लावली तर एका तासाचं तिचं विजेचं बिल दीड युनीट म्हणजे सहा आणे होईल. युनीट म्हणजे एक हजार वॅट वीज एक तास जळणं. अशा युनीटचा भाव पुण्यांत चार आणे तर कांही लहान गांवांतून तो आठ आण्यांपर्यंत आहे.

म्हणून शेगडी वापरावयाची असेल तर रोजच्या दिव्याच्या मीटरवर न लावतां त्यासाठी पॉवर मिटर घेतलें तर तें स्वस्त पडतें, कारण पॉवरमीटरवर विजेचा युनीटचा भाव ११ न. पैसे आहे. (टॅक्ससह) पण एका शेगडीसाठी पॉवरमीटर घेण्याचा खर्च परवडणार नाही. विजेचा पाण्याचा बंब, रेडिओ, विजेची पंपाची मोटार, अशा वस्तु वापरांत असल्या तरच पॉवरमीटर बसवण्याचा खर्च—अंदाजें शंभर—योग्य हिशेबांत बसतो. २१ न. पैसे युनीट या भावाने रोज विजेच्या शेगडीवर तीन तास स्वयंपाक केला तर महिन्याचें बिल जवळजवळ वीस-पंचवीसपर्यंत जाईल.

सगळ्या दृष्टीने विजेवरची शेगडी सतत स्वयंपाकाला वापरणें सोईचें नाही. झटकन् कांही करून घेण्यासाठी मात्र ती उपयोगी पडेल.

### गॅसच्या चुली

गॅसच्या चुलीविषयीं आता तुम्ही खूप ऐकलं असेल. या चुलीचें थोडक्यांत वर्णन म्हणजे—दोन फूट उंच व एक फूट व्यासाचा खूप जाड पत्र्याचा सिलेंडर किंवा भांडं असतं. यांत गॅस भरलेला असतो. एका नळींतून हा गॅस त्यासाठीं खास बनवलेल्या चुलीच्या तळाशी नेतात. मध्ये एक किल्ली ठेवलेली असते. ती फिरवून गॅस हवा तसा कमी-जास्त करतां येतो. गॅस सोडतांच तो चुलीवरच्या लहान लहान भोकांतून वर येतो. काडीने तो पेटवतांच पेटतो—हीच गॅसची चूल.

या सिलेंडरमध्ये एकतीस पौंड गॅस असतो व सतत पेटती ठेवली तर ११० तास तो गॅस पुरतो. या गॅसचें प्रेशर पन्नास पौंड असतें. आपल्या स्टोव्हमध्ये वीस पौंड प्रेशर असतें.

म्हणजे या गॅसच्या चुलीचे दोन भाग पडतात. एक गॅसचा सिलेंडर व दुसरा—चूल. गॅसचें सिलेंडर कोपऱ्यांत ओट्यावर कुठेहि ठेवतां येतें. तशीच ही चूलहि जमिनीवर किंवा ओट्यावर कुठेहि मांडतां येते.

ही चूल घ्यायला खालीलप्रमाणे खर्च येतो.

| | |
|---|---|
| सिलेंडरसाठी डिपॉझीट | २५·०० |
| गॅसची किंमत | १८·५० |
| चूल | ५५·०० |
| | रु. ९८·५० |

चुलींत सिंगल व डबल अशा दोन तऱ्हा व त्यांतहि जाती आहेत. सिंगल चुली ४५–५२ व ५५ रु. अनुक्रमें–तर डबल ८०-९०-१२५- अनुक्रमें. एकशे पंचवीसची चूल एनॅमलने मढवलेली तर बाकीच्या रंग दिलेल्या असतात.

स्टोव्हप्रमाणे या गॅसच्या चुलीवर बर्नेलसारखी प्लेट असते. ती साधारण चार वर्षांने बदलावी लागते व तिची किंमत १० रु. पडते. रबरी ट्यूब बदलावी लागल्यास तिचा भाव दहा आणे फूट पडतो.

या चुली वापरणं खर्चाच्या दृष्टीनं कसं पडतं हें पाहण्यापूर्वी या चुलींतल्या वापरलेल्या गॅसविषयीं कांही सावधगिरी घ्यावी लागते ती सांगतों.

चुकून जर चुलीची किल्ली उघडी राहिली, तर लगेच गॅसचा वास येतो व त्यावरून किल्ली उघडी राहिल्याचें कळतें. जर किल्ली उघडी राहून, दरवाजे-खिडक्या बंद करून तुम्ही बाहेर गेलांत तर आंत शिरतांना एकदम शिरूं नये. रुमाल तोंडावर धरून प्रथम सर्व खिडक्या उघडाव्यात. हा गॅस जड आहे त्यामुळें तो जमिनीपासून फूटभरच उंच पसरतो व तो खाली बसला की, गॅमेक्झीनचा स्प्रे मारल्यासारखा रंग जमिनीवर राहतो. गॅस मोकळा राहिला असला तर तो बाहेर जाईपर्यंत आगपेटी ओढूं नये. गॅस पेट घेतो.

या गॅसची उष्णता स्टोव्हच्या अडीचपट असते.

सोईच्या दृष्टीने पाहिल्यास गॅस-चूल ही वापरण्यास स्वच्छ, आणि कमींत कमी त्रासाची. स्टोव्हप्रमाणे काकडा लावण्याचा, पंप करण्याचा, भडकण्याचा त्रास नाही. रेडिओचा नॉब फिरवावा तसा नॉब फिरवून याची ज्वाळा वाटेल तेवढी कमी-जास्त करतां येते. याचा आवाज होत नाही आणि उष्णता जास्त असल्याने स्वयंपाक जास्त लौकर होतो.

## गॅसच्या चुलीचा खर्च

खर्चाच्या दृष्टीने मात्र स्टोव्ह, कोळसा, लाकूड यापेक्षा हिला खर्च थोडा जास्त वाटतो. एक तर सुरुवातीलाच शंभर रुपयांचा हिला खर्च आहे. खर्चावर नजर ठेवावी लागते अशा मध्यम वर्गीयांना ही चूल अजूनहि खर्चाची वाटेल असें वाटतें. मात्र जिथे नवरा-बायको दोघे नोकरीला आहेत, जागा लहान आहे, अशा ठिकाणीं वेळ व पसारा वांचण्याच्या दृष्टीने ही चूल उपयोगी आहे.

सिलेंडरमधील गॅस ३१ पौंड असतो व किंमत साडे अठरा रुपये. पौंडाला जवळ जवळ साडे नऊ आणे पडतात. एकशेदहा तास हा गॅस जळतो. चार माणसांच्या कुटुंबाला बंब, शेगडी, स्टोव्ह या सर्वांचे जळणाचा महिन्याचा खर्च तेरा रुपये धरला तर गॅसच्या शेगडीला हा खर्च ( सर्व कामासाठी गॅस वापरला असें धरलें व रोज ४ तास शेगडी वापरावी लागेल या हिशेबाने ) महिना साडे-अठरा रुपये पडतो.

जर सर्व कामासाठी गॅस वापरावयाचा असेल तर एका शेगडी-वर भागावयाचें नाही. दोन शेगड्या घ्याव्या लागतील. शेगडीची किंमत पन्नास रुपये आणखी वाढते. ( डबल शेगडीची किंमत नव्वद रुपये पडते. ) तेव्हा या चुली वापरावयाच्या असतील तर जळणावर पूर्वीपेक्षा जास्त खर्च करावा लागेल हें धरूनच वापराव्या.

आर्थिकदृष्ट्या खर्चाचा ज्यांना प्रश्न नाही त्यांनी या चुलींचाच काय, पण गॅसवर बंबाचें पाणी तापवतां येतें त्याचाहि फायदा घ्यावा. बंबाऱ्याखाली ही चूल बसवतां येते.

मोठ्या बंगल्यांत, एका मोठ्या सिलेंडरवर ठिकाठिकाणीं पाईप टाकून अधिक चुलीहि पेटवतां येतात.

आज गॅसच्या सिलेंडरची किंमत जी अठरा रुपये आहे ती कमी झाली, दहा-बारा रुपयांपर्यंत आली–तर मात्र या चुली घरोघरीं होण्यास हरकत नाही.

## स्टोव्ह व त्याची निगा

आज आपण स्टोव्ह वापरतों. त्या आधी वातीचे स्टोव्ह होते व आताहि आहेत. अशा वातींच्या स्टोव्हवर स्वयंपाकाचें काम अर्थातच फार मंद होतें व या जातींच्या स्टोव्हना रॉकेलहि जास्त लागतें, पण त्यांचा दुसरा एक चांगला उपयोग आहे. हा स्टोव्ह पेटवायला कंदिलासारखा झटकन् पेटतो, म्हणून जेव्हा थोडें पाणी किंवा दूध किंवा कपभर चहा झटपट हवा असेल, तेव्हा हा उपयोगी पडतो. लहान मूल घरांत असतां किंवा कुणी आजारी असतां याचा उपयोग फार होतो. यांच्या किंमती साधारण दहा रुपयांपासून सतरा रुपयां-पर्यंत आहेत.

पंप करण्याचा स्टोव्ह स्वयंपाक व तळण वगैरेस चांगला. याच्या किंमती आज चोवीस रुपयांपर्यंत आहेत. अठरा ते वीसपर्यंतहि स्टोव्ह चांगला मिळतो. कांही जातीच्या स्टोव्हवर स्वयंपाकहि चांगला होतो.

स्टोव्हकडून आपण काम भरपूर करून घेतों तशी त्याची निगाहि राखायला हवी. नाहीतर नीट पेटण्यापूर्वी तो दहा-वीस वेळां भडकतो, पांच-दहा वेळां त्याला पीन करावी लागते. स्टोव्हची निगा म्हणजे तो आंतून-बाहेरून स्वच्छ राखणें. बाहेरून घासून-पुसून ठेवल्याने बाहेरची बर्नेलची काजळी किंवा स्टोव्हच्या अंगावरचा मळ उडून भोकांत जात नाही. आंतील स्वच्छतेसाठी रॉकेल गाळून घालणें हा नियम न चुकतां पाळावा. रॉकेल गाळून घालीत असल्यावरहि दर आठ दिवसांनी सर्व रॉकेल काढून घेऊन तो आंतून पाण्याने स्वच्छ करावा. पाणी आंत ठेवून पंप करून पाण्याचा फवारा रॉकेलप्रमाणे वर येऊं द्यावा. पाण्याने स्वच्छ करतांना पंपाची नळी बाहेर काढून घ्यावी म्हणजे वॉशर खराब होत नाही. मग पाणी संपूर्ण काढून तो उघडा ठेवावा व पूर्ण कोरडा होऊं द्यावा व नंतरच रॉकेल भरावें.

बर्नेलमध्ये काजळी न होण्यासाठी तो स्पिरीटच्या काकड्यावर पेटवावा. काजळी काढून जर स्टोव्हला वारंवार पीन करावी लागू लागली तर रॉकेल भरल्यावर त्यांत कार्बन टेट्राक्लोराईडचे चार थेंब टाकावे, हें केमिस्टकडे औषधावर मिळतें.

स्टोव्हने होणारे अपघात आपण नेहमी ऐकतों. स्टोव्ह भडकल्याने हे अपघात होतात आणि स्टोव्ह भडकण्याचें पुष्कळसें कारण स्टोव्ह स्वच्छ राखले जात नाहीत हें असतें.

आपण जेव्हा पंप करतों, तेव्हा रॉकेलची चिळकांडी बर्नेलच्या भोकांतून उडते. आपण आधी बर्नेल काकड्याने तापवतों. या तापण्यामुळे रॉकेलच्या चिळकांडीचा उष्णतेने गॅस होतो. स्टोव्ह चांगला तापला की, बर्नेलची उष्णता कायम राहते व रॉकेलचा गॅस होत रहातो, पण बर्नेलमध्येच केर अडकला तर बर्नेल थंड होतो व गॅस न होतां रॉकेलची चिळकांडी उडून भडका होतो. म्हणून स्टोव्ह काकड्याने नीट तापून देऊन मगच पंप करावा.

स्वच्छतेप्रमाणेच आणखी एक काळजी घ्यावी. स्टोव्ह कुठेहि थोडा लीक होत असला तर हयगय न करतां तो दुरुस्त करून आणावा. तसेंच स्टोव्हला तळणासारखें सतत तासन्‌तास काम पडणार असेल, तर टाकीवर ओलें फडकें ठेवण्यास विसरूं नये. त्याने स्टोव्हची टाकी तापत नाही. स्टोव्हची टाकी फार तापण्यानेहि धोका असतो.

### चुलींची निगा

एक लक्षांत ठेवलें पाहिजे की, अगदी लाकूड घालतों अशा चुलींपासून तो गॅसच्या चुलींपर्यंत सर्वांची रोजच्यारोज निगा ठेवल्यास या वस्तु चांगल्या टिकतात.

पूर्वी स्वयंपाक आटोपला की, चूल तशीच टाकून बाई जात नसे. चुलींतील निखारे, राख, लाकडं काढून चूल पाण्याने किंवा शेणाने सारवून मगच चुलीचें काम संपत असे. चुली अशाने जास्त टिकत, एवढेंच नव्हे तर त्या उष्णताहि चांगली देत.

पण जुन्या चुलींएवढी काळजी आपण आज नव्या चुलींचीहि घेत नसतों. उष्णता जास्तींत जास्त मिळावी म्हणून निरनिराळ्या चुली निघाल्या, पण उष्णता आली की, काजळी किंवा गंज आलाच. तो जर काढला गेला नाही, तर जास्त जळण खर्च होतेंच, पण चूलहि खराब होते. बंब, चूल, शेगडी, स्टोव्ह, गॅसची चूल सर्वांचा वापर संपला की, त्यांच्यावरून हात फिरवावा व त्या स्वच्छ करून ठेवाव्यात. वरण, भात, भाजी, इ. चे पडलेले डाग तसेच ठेवूं नयेत. पाणी नसतांना बंब पेटत ठेवूं नये. भांडें नसतांना स्टोव्ह पेटता ठेवूं नये. गॅसच्या चुलींचेंहि तेंच.

स्टोव्ह शक्यतोंवर स्पिरीटच्या काकड्यावर पेटवावे. त्यासाठी स्पिरीटचा लायसन्स मिळतो.

### मालक, बिऱ्हाडकरू व विजेचें बिल

वीजेच्या बिलाबाबत मालक व बिऱ्हाडकरू यांत नेहमी तंटे ऐकूं येतात. खरें पाहिलें असतां दोघांनी बसून बिऱ्हाडकरू किती वीज जाळतो याचा विचार करून हिशेब केला, तर तंट्याचें कारणच उरणार नाही.

समजा बिऱ्हाडकरू चाळीस वॉटचे दोन दिवे आणि एक रेडिओ वापरतो आहे. दोन दिव्यांचे ऐंशी वॉट झाले. दिवे दिवसांतून चार तास जळत राहिले, तर महिन्यास एकशे वीस तास जळतील. तासांचा व वॉटचा गुणाकार करा.

८० × १२० = ९६०० हे वॉट अवर झाले.

आतां १००० वॉट अवर म्हणजे युनीट होतें. म्हणजे सुमारें साडे नऊ युनीट वीज या दोन दिव्यानं महिन्यांत खर्च होते. युनीटचा जो कंपनीचा दर असेल त्यावरून दोन दिव्यांचा खर्च काढतां येईल.

रेडिओचेंहि तेंच. साधारण रेडिओ ४५ ते ६० वॉटचा असतो. त्यांतून रेडिओ मेकॅनिककडून खात्री करून घ्यावी व वर सांगितल्या-प्रमाणे रोज रेडिओ किती तास चालतो याचा अंदाज काढून महिन्यांत किती चालेल हें काढावें.

दि. बा. मोकाशी


# टापटिपीचा संसार....



म्हटला की 'बरशेन' हवाच

आपणहि एक बसवून घ्याच !

⁕ स्वच्छ हरकामी व सुटसुटीत स्वयंपाकासाठी आधुनिक सुखावह इंधन (जळण) ⁕ नेहमीचेच भाव

* तावडतोब डिलिव्हरी

आपली ऑर्डर खालीलपैकी कोणत्याहि शाखेकडे नोंदवा.

## एल्. डी. भावे अँड सन्स

बर्मा शेल ' बरशेन ' एजंटस्

हिंदविजय सिनेमासमोर, पुणें ४. टे. नं. ७११८

— कॅम्प शाखा —

जिल्हा लोकलबोर्ड बिल्डिंग ससून जवळ चौक, टे. नं. ३७८५

— शहर शाखा —

बाजीराव रस्ता, महाराष्ट्र बँक कचेरीसमोर, टे. नं. ७३११

तसेंच आमच्या खालील " सब् एजन्टस् "कडेहि

" बरशेन " तावडतोब मिळेल.

१ ) हिरालाल ए. मेहता — २० न्यू बझार–खडकी

२ ) श्रीधर जी. दाते — स्टेशन रोड–बारामती

३ ) बी. जी. भुरके अॅण्ड सन्स्, १४१ पॅलेस स्ट्रीट–सातारा सिटी

# ★ पदार्थ कसे टिकवावेत ?

आजकाल पाकशास्त्रावरचीं बरींच पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. तसेंच निरनिराळ्या मासिकांतूनहि विविध प्रकारच्या पाकक्रिया प्रसिद्ध होतात, परंतु स्वयंपाकघर म्हटलें की, त्यांत केवळ पाकसिद्धीशिवायहि अनेक अडचणी येतात. उदा. आमटी खारट झाल्यास काय करावें? दूध जास्त दिवस कसें टिकवावें! नवीन लग्न झालेल्या मुलींना कित्येक सोपे उपाय माहीत नसतात. एवढेंच नाही तर अनुभवी गृहिणींनाहि सर्वच गोष्टी माहीत असतात असें नाही. याकरतां स्वयंपाकघरांत उपयोगी पडेल अशी संकलित केलेली माहिती खाली दिली आहे.

सौ. कुमुदिनी रानडे

एकादा पदार्थ उदा० ज्याला रस आहे अशी भाजी किंवा आमटी यांत चुकून मीठ जास्त पडल्यास काय करावें हा मोठाच प्रश्न पडतो. अशावेळीं त्या पदार्थांत उंसाचे करवे घालून तो पदार्थ परत शिजवला असतां मीठ कमी होतें. अशा पदार्थांत कोळशाचा फुललेला निखारा टाकावा व लगेच काढून घ्यावा. असें २–४ वेळां केल्यानेहि मीठ कमी होतें. उंसाचे करवे व कोळसा पदार्थातील मीठ शोषून घेतात.

मटण शिजवतांना तें कित्येकवेळां लवकर शिजत नाही. तें लवकर शिजण्यासाठी शिजतेवेळीं कच्च्या पोपईच्या फोडी अगर करवंटीचा तुकडा किंवा सबंध सुपारी घातली असतां लवकर शिजतें असा अनुभव आहे.

## ......तेल व तूप

जर शेंगदाण्याच्या तेलाला वास येत असेल तर तें चांगलें तापवून त्यांत एक तमालपत्र व थोडीशी साखर टाकून दोन ते तीन मिनिटें चांगलें उकळावें. नंतर तें तेल फडक्यावर गाळून घ्यावें म्हणजे तेलाचा वास जातो. आपल्याकडे पुष्कळदां तळणीचें तेल किंवा तूप उरतें. अशावेळीं तें गरम करून चांगलें गाळून घ्यावें व पोळ्या करतांना मध्यें घडीला लावावें. पोळीला तळणीच्या तुपाचा अगर तेलाचा मुळीच वास येत नाही. तळणीचें तूप स्वच्छ करण्याची आणखीहि एक पद्धत आहे. प्रथम तूप गरम करून फडक्यावर गाळून घ्यावें. नंतर त्यांत तुपाएवढेंच पाणी घालून तें १०–१५ मिनिटें चांगलें उकळावें. नंतर पातेल्यावर झांकण ठेवून तें भांडें रात्रभर तसेंच ठेवावें. दुसरे दिवशीं पाण्यावर तुपाचा थर जमलेला दिसेल. तुपाला एक छोटें भोक पाडून खालील पाणी ओतून द्यावें व अशाप्रकारे स्वच्छ केलेलें तूप परत उपयोगांत आणावें.

पुष्कळदा वरून तुपाची फोडणी द्यावयाच्या कोशिंबिरीसारख्या पदार्थांवर थंडीमध्ये फोडणी दिल्यावर कांही वेळाने तुपाचा थर जमतो, अशावेळीं फोडणीचें तूप गरम केल्यावर त्यांत चिमूटभर मीठ टाकावें, म्हणजे पदार्थावर तुपाचा थर जमणार नाही. अनारसे तळतांना ते तळून झाल्यावर त्यांतील तूप निथळून जावें म्हणून आपण ते चाळणींत अगर रोळींत उभे करून ठेवतों. त्याऐवजी एका ताटलींत डाळीचें पीठ दाबून थापावें. नंतर त्यावर तळलेले अनारसे ठेवावे म्हणजे पीठ त्यांतील तूप ताबडतोब शोषून घेतें व अनारसे एका मिनिटांत कोरडे होतात.

कढवलेलें तूप बरेच दिवस राहिल्यास त्यास एक प्रकारचा वास येतो, जर तुपास वास न येतां तें जास्त दिवस टिकवायचें असेल तर लोणी कढवतांना १ शेर लोण्यांत १ चहाचा चमचा मीठ आणि चिमूटभर हळद टाकून तूप जरा जास्त कढवून गाळून ठेवावें. कोरड्या हळदीच्या पुडीपेक्षा ओल्या हळदीचा रस २–४ थेंब टाकल्यास जास्त चांगलें.


## .......दूध व अंडीं

उन्हाळ्यांत दूध बरेचवेळां नासतें. दूध न नासतां टिकवायचें असेल, तर खालील उपाय केल्यास दूध नासत नाही. दूध चांगलें तापवून थंड झाल्यावर, दोन शेर दूध असल्यास दोन थेंब सरसूचें तेल व एक सबंध वाळलेली लाल मिरची त्यांत टाकून ठेवल्यास ३६ तास दूध नासत नाही. ३६ तासांनी त्यांतील मिरची काढून टाकून दूध परत चांगलें तापवावें. गार झाल्यावर त्यांत परत दोन थेंब सरसूचें तेल व एक वाळलेली लाल मिरची टाकल्यास आणखी ३६ तास दूध टिकतें, अशा प्रकारे करत गेल्यास ३।४ दिवस दूध टिकवतां येतें.

अंडीं बरेच दिवस राहिलीं, की खराब होतात. तीं जास्त दिवस टिकण्यासाठी खालील उपाय करावा—

एका बादलींत अर्धा शेर पाणी व अर्धा शेर खायचा चुना घालून तें मिश्रण चांगलें घोटून त्यांत १५ ते २० मिनिटें अंडीं बुडवून ठेवावीं, नंतर अंडीं बाहेर काढून तशींच सुकवावीं, अशीं अंडीं महिनाभर चांगलीं राहतात.

मासळी जास्त दिवस टिकवायची रीत अशी—मासळी पाण्यानें न धुतां त्यावरील खवले काढून टाकावे, १ शेर मासळीस २ मोठे चमचे सरसूचें तेल, १ चहाचा चमचा मीठ, १ चहाचा चमचा हळद व १ चहाचा चमचा साखर एकत्र मिसळून तें मिश्रण मासळीस सगळीकडून चांगलें चोळावें. नंतर मासळी जाळीच्या भांड्यांत जाळीच्या कपाटांत ठेवावी. मासळी वापरायच्या वेळीं प्रथम गरम पाण्याने धुवून घ्यावी. अशा रीतीने मासळी खराब न होतां ती ३–४ दिवस टिकते.



# नवरात्र आणि

या मासांतील हिन्दुमात्रांच्या घराघरांतून साजरे होणारे महत्त्वाचे सण म्हणजे नवरात्र व विजयादशमी. पं. महादेवशास्त्री जोशी यांच्या 'भारतीय संस्कृति कोश' या आगामी ग्रंथांतील ह्या सणांसंबंधीची कांही उपयुक्त माहिती येथे सादर करीत आहोंत. परंपरेचा हा उजाळा सुशिक्षित कुटुंबांना आवडेल अशी कल्पना आहे.

# विजयादशमी

नवरात्र : या उत्सवाचा प्रारंभ आश्विन शु॥ प्रतिपदेस होऊन नवमीपर्यंत तो चालतो. याला शारदी नवरात्र म्हणतात. पहिल्या दिवशीं घटस्थापना होते. काळ्या मातीचें चौकोनी स्थंडिल करून त्यावर भात किंवा गहूं पेरतात. त्याला शेज असें म्हणतात. याच स्थंडिलावर घटस्थापना करून त्यावर रोज एक किंवा प्रत्येक दिवशीं वाढत्या संख्येने फुलांच्या माळा बांधतात. कुळाचार असेल त्याप्रमाणे सप्तशतीचा पाठ, ब्राम्हण, सवाष्ण आणि कुंवारीण यांचें भोजन, अष्टमीच्या रात्रीं होम इत्यादि गोष्टी करतात. क्वचित् दशमीस घट उठवतात. स्थंडिलावर उगवलेल्या धान्याचे अंकुर देवीला वाहतात आणि देवीला बोकडाचा बळीहि देतात. ज्यांना बोकड बळी द्यायचा नसेल ते उडीद मिसळलेल्या भाताचा किंवा कोहळ्याचा बळी देतात. देवीपुढे नऊ दिवस नंदादीप तेवत ठेवतात. कोणी कोणी नऊ दिवस एकभुक्त राहतात.

गुजरात आणि काठेवाड या प्रांतांत नवरात्राचा विधि सामान्यतः ढीलप्रमाणे आहे. योग्य जागीं भिंतीला पांढरा रंग देऊन त्यावर शेंदुराचा त्रिशूळ काढतात. हा त्रिशूळ म्हणजे दुर्गादेवीची प्रतिमा असें समजतात. त्रिशुळाखाली मातीच्या ढिगावर गहूं, बाजरी पेरतात. मध्यभागीं कलश स्थापून त्यावर नारळ ठेवतात. मातीच्या भांड्यास छिद्रें पाडून त्यांत दिवा ठेवतात. खेड्यापाड्यांत झाडांना आणि खांबांना दिवे टांगतात. त्याभोवताली बायका-मुली गरबा गीतें गात फेर धरतात. आठव्या दिवशीं विसर्जन होतें. चतुर्थी आणि अष्टमी या तिथींना बायका उपास करतात.

बंगालमध्ये हा उत्सव फार मोठया प्रमाणावर करतात. त्याला दुर्गापूजा असें नांव आहे. नऊ दिवस उत्सव होत असतो. देवालयांतून गाण-बजावणें, खेळ आणि दीपोत्सव इत्यादि गोष्टी थाटामाटाने होतात. शेवटच्या तीन दिवसांत रात्रीं देवीची महापूजा बांधतात. अष्टमीचा दिवस सर्वांत मुख्य समजतात. देवीप्रीत्यर्थ पशुबलीहि होत असतात. दहाव्या दिवशीं देवीची मूर्ति वाजत-गाजत नेऊन तिचें जळांत विसर्जन करतात व एकमेकांचें शुभ चिंततात. रजपूत लोक नवरात्रांत देवीच्याऐवजी तोफेची पूजा करतात व तिच्यावर कुंकवाने त्रिशुलाचें चिन्ह काढून तिच्याभोवती दिवे लावून ठेवतात. दक्षिणेंत व्यंकोबाच्या गिरीवर नवरात्राचा उत्सव फार मोठया प्रमाणावर होतो. शक्तीच्या उपासकांनी भारतांत या देवीच्या नवरात्राला महत्त्व आणलें. पुढे इतर पंथीयांनीहि याच पद्धतीवर आपल्या उपास्य दैवतांचे नवरात्रमहोत्सव रूढ केले.



विजयादशमी : हा आपणा भारतीयांचा विजयाचा व पराक्रमाचा सण आहे. अर्जुनाने अग्निगर्भा शमीवरचीं शस्त्रें काढून कौरव सैन्यावर स्वारी केली ती याच दिवशीं. रामचन्द्राने रावणावर स्वारी केली तो दिवसहि हाच. म्हणूनच याला विजयादशमी असें नांव पडलें आहे' हा सण हजार-दीडहजार वर्षें आपण पाळीत आहोंत. इतिहास-काळांत मराठे वीर याच दिवशीं मोहिमेवर निघत. शत्रूचा प्रदेश लुटून सोनें घरीं आणीत. परमुलखांतून आणलेल्या कमाईतील कांही भाग स्त्रियांनी ओवाळलें की, त्यांच्या तबकांत घालीत. नंतर देवाला आणि वाड-वडिलांना नमस्कार करीत. देवापुढेहि सोनें ठेवीत. महाराष्ट्रांत आपट्याचीं पानें तोडून आणून तीं सोनें म्हणून इष्टमित्रांत वांटण्याची रूढि आहे. गुजरात, काठेवाड या प्रांतांत शमीपूजन करतात, पण सोनें वांटण्याची वहिवाट नाही. म्हैसूर येथे दसऱ्याची मिरवणूक मोठ्या थाटाची निघते. दरबारहि भरतो. कांही ठिकाणीं रेडे व बकरे देवीस बळी देण्याचा प्रघात आहे. जो रेडा बळी द्यायचा असेल त्याला वर्षभर आधी मोकळा सोडून धष्टपुष्ट करतात आणि शिलंगणाहून परत आल्यावर गांवाच्या वेशीच्या तोंडाजवळ त्याचें शिर तोडतात. मग त्याला वेशींतच पुरतात. या बलिदानाने गांवांत रोगराई होत नाही अशी समजूत आहे. महाराष्ट्रांत या दिवशीं पाटीपूजन करून मुलांचा विद्यारंभ करतात.

हा उत्सव प्राचीन काळीं कृषिविषयक लोकोत्सव होता. पावसाळ्याचें पहिलें पीक घरांत आल्यावेळीं हा उत्सव करीत. नवरात्रांत नवधान्याची पेरणी व शेवटच्या दिवशीं त्याचे वाढलेले अंकुर उपटून देवाला वाहणें या गोष्टी या उत्सवाचें मूळ स्वरूप व्यक्त करतात.



# बुद्धिबळाच्या पटावर

श्रीकृष्ण साखळकर

( लेखांक दुसरा )

नेपोलियन बोनापार्टविषयीं अशी एक आख्यायिका आहे की, तो कुठल्याहि देशावर आक्रमण करण्यापूर्वी त्या देशाच्या भूगोलाचा चांगला अभ्यास करीत असे. त्या देशांतले डोंगर, नद्या, हवामान या निसर्गसिद्ध गोष्टींचा आढावा घेऊन मगच तो आक्रमणाचा बेत ठरवी.


बुद्धिबळ हाहि एक लढाईच्याच स्वरूपाचा खेळ आहे. म्हणून तो चांगल्याप्रकारें खेळतां यावा अशी ज्यांची इच्छा असेल यांनीं बुद्धिबळाचा 'भूगोल' शिकणें आवश्यक आहे. बुद्धिबळें ज्या 'भू-गोलावर' खेळलीं जातात त्या क्षेत्राला पट अशी संज्ञा आहे. [ आकृति क्र. १ ] आतां या पटाचीं वैशिष्ट्यें आपण पाहूं या.

या पटावर एकंदर चौसष्ट घरें असतात. पण तीं सर्वच एकाच रंगाचीं नसतात, त्यांत बत्तीस घरें पांढरीं तर बत्तीस घरें काळीं असतात. समान रंगांचीं घरें एकाच कर्णरेषेंत ( diagonally ) असतात. पट असा दुरंगी कां असावा ? या वेगळ्या रंगांच्या घरांची काय जरुरी ? शिवाय त्याच रंगांचीं घरें कर्णरेषेंतच कां असावींत ?

बुद्धिबळाच्या डावांतलें एक मोहरें जो उंट ( Bishop )त्याच्या गति चटकन् ओळखतां याव्यात, याशाठीं हे दोन रंग फार उपयोगी पडतात. दोघांहि प्रतिस्पर्ध्यांना प्रत्येकी दोन उंट खेळावयास असतात. एक पांढऱ्या घरचा व दुसरा काळ्या घरचा. पांढऱ्या घरचा उंट नेहमी पांढऱ्याच घरावरून फिरतो, तर काळ्या घरचा उंट फक्त काळ्याच घरावर सत्ता चालवतो. म्हणून उंट 'तिरका' चालतो अशी त्याच्या गतीची संभावना करण्यांत येते. उंटाची गति वर्णन करायची झाली तर असें सांगतां येईल की, उंट कर्णरेषेंत चालतो. कोणताहि उंट फक्त बत्तीस घरावरच ताबा ठेवूं शकतो आणि म्हणूनच खेळाडूंकडे काळ्या व पांढऱ्या घरचा उंट असणें, खेळांत बाद न होण्याच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे.

पट मांडण्याचा असा नियम आहे की, खेळाडूंच्या उजव्या हाताला पटाच्या कोन्यावर पांढरें घर असावें. खेळाडू समोरासमोर बसून पट मध्यें घेऊन खेळत असल्यामुळे दोघांहि खेळाडूंच्या उजव्या हातालाच पांढऱ्या घराचे कोन येतात. ( आकृति क्र. १ ) एक खेळाडू पांढरीं मोहरीं खेळतो तर दुसरा काळीं खेळतो. मोहऱ्यांच्या रंगावरून बऱ्याच वेळां खेळाडूंचा उल्लेख 'पांढरा' व 'काळा' असा केला जातो. पट असा विशिष्ट पद्धतीने मांडण्यामागे हेतु दोन. एक म्हणजे खेळाडूंना एकाच पद्धतीच्या पटावर खेळतांना सोपें जातें. कारण पट नियमाविरुद्ध मांडल्यास खेळाडूला जेथे पांढरीं घरें पाहण्याचा सराव आहे तेथे काळीं दिसूं लागतील व काळ्यांच्या जागीं पांढरीं दिसूं लागतील. माझ्या आठवणींत एक खेळाडू हलगर्जीपणानें नियमबाह्य पट ठेवून खेळल्याचें व तो डाव हरल्याचें एक उदाहरण आहे. मागाहून त्या डावाचें वर्णन करीत असतांना तो खेळाडू मला म्हणाला, "सबंध डावभर मला कांहीतरी चुकल्याचुकल्यासारखें वाटत होतें. प्रत्येक मोहरा खेळतांना मी बिचकत होतों. वाटूं लागलें की, आपलें डोकेंच ठिकाणावर नाही. शेवटीं एकदा डाव हरलों व पट मिटला, तेव्हा स्वस्थता लाभली." आंतरराष्ट्रीय बुद्धिबळाच्या नियमानुसार जर डाव खेळतांना पट नियमबाह्य ठेवल्याचें लक्षांत आलें तर पट पुनः नियमानुसार ठेवून खेळलेला डाव ज्या स्थितींत असेल तसाच त्या पटावर मांडून खेळ चालू करतां येतो. मात्र डाव संपला असल्यास त्या डावाचा निर्णयच मानला जातो.

पट विशिष्ट पद्धतीने मांडण्याचा दुसरा एक हेतु फार महत्त्वाचा आहे. त्यामुळे खेळाडूंच्या 'राजांची' खेळाच्या सुरुवातीची जागा सहज ठरविली जाते. नियमानुसार पांढरा राजा काळ्या घरांत व काळा राजा पांढऱ्या घरांत ठेवायचा असतो. पटाच्या खेळाडूंच्या बाजूच्या कडेवरील घरें डावाच्या सुरुवातीला मोहरीं ठेवण्यासाठी वापरावयाचीं असतात. पांढऱ्याचा राजा त्याच्या उजवीकडून चवथ्या घरीं तर काळ्याचा त्याच्या उजवीकडून चवथ्या घरीं ठेवावा लागतो. दुसऱ्या मध्यावरच्या घरांत वजीर ठेवावावयाचा. अशा तऱ्हेने राजा, वजीर जवळ जवळ ठेवल्यावर त्यांच्या बाजूच्या घरांत उंट ठेवावयाचे. ( म्हणजे एक पांढऱ्या घरचा उंट व एक काळ्या घरचा उंट मिळाला ) उंटाच्या बाजूला घोडे; प्रत्येक खेळाडूजवळ दोन दोनच घोडे असतात. त्या घोड्यांच्या बाजूला हत्ती-हेहि दोन दोनच. अशा प्रकारें मोहऱ्यांची योजना करून प्रत्येक मोहऱ्याच्यापुढे एकेक प्यादा, अशी दुसऱ्या पट्टींत आठ प्यादीं ठेवावयाचीं. असें कां ? तर पांढऱ्याची व काळ्याची सेना पटावरच्या युद्धाला तयार झाली.



**राजाची गतिः** राजा त्याच्या बाजूच्या कुठल्याहि घरांत खेळतां येतो. म्हणजे तो सरळ आणि तिरका पण एकच घर चालतो. मात्र त्याला 'शहाचें' घर बाद आहे. ज्या घरांत तो खेळला असतां

( पुढील पानांवर )

## नवें वाचन

## नवें चिंतन

एक ग्रंथपाल

आजकाल गांवोगांवीं सरकारी साहाय्यानें मुक्तद्वार ग्रंथालयें चालत आहेत. शाळा-कॉलेजांचीं ग्रंथालयेंहि अधिक व्यवस्थित होत आहेत, सर्वसामान्य वाचकांची जिज्ञासा वाढत आहे. आणि वाङ्‌मय विकत घेऊन वाचण्याची, घरीं एखादा लहानसा संग्रह करण्याची प्रवृत्तीहि दिसूं लागली आहे.

ही प्रवृत्ति जोपासली पाहिजे. तिला व्यवस्थित मार्गदर्शन केलें पाहिजे. यासाठी 'नवें वाचन! नवें चिंतन' हें एक नवें उपसदर 'माणूस' चालू करीत आहे.

या सदरांत बालांपासून वृद्धांपर्यंत सर्वांना उपयुक्त व मनोरंजक वाटतील अशा निवडक पुस्तकांची केवळ तोंड-ओळख करून देण्याचा मानस आहे. अपेक्षा आहे की, वाचकांनी प्रत्यक्ष हीं पुस्तकें पाहावीत, त्यावर विचार करावा व आपापला स्वतंत्र अभिप्राय ठरवावा.

---

प्रतिपक्षाच्या मोहऱ्याचा वा प्याद्याचा त्याच्यावर हल्ला होतो. तें घर शहाचें. अशा घरांत राजा सांपडला व त्याला पळवाटेचें घर नसलें, की, राजावर मात होते व डाव संपतो. मात्र राजाच्या राहत्या घरावर प्रतिपक्षाचा हल्ला नसेल, पण बाजूचीं घरें हल्याखाली असतील आणि राजाखेरीज खेळाडूंजवळ हलविण्यास दुसरें कांहीं नसेल तर 'बुर्जी' डाव होतो. हा डाव बरोबरीचा डाव म्हणून समजला जातो. डावाचा निर्णय तीन प्रकारचा—हार, जीत, बरोबरी.

वजिराची गतिः राजासारखीच, पण कितीहि घरें. मात्र तो एकावेळीं सरळ किंवा तिरकाच जाऊं शकतो.

हत्तीची गतिः सरळ म्हणजे उभी आणि आडवी. उंटाची गति त्याला वर्ज्य. हत्ती कितीहि घरें जातो.

घोड्याची गतिः अडीच घरें. म्हणजे प्रथम एक घर हत्तीसारखा सरळ व नंतर एक घर उंटासारखा तिरका खेळून त्याची एक खेळी पुरी होते.

प्यादें : पहिल्या खेळीला एक किंवा दोन घरें, पण नंतर सरळ एक घर चालतें. मात्र प्रतिपक्षाचें मोहरें वा प्यादें मारतांना उंटाच्या गतीनें तिरकें मारतें. घोड्याखेरीज दुसरें कुठलेंहि मोहरें वा प्यादें दुसऱ्या मोहऱ्याच्या वा प्याद्याच्या डोक्यावरून पलीकडे गति घेत नाही. * * *

### चतुरंगरेखा

श्री. गोपाळकृष्ण भोबे.
कैलास प्रकाशन, मुंबई.
पृष्ठें सुमारें १२५, किंमत रु. ३-५०.

चित्रकला, संगीत, अभिनय या ललित-कलांमध्ये रमलेल्या एका जाणकार लेखकानें प्रसिद्ध चित्रकार मु. रा. आचरेकर, द. ग. गोडसे, दि. दा. दलाल, शिल्पकार राम कामत, गायक मोगूबाई, बडे गुलाम अलीखां, उस्ताद अमीरखाँ, मोहनराव पालेकर, वसंतराव देसाई, अली अकबरखाँ, तबलिये पर्वतकर, खलिपा अमीर हुसेनखाँ, नर्तिका जव्हेरी भामिनी यांच्या कलांचा निकट अनुभव व आनंद घेऊन हीं व्यक्तिचित्रें रंगवलीं आहेत. सर्व लेखन सुबोधतेनें व प्रसादानें भरलेलें आहे. ललितकलांमध्ये रस घेणाऱ्या सामान्य वाचकांसहि हीं चित्रें मनोरम वाटतील. * * *

### वाटाण्याच्या अक्षता

श्री. रमेश मंत्री,
चंद्रकांत शेट्ये प्रकाशन, कोल्हापूर.
पृष्ठें सुमारे १६२. किंमत रु. ४–००.

श्रीपाद कृष्ण, गडकरी, कॅ. लिमये, चिं. वि. जोशी, अत्रे, बेहेरे, भा. रा. भागवत यांसारख्या नामवंतांनी केलेल्या विनोदी लेखनांत अलीकडे पु. ल. देशपांडे, वि. आ. बुवा, रमेश मंत्री अशा नव्या मंडळींनी चांगली भर घालण्याकडे सतत लक्ष दिलेलें दिसतें. प्रस्तुतचा कथा-कथात्मक लेखसंग्रह याच तऱ्हेवार लिखाणापैकी आहे. उपरोधक, विडंबक, लक्षण-व्यंजनापूर्ण नमुने या संग्रहांत भरलेले आहेत. कॉलेजांतील पोकळडौली मंडळी, काम करतां येत नसतांहि दिमाख दाखवणाऱ्या तरुणी, गैरव्यवस्थांचे नमुने असणारीं लॉजिंग-बोर्डिंग घरें, नगरपालिका वगैरेसारख्या संस्थांमध्ये गुदरलेल्या तक्रारी-सूचनांच्या अद्‌भुतरम्य वासलाती, भविष्य-वाचन, नवकाव्य असे अनेक विषय त्यांनीं मार्मिकपणें हाताळले आहेत. कांहीं पानपूरकें दिलीं आहेत, तींहि रसपूर्ण वाटतात. विनोदी प्रस्तावना शेट्ये प्रकाशनाच्या वाटचालीचा मनोरंजक आढावा घेतांना दिसते.

* * *

### रवींद्रनाथ आणि महाराष्ट्र

संपादक श्री. श्रीपाद जोशी. महाराष्ट्र राज्य रवींद्रनाथ जन्मशताब्दि समितीतर्फे, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणें.
पृष्ठें सुमारे ४००, किंमत ४ रु.

विश्वकवींद्र रवींद्रनाथ यांच्या हृदयांत महाराष्ट्रभूमि, तिचा उज्ज्वल इतिहास, तिचे प्रतापी पुत्र, वाङ्मय यांच्याविषयीं उत्कट प्रेम व गाढ आदर वसत होता याची साक्ष या संग्रहांतील कविता, लेख व मननें यांतून

(पुढील पानावर)

# तेनसिंगची पट्टशिष्या कु. अदिति पंत

" आम्हांला केवळ कीर्तीचाच लाभ झाला असेल, तर एव्हरेस्ट काबीज करण्यापासून विशेष कांही मिळालें, असें मला वाटणार नाही. पृथ्वीच्या सर्वोच्च शिखरावर पोचण्यासाठी केलेल्या आजवरच्या प्रयत्नांमुळे तरुण पिढीच्या चारित्र्याला वळण लागायला हवें, आपल्या तरुणांच्या कृतीला चालना मिळायला हवी, ह्याच नव्हे तर आगामी पिढ्यांनाहि स्फूर्ति प्राप्त व्हायला हवी. " एव्हरेस्ट शिखर काबीज करणाऱ्या साहसी तुकडीचे नेते, ब्रिगेडिअर सर जॉन हंट, ह्यांचे हे उद्गार आहेत.

ब्रिगेडिअर हंट यांना धन्यताच वाटेल असा एक पराक्रम एका कॉलेजविद्यार्थिनीने नुकताच करून दाखविला आहे. अभिमानाची गोष्ट अशी की, ही विद्यार्थिनी महाराष्ट्रीय आहे. अदिति पंत हें या विद्यार्थिनीचें नांव.

श्री. वा. काळे यांनी घडविलेला तिचा हा एक मनोहर व स्फूर्तिदायक परिचय.......

एव्हरेस्ट शिखरावर तेनसिंगाने आपल्या आइस-ॲक्सवर ब्रिटिश नेपाळी आणि यु. नेशन्सच्या ध्वजाबरोबर भारतीय ध्वज फडकावला. त्याचा सर्व भारतीयांना किती अभिमान वाटला ! ह्याच तेनसिंगाच्या नेतृत्वाखाली एका महाराष्ट्रीय कॉलेज विद्यार्थिनीने वयाच्या केवळ १७ व्या वर्षी हिमालयांतील कांचनगंगा रांगेतील पीक फ्रे हें २०,६०० फूट उंचीचें शिखर गाठून तरुण पिढीला आदर्श निर्माण केला आहे. जॉन हंटचे उद्गार तिच्याहि पराक्रमाला लागू आहेत.

अदिति हें ह्या मुलीचें नांव. अप्पासाहेब पंत आणि डॉ. सौ. नलिनी पंत ह्यांची ही थोरली कन्या. तिची आई आणि वडिल ह्या दोघांनाहि गिर्यारोहणाचा छंद आहे आणि तो ह्या मुलींतहि उतरला आहे. दार्जिलिंग येथे ती सेंट जोसेफ्स कॉलेजांत शिकत असतांना, आई-वडिलांच्या संमतीने आणि प्रोत्साहनाने ती तेथील गिर्यारोहणाच्या इन्स्टिटयूटमध्ये दाखल झाली. ह्या इन्स्टिटयूटमध्ये ह्यापूर्वी भारताच्या सर्व प्रदेशांतील फक्त मुलेंच घेत असत, आदितीपासूनच मुलींनाहि प्रवेश मिळूं लागला आहे. महाराष्ट्रीय त्यांत क्वचितच आढळतो आणि मुलगी तर नाहीच आढळत. इन्स्टिटयटमधील विद्यार्थ्यांच्या समवेत गेल्या नोव्हेंबरमध्ये आदितीने ८२ मैलांच्या चढ-उतारानंतर २०,६०० फूट उंचीचें पीक फ्रे हें शिखर चढण्याचा विक्रम केला. तिच्या बरोबरीच्या मुलांपैकी शेवटपर्यंत चौघेच उरले आणि अदिति ही एकटीच विद्यार्थिनी शिखरावर जाऊन आली. तिच्याबरोबर तेनसिंगची गिर्यारोहणपट्ट भाची डोमा ही सोबतीला होती आणि तेनसिंग स्वतःहि होताच.

पुणें येथील नौरोसजी वाडिया कॉलेजांत आता ज्युनिअर बी. एस्सी. च्या वर्गात दाखल झालेली अदिति इतर मुलींच्यासारखीच दिसते; पण तिने केवढा पराक्रम केलेला आहे, पाहा ! तिच्या आई-वडिलांनी प्रोत्साहन दिलें आणि आलेली संधि तिने कारणीं लावली; ह्या दोन्ही गोष्टी सर्वांना मार्गदर्शन करणाऱ्या आहेत. किती आई-बाप अशा साहसांना परवानगी देतील आणि किती तरुण-तरुणी त्याचें चीज करून दाखवूं शकतील ?

आपल्या गिर्यारोहणाचे अदितीने सांगितलेले अनुभव मनोरंजक आहेत; युद्धस्य कथा रम्या असतातच ! पाठीला दोर आणि हातांत आइस ॲक्स ह्यांच्या आधारावरच गिर्यारोहकाचें जीवित अवलंबून

---

मिळते. मूळ बंगाली व त्याचा मराठी अनुवाद यांच्या सांगडीमुळे रवींद्रबाबूंनी केवढा नितांत आदर महाराष्ट्रांतील पूज्य विभूतींविषयीं बाळगलेला होता हें दिसून येऊन वाचणारास विशेष आनंद होतो.

कविवर्य टागोरांनी महाराष्ट्र व मराठी माणसें यांच्याविषयीं वेळोवेळीं काढलेल्या या गद्य-पद्य उद्गारांच्या संपूर्ण संग्रहाला बंगाली-साहित्याचे मर्मज्ञ जाणकार आचार्य स. ज. भागवत यांची विवेचक प्रस्तावना आहे, तसेंच पुस्तकाच्या अंतरंगाला अनुरूप असें मुंबईच्या जे. जे. कला विद्यालयाचे प्राचार्य वि. ना. आडारकर यांनी रंगविलेलें वेष्टन आहे.

• • •

### उद्योग–भारत

**श्री. आनंद माधव लेले**
आनंद कार्यालय प्रकाशन, पुणें.
पृष्ठें सुमारे १४०, किंमत २॥ रु.

आपल्या देशाच्या स्वातंत्र्योत्तर विकासक्रमांत विज्ञानें, यंत्रें, उद्योग-धंदे यांची संपूर्ण माहिती सर्व लहान-मोठ्या जिज्ञासू व्यक्तींना सतत मिळत गेली पाहिजे. विशेषत: लहानांच्या संस्कार-ज्ञानग्राही वयांत हें होणें अति इष्ट. कै. वा. गो. आपटे यांनीं आपला आनंद व आनंद कार्यालय यांचे द्वारे ह्या उद्योगाचा आरंभ सुमारें १९१५ पासून केलेला आहे. त्याच आनंद कार्यालय प्रकाशनांत प्रस्तुत पुस्तकाची नवी भर टाकण्यांत आली आहे. बालामध्ये आपले खानिजोद्योग, वस्त्रोद्योग रसायनोद्योग, यंत्रोद्योग यांची आवड वाढावी अशी सुगम पण संपूर्ण माहिती वेधक शैलींत करून दिलेली आहे. बालांसाठी लिहावयाचें म्हणजे परी, राक्षस, वीर, सुयारें इत्यादि अद्भुतरम्य माध्यमाने लिहावयाचें अशी सर्वपरिचित रीत आहे. परंतु या पुस्तकांत बालांच्या जिज्ञासेचा अचूक अंदाज करून आपले विविध उद्योग, शोध, यंत्रें यांच्या विकासांची उद्बोधक कथा अगदी सोप्या भाषेंत सांगितली आहे. आवश्यक तीं पूरक स्पष्टीकरणाचीं चित्रें नि आंकडेवारी दिल्याने विषय जास्त सुगम झाला आहे.

• • •

असतें. बुटांना आकड्याचे 'कँपन्स' बसविलेले असतात. बर्फाचा उभा कडा चढून जाण्यासाठी बर्फात 'पिरॉन' रोवावा लागतो आणि त्याला दोर अडकवलेला असतो. खांद्यावरील पिशवींत इतर साहित्य असतें. पायांत तंग परंतु गुडघ्यापाशी ताण न पडणाऱ्या विजारी असतात. थंडी वाऱ्यासाठी इतर कपडेहि असतात. नेहेमीचाच मांसाहार पुरतो, वेगळें अन्न घ्यावें लागत नाही. तंबूंत राहावयाचें, दिवसां चाल करायची, बारा तास झोप काढायची, बरोबर घेतलेल्या याक आणि मेंढ्या ह्यांपैकी जरूर तेवढीं जनावरें मारून खायचीं, खाद्य संपत आलें की, परत फिरायचें! उंचीवर गेल्यावर दात धुण्याचें सोडून द्यायचें. १५ हजार फुटांचेवर गेल्यावर श्वासोच्छ्वासाला अडथळा येऊं नये म्हणून फार हळूहळू चालावें लागतें. एक, दोन, तीन, चार, पांच असे अंक मनांत मोजून एकएक पाऊल टाकायचें!

आपल्यांतली दहा जणींसारखी एक तरुण विद्यार्थिनी हिमालयांतल्या उच्च गिरिशिखरावरील हवा खाऊन आली आहे, ही कल्पनाच किती चेतना देणारी आहे! २०,६०० फूट उंचीच्या ज्या शिखरावर अदिति जाऊन आली, तेथे कांही वर्षांपूर्वी जेफ्री फ्रे नांवाचा एक स्विस गिर्यारोहण करीत असतांना मृत्यु पावला. म्हणून त्या शिखराला फ्रे शिखर असें नांव पडलें. अदितीला ह्या शिखराजवळ फ्रे च्या कडेलोटाची आठवण झाली. ती थोडी अस्वस्थहि झाली, पण तिने हिंय्या सोडला नाही, तिने शिखरावर मात केली.

कु. अदिति पंत ही आता १८ वर्षांची आहे. तिने अभ्यास नीट करूनच गिर्यारोहणांतहि अभिमानास्पद प्रगति केली आहे. "पुनः संधि मिळेल, तर ती मी सोडणार नाही." अशी तिची उमेद आहे. तिला आपल्या गुरूबद्दल—तेनसिंगबद्दल—नितांत आदर आहे. त्याचें वर्णन करणेंच अशक्य आहे; "त्याच्या सारखा साधा, सरळ, निगर्वी मनुष्य विरळा" असें तिला वाटतें.

चढतांनाच धोका असतो असें नाहीं, उतरणें तर अधिकच धोक्याचें असतें. विरल हवेवर फार वेळ जगणेंहि अवघड असतें. त्याचा मुद्दाम सराव करावा लागतो. बर्फाच्या सान्निध्यानें शरीराचे अवयव निकामी होण्याचीहि शक्यता असते. त्या मानानें जखमा म्हणजे कांहीच नाहीत. सर एडमंड हिलरीबरोबर हिमालयांत गिर्यारोहणासाठी आलेल्या पीटर मॅलग्रूला २७,००० फूट उंचीवर बर्फाच्या बाधेमुळे निकामी केलें, इतकेंच नव्हे तर त्याचे दोन्ही पाय गुडघ्याखाली कापावे लागले, हें वृत्त पुष्कळांच्या वाचनांत आलें असेल. अदितीच्या आई-वडिलांना अशा धोक्यांची प्रत्यक्ष कल्पना असतांहि त्यांनी आपल्या आवडत्या मुलीला पीक फ्रेवर पाठविलें, ह्याचें कौतुक वाटतें. प्रत्यक्ष कृतीने त्यांनी इतर पालकांना उदाहरण घालून दिलें आहे.

गुजराती समाजांत गिर्यारोहणाची आवड प्रसृत करण्यासाठी अहमदाबाद येथे 'परिभ्रमण' ह्या नांवाची संस्था नुकतीच स्थापन झाली आहे. तिचें उद्‌घाटन करतांना, दार्जिलिंग येथील हिमालय मौंटेनिअरिंग इन्स्टिट्यूटचे प्रिन्सिपॉल, ब्रिगेडिअर ग्यानसिंग हे म्हणाले, "आपण आपल्या तरुणांना गिर्यारोहणाचें शिक्षण देऊन हिमालयाचीं शिखरें काबीज करण्यास शिकवूं या. म्हणजे तेथील पवित्र शिखरांवर वाकडा डोळा ठेवणारांना चांगला धडा देतां येईल." आपल्या देशाचें संरक्षण यशस्वी रीतीने व्हावयाचें असेल, तर धडाडीचे तरुण निर्माण व्हायला हवेत, असा त्याचा अर्थ आहे. अशी धडाडी दाखविणाऱ्यांना मागे खेचणारे पालक नकोत, प्रोत्साहन देणारे हवेत! एखाद्याच नव्हे, तर सर्व क्षेत्रांत! अदिति गिर्यारोहणांत तरबेज आहे तशी अभ्यासांतहि पण आहे. सीनिअर केंब्रिज परिक्षेंत ती पहिल्या वर्गांत उत्तीर्ण होऊन इंग्लिशमध्ये तिनें विशेष गुण मिळविले होते. कलकत्ता विद्यापीठाचा इंटर सायन्सचा दोन वर्षांचा अभ्यासक्रम तिने एका वर्षांतच पार पाडला आणि त्या परिक्षेंतहि ती पहिल्या वर्गांत आली; त्याच वर्षी तिने गिर्यारोहणाचीहि हौस भागवून घेतली होती. युरोपियन क्लासिकल संगिताची तिला खूप आवड असून बॉलरूम डांसिंगमध्ये ती प्रवीण आहे. पुस्तकें वाचण्याचा तिला भयंकर नाद आहे. तिच्या हातांतून पुस्तक काढून घ्यावें लागतें. वडिलांची बदली झाली म्हणजे तिच्या पुस्तकांचें आठ नऊ मणांचें ओझें नेण्यासाठी बराच जादा खर्च येतो. मित्र मैत्रिणींना जमवून पिकनिकला जाणें,

(पुढील पानावर)



● ● हिमकाया—अदिति ● ●



अदिति पंत-धाकटा भाऊ (आंनेकेत) आणि आई (आक्का) यांचे मध्यें उभी असून वडील (आप्पासाहेब) आणि धाकटी बहीण (अवलोकिता) बसलेली आहे.



# पुरुषांच्या सहा जाती

## चिं. वि. जोशी

**डॉ.** लुई बिश् एम्. डी. हे मज्जातंतु-शास्त्राचे विशेषज्ञ न्यूयॉर्क येथे डॉक्टरी धंदा करीत आहेत. त्यांनी आपल्या विषयावर लिहिलेले पुष्कळ प्रबंध लोकप्रिय झाले आहेत. विवाहित पुरुषांच्या स्वभावानुसार त्यांच्या सहा जाती त्यांनी कल्पिल्या आहेत. टर्रेबाज-अहंमन्य, अतिसात्त्विक, कृपण, रंगेल, बायकी आणि घरबशी अशा या जाती आहेत.

दोन मैत्रिणी आपल्या नवऱ्यांच्या स्वभावाची चर्चा करीत बसल्या होत्या. एक म्हणाली, 'आमचे हे फार मायाळू नि विचारी आहेत. मीं कांही सांगितलं नि त्यांनी आणलं नाही असं कध्धी होत नाही.' मैत्रीण म्हणाली, 'तुझं नशीब चांगलं आहे. माझ्या इथे बरोब्बर उलटं आहे. यांच्याइतका कद्रू माणूस मीं जन्मांत पाहिला नाही.' एकमेकांच्या नवऱ्यांच्या स्वभावाची तुलना जस जशी आणखी वाढली तसतसे पुरुषांचे स्वभाव इतके विरुद्ध आणि विविध असूं शकतात तरी कसे याचें त्यांना नवल वाटूं लागलें. लहानसहान फरक माणसामाणसांच्या स्वभावांत असायचेच, व्यक्ति तितक्या प्रकृति असतातच. पण स्वभावांतली मूलभूत विचित्रतताच किती भव्य असते हें त्यांस कळून आलें.

बिशच्या मताप्रमाणे बायकांच्या स्वभावांत व्यक्तिशः इतके फरक असतात की, त्यांच्या वेगळाल्या जाती पाडावयाच्या तर जितक्या व्यक्ति तितक्या जाती होण्याचा संभव आहे. म्हणून त्यांनी फक्त पुरुषांच्याच सहा जाती मानिलेल्या आहेत. आता त्यांनी केलेल्या वर्गीकरणांतील पहिली जात विचाराकरितां घेऊं.

### ● टर्रेबाज-अहंमन्य जात ●

बायकांना गुण्डप्रवृत्तीचे तिसमारखाँ नवरे अधिक पसंत पडतात असें तज्ज्ञांचें मत आहे. या लोकांना त्या 'स्वाभिमानी, शूर आणि धाडसी' अशीं गौरवयुक्त नांवें देतात, पण जेव्हा असे लोक त्यांना पायपोसाप्रमाणे वागवूं लागतात, तेव्हा मात्र त्यांना चीड आल्याशिवाय राहत नाही.

हा तिसमारखाँ म्हणजे रानटी अवस्थेंतलाच मनुष्य, अंगांत कपडे घालून समाजांत वावरण्यास आलेला असतो. कुटुंबामध्ये

---

आइसक्रीम खाणें, ह्या तिच्या विशेष आवडी आहेत. शाळेच्या किंवा कॉलेजच्या सर्व लहान-मोठ्या उपक्रमांत ती हौसेने भाग घेत आली आहे.

शहरांतील लोकांपेक्षा खेड्यांतले, सपाटीवरच्यापेक्षा डोंगराळ भागांतले लोक अधिक देवबुद्धीचे असतात. त्याचें कारणहि उघड आहे. त्यांना निसर्गाला सतत तोंड द्यावें लागतें; त्याच्या कृपेवरच त्यांचें सर्वस्व अवलंबून असतें. ह्या आस्तिक्य बुद्धीचा त्यांच्या जीवनावरहि परिणाम होऊन ते साधे, सरळ बनतात. त्यांच्यामध्ये अहंकाराला थारा मिळत नाही. उच्च पर्वतशिखरें चढून जाणारे गिर्यारोहक निसर्गाच्या कृपेला नेहमी स्मरतात. स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल ते बोलण्याचें टाळतात. अदितीचे बाबतींत असेंच कांहीसें घडलें आहे. पुढे शेरपा गोंपी, नंतर अदिति, नंतर डोया आणि शेवटी तेनसिंग, अशा अनुक्रमाने मंडळी दोराला बांधलेली होती, तरीसुद्धा "मिस्टर तेनसिंगनी मला अक्षरशः वर खेचलें" असें अदिति आग्रहाने सांगते. अर्थात तें लाक्षणिक अर्थाने खरें आहे.

अदितीवर तेनसिंग इतका खूष आहे की, तो तिला एव्हरेस्ट शिखरावर घेऊन जाण्यास तयार आहे, पण तूर्त तरी अदितीचा बेत बी. एस्सी. होऊन उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला जाण्याचा आहे.

● ● ●

त्याची सुलतानशाही अंमल गाजवीत असते. आपल्याला सर्व कांही माहीत आहे, आपला शब्द हाच कायदा असें तो मानतो आणि आपल्या वाटेस कोणीं गेलेलें त्याला खपत नाही. त्याची बायको, मुलें त्याला भीत असतात आणि संध्याकाळी तो कामावरून येण्यास उशीर होईल तितका बरा असें त्यांना वाटतें. जेवतांना कोणीं बोललेलें त्याला आवडत नाही आणि तो बोलूं लागला की, सर्वांनी निमूटपणें ऐकून घेतलें पाहिजे असा त्याचा आग्रह असतो.


असले अहंमन्य सुलतान पुष्कळदा निर्दय बनतात. बायकांना मार देणारे लोक यांतच असतात. बडोद्यास हायकोर्ट न्यायाधीशाच्या जागेवर काम करणारा एक गृहस्थ क्षुल्लक कारणावरून आपल्या सुना-जावई आणलेल्या बायकोच्या श्रीमुखांत भडकावून देत असे. वाढतांना उलट बाजूस भाजी वाढली, पोळी करपली, आंघोळीचें पाणी पाहिजे तितकें गरम नव्हतें अशा कारणांनी तो बायकोला झोडपीत असे. अशिक्षित वर्गांत बायकोला जो वेळप्रसंगीं झोडपीत नाहीं तो नवरा मेषपात्र समजला जातो. हे नरराक्षस मुलांचेहि हाल करितात आणि त्यांना स्वाभिमानशून्य बनवितात.

पैशाच्या बाबतींत हे लोक अतिशय कंजूष असतात..'त्यांच्या बायकांना परवानगीवांचून एक पैसाहि उचलून देण्याची मुभा नसते. घरांतील काम चांगलें झालें, एखाद्या मुलाने किंवा मुलीने बक्षीस मिळविलें तर यांच्या तोंडून शाबासकीचा शब्द निघणार नाही, पण एखादें काम बिघडलें किंवा मुलगा-मुलगी नापास झाली, तर हे आकाशपाताळ एक करून सोडतात.

घरांतील कामांत हे मदत मुळीच करीत नाहीत. घराला रंग देणें, अडगळ काढून टाकणें, किरकोळ दुरुस्त्या करणें असलीं नैमित्तिक कामेंदेखील ते करीत नाहीत. मग रोजच्या कामांत कुटुंबांतील माणसांना हातभार लावणें दूरच राहिलें. घराबाहेर ह्यांनी मरे-पर्यंत काम केलें तरी घरीं आपल्याला ऐष-आराम आणि विश्रांति मिळाली पाहिजे असा त्यांचा हट्ट असतो.

कुटुंबांतील माणसांवर ममता दाखविणें त्याला कमीपणाचें वाटतें. बायकोशी तो जेव्हा प्रेमाने बोलतो किंवा मुलाची पाठ कुरवाळतो तेव्हा आपण कांहीतरी दयेचें कृत्य करीत आहों असें त्याला वाटत असतें. असल्या तिसमारखाँच्या आणि त्याच्या कुटुंबाच्यामध्ये तुटकपणाची भिंत उभारली जाते.

बायकोला असल्या राक्षसी पतीचें कदाचित् कौतुक वाटत असलें, तरी त्याच्या मुलामुलींच्या मनांत बापाविषयीं द्वेषच उत्पन्न होतो. संकट-समयीं असल्या बापाच्या कुशींत मुलें कधीहि शिरत नाहीत. अनेक उच्चपदस्थ लोक मुलांशी इतक्या तुटकपणें वागतात की, मुलें आईच्या मध्यस्थीने बापाशी बोलणें करितात.


आमची जात— तिस्मारखाँ...

कुटुंबांतील माणसांशी त्रयस्थपणें वागणें हें एक मोठेपणाचें लक्षण कांही बडे लोक समज-तात. सर जदुनाथ सरकार ह्या बंगाली महापंडितांसंबंधी त्यांचे मित्र रियासतकार सरदेसाई असें सांगत की, सौ. सरकार किंवा त्यांचीं मुलें यांना कांही मागण्या करावयाच्या असतील तर त्यांची यादी करून ठेवण्यांत येई आणि जेव्हा रियासतकार सर जदुनाथांच्या घरीं पाहुणे म्हणून राहावयास जात, तेव्हा पाहुण्यांच्यामार्फत त्या मागण्या सादर करण्यांत येत. अशा तुटक वृत्तीने वागणाऱ्या बापांचीं मुलें वयांत येईपर्यंतच त्यांच्या आज्ञेंत राहतात व पुढें आपलीं लग्नें आपणच ठरवितात, आपले धंदे आपणच निवडतात आणि अशा बापांना वार्धक्यांत रुग्णालयांतच काळ कंठण्याची वेळ येते.

## • अतिमवाळ जात •

वर सांगितलेल्या तिस्मारखांच्या अगदी उलट पुरुषजात म्हणजे अतिमवाळ. ह्या मवाळाला राग तो कधीच चढत नाही. उलट दुसऱ्याला आपला राग येऊं नये अशी त्याला सदोदित काळजी लागलेली असते. तो कोणावर उलट टीका करीत नाही, सगळ्यांची स्तुतीच करीत असतो, त्याच्या क्षमाशीलतेवर त्याच्या बायकोमुलांची नेहमी भिस्त असते.

ह्या मवाळ पुरुषांचें हाडपेर जरा मऊच असतें. ते आक्रमणशील नसतात. ते भित्रे असल्याने त्यांच्यासमोर त्यांच्या बायकोसंबंधी कोणीं वेडेवाकडे शब्द काढिले तर त्या बोलणाराच्या मुस्कुटांत ते लावणार नाहीत. संकटसमयीं आपला नवरा किंवा आपला बाप आपलें रक्षण करण्यास धावून येईल अशी हमी त्यांच्या बायका किंवा मुली घेऊं शकणार नाहीत.

ह्या मवाळाला आपल्या विरोधकाचा पक्ष समजत असतो. आपली बाजू लंगडी असली तरी तिला कृत्रिम पाय लावण्याचा तो यत्न करीत नाही, ह्यामुळे कोणत्याहि स्पर्धेत तो विरोधकाच्या प्रचारापुढे टिकत नाही.

हे अतिमवाळ लोक स्वभावाने फार हळवे असतात. त्यांच्या भावना दुखायला वेळ लागत नाही. हे लोक आत्मावधानी आणि आत्म-निरपेक्ष असतात. कुठल्याहि वादग्रस्त विषयांत त्यांना ठाम पायावर उभें करणें कठीण जातें. त्यांना नोकरी असेल, तर बढतीसाठी वरीष्ठा-कडे तोंड वेंगाडण्यास ते जात नाहीत आणि एकदा खरेदी केलेली वस्तु खराब निघाली तर ती परत करून पैसे घेण्यासाठी ते दुकानदाराकडे जात नाहीत.

असल्या लोकांत हाताचा सढळपणा आढळून येतो. आपला सगळाच्या सगळा पगार ते बायकोच्या स्वाधीन करतात आणि बसच्या भाड्यासाठीं दहा पैसे लागले तरी ते बायकोजवळून मागून घेतात, हे लोक हॉटेलांत फारसे जात नाहीत आणि गेलेच तर एकटे जातात. त्यांना इतर पुरुषांची संगत विशेष आवडत नाही. आपल्या बायकोमुलांच्या कोंडाळ्यांतच ते सदैव गुरफटलेले असतात.



आम्ही नेमके उलट—

**• कृपण पुरुष •**

कृपण पुरुषाच्या पैशाच्या पाकिटाला कसर लागलेली असते असें थट्टेनें म्हणतात. कृपणाच्या सासऱ्याने आपल्या मुलीला बोहोल्यावर चढविण्यापूर्वी हुण्ड्यापायीं बराच खर्च केलेला असतो. लग्नानंतरसुद्धा त्या मुलीच्या हौशी तिचा बापच पुरवीत असतो. कृपण मनुष्य वधूच्या सौंदर्यापेक्षा तिच्या बापाच्या संपत्तीकडेच अधिक लक्ष पुरवितो. माझ्या शिष्यवर्गापैकी एकजण वैद्यकीय शिक्षणासाठी विलायतेस गेला होता. जाण्याच्या आधी तो एका सुंदर पण निर्धन मुलीशी वचनांत गुंतला होता. तीन वर्षेपर्यंत त्याने त्या मुलीशी इमान राखून पत्रव्यवहार चालू ठेविला, पण अभ्यासक्रमाच्या शेवटल्या वर्षी तो एका धनिकानें टाकलेल्या जाळ्यांत सापडला आणि आपल्या वाग्दत्त वधूशी पत्रव्यवहार त्याने बंद केला. धनिकाने त्याचा विलायतचा खर्च सोसण्याचें आमिष दाखवून त्याला निर्धन मुलीशी वचनभंग करण्यास प्रवृत्त केलें होतें. मुंबईच्या बंदरांत जेव्हा तो उतरला तेव्हा धनिक कुटुंबांतच तो मग्न होऊन गेला. निर्धन मुलीकडे त्याने पाहिलेंदेखील नाही. हा जरी राजशाही थाटांत वावरत असला, तरी मनाचा कंजूषच !

कृपण पति आपले पैसे नेहमी बंदोबस्तांत ठेवितो आणि बायकोलादेखील किल्ल्या देत नाही. त्याच्या हयातींत घरच्या माणसांना सुख मिळत नाही. परंतु तो मेल्यावर मात्र त्याचा पुष्कळ फायदा होतो. खर्चिक माणूस आपल्या हयातींत कुटुंबियांना सुख आणि आनंद देतो. पण तो मेल्यावर कुटुंबियांना रडण्याची पाळी येते. या उलट कंजूष मनुष्य आपल्या हयातींत सगळ्यांना रडवितो, पण त्याच्या मरणाने कुटुंबियांचा मोठा फायदा होतो. कृपण मनुष्य कांही अंशीं पहिल्या म्हणजे तिसमारखाँनी जातींतल्या माणसासारखा असतो, पण पैशाशिवाय इतर बाबतींत त्याचें तिसमारखानाशी साम्य नसतें.

**• रंगेले गडी •**

ज्या स्त्रीला प्रेमाची पर्वा नसेल, जिच्या मनांत सवतीमत्सराला जागा नसेल, इतर बायका आपल्याविषयीं काय बोलतात याची ज्यांना परवा नसेल आणि जी स्वभावाने मख्ख असेल अशा स्त्रीला रंगेल गडी आपला पति म्हणून आवडेल. रंगेल मनुष्याच्या आयुष्यांत एक क्षणहि कंटळवाणा जात नाही.

सर्वच पुरुष अंतर्यामीं रंगेल वृत्तीचे असले, तरी ती बाहेर दाखविण्याचें धैर्य फार थोड्यांना असतें. दुसरें असें की, रंगेलपणा हा फार महाग पडतो. रंगेल पुरुष आत्मसंयमन करूं शकत नाही. नीतिनियम, धार्मिक समजुती आणि लग्नाच्या बायकोशी निष्ठा दाखविण्याची आवश्यकता त्याच्या वर्तनाला बांध घालूं शकत नाहीत. हा रंगेल गडी आपल्या परिचयांत येणाऱ्या प्रत्येक स्त्रीच्या सौंदर्याने आकृष्ट होत असतो आणि मधुकरवृत्तीने आयुष्य घालवितो.

हे रंगेल गडी अनेक ठिकाणीं खेटरें खातच असतात. तरी त्यांची त्यांना लाज



मधुकर वनवन फिरत करी गुंजारवाला......

वाटत नाही. उलट इतर समान–जातिक मित्रांच्या मेळ्यांत अधिक खेटरें कोणीं खाल्लीं हें सांगण्याची स्पर्धा लागते. उत्तरवयांत हें शारीरिकदृष्ट्या दुर्बल झालेले पुरुष देवतार्चनांत किंवा धार्मिक ग्रंथांच्या पठनांत निमग्न झालेले दिसून येतात. ज्या पत्नीची पूर्ववयांत त्यांनी हेळसांड केलेली असते ती आता सदैव त्यांच्या सेवेंत गर्क झालेली दिसून येते.

**● बायकी पुरुष ●**

ह्या जातीचे पुरुष शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या बायकांसारखे असतात. यांत त्यांचा दोष नाही. कारण पुरुषांच्या शरीर-संपत्तींत जे ग्रंथी असावयास पाहिजेत ते ह्यांच्या अंगांत कमी प्रमाणांत असतात. असले पुरुष इतर पुरुषांशीं सख्य करण्याच्या भानगडींत न पडतां मैत्रीचा शोध बायकांत करितात. असल्या बायकी पुरुषांना मित्रांपेक्षा मैत्रिणीच अधिक असतात आणि त्यांपैकी एकादीशी त्यांचें लग्न होतें.

चिडखोरपणा, भीड, लाजाळूपणा, सहन-शक्तीचा अभाव आणि विकारवशता हे ह्या बायकी पुरुषांचे मुख्य गुण होत. असल्या पुरुषास एखादी पुरुषी बायको जोडीदार मिळाल्यास त्याचा संसार सुखाचा होतो. नाहीतर त्याचें संसाराचें गाडें उलटून पडण्याचा संभव फार ! अशा तऱ्हेचा एक तरुण माझ्या माहितींत आहे. एका वधुपित्याने आपली मुलगी पाहण्यासाठी त्याला बोलाविलें होतें. मुलगी समोर येऊन बसल्यावर त्याच्या मित्रांनी त्याची काही थट्टा केली. त्यासरशी मान वेळावून "इश्श !" असा उद्‌गार त्याने काढला. तो ऐकतांच मुलगी समोरून उठून गेली आणि आईला रागाने म्हणाली, "असल्या बायकी पुरुषांशी मी साफ लग्न करणार




आमची वधुपरीक्षा......

नाही !" वधुपित्याने दिलगिरीपूर्वक त्याला आणि त्याच्या मित्रांना निरोप दिला.

**● घरबशी जात ●**

ही पुरुषांची सहावी जात म्हणतां येईल. ह्या लोकांना घर सोडून लांब जाणें जिवावरचें संकट वाटतें. अशा एका घरबशा तरुणाला तो पुण्यास घरीं राहून नोकरी करीत असतां बिहारमध्ये डेप्युटी कमिशनरच्या जागेचा ताबा घेण्यासाठी जिल्ह्याच्या एका गांवीं जाण्याचा हुकूम मिळाला. "इतक्या लांब गेल्यावर घरच्या माणसांशी गाठी कशा पडणार ? तेथील उन्हाळा मला सहन कसा होणार ? तेथील भाषा कशी बोलतां येणार ?" वगैरे अडचणी तो ज्याच्या त्याच्या जवळ सांगूं लागला. कारकुनाच्या जागेवर काम करणाऱ्या ह्या तरुणाचा परीक्षेंत पहिला नंबर आल्याने त्याला एकदम इतकी मोठी उचल मिळत होती, पण त्याला घर सोडण्याच्या भयाने इतकें ग्रासलें होतें की, तो बिहारमध्ये जाण्यास कबूल होईना. त्याच्या बायकोने आणि मेहुण्याने त्याला नेण्यासाठी कंबर बांधली आणि बळेंच त्याला विमानांत कोंबून पाटण्याला नेलें. त्यावेळीं गंगेला पूर आलेला बघून त्याचें धाबे दणाणलें आणि उलट पावलीं विमानाचें तिकीट काढून तो मुंबईस परत आला. त्याला डेप्युटी कमिशनरच्या जागेचा राजीनामा देणें भाग पडलें आणि अद्याप तो पहिल्या जागेवर खर्डेघाशी करीत आहे.

संयुक्त कुटुंबपद्धतींत अशीं घरबशीं माणसें फार दृष्टीस पडतात. परगांवीं मोठ्या पगाराची नोकरी मिळत असली, तरी घर सोडून दुसरीकडे राहावयाचें नाही अशी वृत्ति पुष्कळ संयुक्त कुटुंबांत दिसून येते. गुजराथी किंवा तमीळ जातींपेक्षा महाराष्ट्रीयांत घरबसेपणा जास्त आढळून येतो. घरबशे लोक अतिरेकाला गेले तर संध्याकाळींसुद्धा फिरण्यास, खेळण्यास किंवा देवदर्शनास न जातां घरांतच कुटुंबी-यांच्या कोंडाळ्यांत बसून राहतात. ते बाजा-रांतून जिन्नस आणण्यास बायकोला किंवा मुलांना बाहेर धाडितात. असल्या माणसांचा "अतिपरिचयांत अवज्ञा" या सुभाषिताप्रमाणे घरांतील माणसांस कंटाळा येऊं लागतो. मला एक एल्. एल्. बी. झालेला गृहस्थ माहीत

( पान २३ वर चालू )

स्वादिष्ट मिठाईके लिये !
शर्मा स्वीट मार्ट
दत्त मंदीरके पास, मार्केट रोड, पूना २.



का. न. केळकर

# ने पो लि य न : कांहीं स्मृतिरेखा

वास्तविक या जगज्जेत्या वीराच्या आठवणी ऑगस्ट–सप्टेंबरच्या अंकांतच प्रसिद्ध व्हायला हव्या होत्या. कारण नेपोलियनचा जन्मदिवस आहे १५ ऑगस्ट १७६९. स्थलाभावास्तव या स्मृतिशलाका त्या अंकांत देतां आल्या नाहीत. परंतु आजहि या आठवणींचा ताजेपणा यत्किंचितहि कमी झालेला नाही. कारण श्री. का. न. केळकर यांनी त्यांची निवडच फार सुरेख केलेली आहे.

१

नेपोलियनला आपल्या आईबद्दल अत्यंत आदर वाटत असे. तिच्या अंगांत कर्तबगारीहि तशीच होती. नेपोलियनच्या जन्मापूर्वी, तो गर्भांत असतांना फ्रेंचांविरुद्ध चाललेल्या कॉर्सिकाचे स्वातंत्र्ययुद्धांत तिने जातीने भाग घेतला होता आणि त्यावेळीं गनिमीकाव्याने लढतांना, घोड्यावरून धावपळ करणें आणि वनवासांत दिवस कंठणें हा प्रसंग तिला नित्याचाच होता. नेपोलियनने आपल्या युद्धकलेचें उपजत ज्ञान आईकडून घेतलें असेंहि यावरून म्हणतां येण्यासारखें आहे. विशेषतः नेपोलियनचा बाप कार्लो हा अकालीं मृत्यु पावल्यावर आठ मुलांच्या संसाराचा भार तिच्या अंगावर पडून अनेक आपत्ति कोसळल्या; त्यांत तिचे जागीं दुसरी कोणतीहि स्त्री खचून गेली असती! नेपोलियनचें राज्य गेल्यावर त्याच्या सर्व नातेवाईकांनी त्याचेशी संबंध सोडला; पण आईने आपल्या मुलाबद्दलचा अभिमान सोडला नाही व मुलाकडे सेंट हेलिनास राहावयास जाण्यासहि ती तयार झाली होती! एकदा सेंट हेलनास तिचें पत्र आलें होतें तें पाहून नेपोलियनचे डोळे आईच्या ठवणीने भरून आले. सद्गदित होऊन तो म्हणाला, " माझ्यावर माझ्या आईचें इतकें अलोट प्रेम आहे की, माझ्याकरितां आपल्या अंगावरचें शेवटचें वस्त्रदेखील विकण्यास ती तयार होईल! आम्हां मुलांत जर कांही चांगले गुण आले असले तर त्याचें सारें श्रेय तिच्याकडेच दिलें पाहिजे. तिच्याइतकी श्रेष्ठ स्त्री दुसरीकडे आढळणार नाही. "

आपल्या आईला वैभवाच्या काळांत नेपोलियन कधीहि विसरला नाही. तिला स्वस्थता आणि सुख लागेल अशा ठिकाणीं राहण्याकरितां त्याने तिला एक स्वतंत्र राजवाडा बांधून दिला आणि 'राजमाता' म्हणून दरसाल बारा लाखांची नेमणूक करून दिली, पण या स्त्रीची साधेपणाची वागणूक कधी सुटली नाही आणि खर्चिक सवयीहि तिला कधी जडल्या नाहीत. सांगितलें तर आश्चर्य वाटेल, नेपोलियनच्या भव्य राज्यारोहणाला सारें जग लोटलें होतें, पण ही बाई कांही हजर राहिली नाही. तरुण वयांत अनेक आपत्तींना तोंड द्यावें लागल्या-कारणाने तिचें मन विरक्त झालें होतें. आनंदाच्या प्रसंगींदेखील तिच्या मनाची स्थिरस्ता ढळत नसे. नेमणुकींतले पुष्कळसे पैसे खर्च न करतां ती साचवीत असे. नेपोलियन पुष्कळदा तिची थट्टा करी की, " आई! तूं फार कंजूषपणाने वागतेस" तेव्हा ती म्हणे— "बाबारे! मी कशाला

बोलूं ? वेळ कधी सांगून येत नसते ! उद्या कदाचित् तुलाच माझ्याजवळ पैसा मागण्याची वेळ येईल ! वैभव आज दिसतें आहे, पण तें टिकेल तेव्हा खरं म्हणायचं ! ! "

• • •

२

नेपोलियनच्या अगदी लहानपणीं त्याच्यासाठीं वर दुधाकरतां एक दाई ठेविली होती. कामिला लॉरी. तिचं त्याच्यावर अगदी पुत्रवत् प्रेम असे. ईजिप्तच्या स्वारीहून परत येतांना एक आठवडा नेपोलियननें कॉर्सिकाला मुक्काम केला होता. त्यावेळीं ती त्याला भेटली होती. अर्थात् नेपोलियन तेव्हा तीस वर्षांचा होता. पुढे पांच-सहा वर्षांनी बादशहा म्हणून त्याला राज्याभिषेक होण्याची वेळ आली, तेव्हा त्याला पाहावें असें तिच्या मनांत फार फार येऊं लागलें ! याकरितां तिचें मन अधीर झालें, तेव्हा मुद्दाम दूरचा प्रवास करून ती पॅरीसला आली आणि आपली वर्दी तिने कशीबशी बादशहा-पर्यंत पोहोचविली. बादशहानें तिचें स्वागत केलें, समारंभांत तिला जवळ बसवून घेतलें आणि समारंभ आटोपल्यावर आपली राणी जोसेफाईन हिच्या गळ्यांतील रत्नहार काढून तिच्या गळ्यांत घातला. लहानपणच्या 'दुधाच्या धारे'ची फेड त्याने रत्नहाराने केली !

• • •

३

लहानपणीं नेपोलियनचें शिक्षण फ्रान्समधील ब्रायनच्या शाळेंत झालें. त्यावेळीं तो सारा नऊ वर्षांचा होता. या शाळेजवळून पुनः जाण्याचा योग त्याला तीस वर्षांनीं म्हणजे १८१४ सालीं आला. त्यावेळीं साऱ्या शत्रूंचें फ्रान्सविरुद्ध काहूर उठलें होतें आणि नेपोलियनचें मन अत्यंत प्रक्षुब्ध झालें होतें. नेपोलियन घोडयावरून जात असतां ब्रायनच्या मैदानांतलें एक झाड त्याच्या दृष्टीस पडलें, तेव्हा त्याकडे बोट करून तो आपल्या सहकाऱ्यांना म्हणाला, "लहानपणीं शाळेंत असतांना याच झाडाखाली बसून मीं टॅसोचा ग्रंथ वाचला होता !" मग आठवण झाली की, त्यावेळीं एक फळवाली बाई शाळेचे दारापुढे फळें विकण्याकरितां बसत असे. कोठे असेल बरें ती इतक्या वर्षांनी आता ? बाळपणच्या आठवणींनी मनांत गर्दी केल्या-मुळे त्याचें मन इतकें तल्लीन झालें की, क्षणभर युद्धाचे श्रम विसरून त्या बाईचें घर त्याने शोधून काढलें ! नेपोलियन बादशहाला बाईने यावेळीं ओळखलें नाही, पण तिला नेपोलियनने तत्काळ ओळखलें. मग सहज चौकशी केली की, "तीस वर्षांपूर्वी या शाळेजवळ तुम्ही फळें विकीत होतां. त्या शाळेंतल्या मुलांत "नेपोलियन" नांवाचा लहानगेला मुलगा होता. आठवतो का तो तुम्हांला ?"

"होय, होता खरा एक लहान मुलगा. वयाने अगदी चिरमुडा, पण त्याचा ढंग कांही न्याराच होता. डोक्यावरील केसांचीं झुलपें होतीं का त्याच्या कानावर ?"

"होय, होय, होतीं कानावर."

—नेपोलियन हसून पुढे म्हणाला, "पण बाई, तुमच्याकडून तो फळें घेई, त्याचे पैसे तो कांही देणें राहिला आहे का तुमचें ? सहज विचारतों. आठवत असलें तर सांगा."

'नाही रे बाबा !' ती बाई म्हणाली, "तो फार म्हणजे फारच चांगला मुलगा होता ! इतर सरदारांचीं मुलें माझी उधारी ठेवीत, पैसेहि बुडवीत, पण त्या मुलाने माझा एक पैसाहि कधी बुडविला नाही."

बाईच्या या शब्दांनी नेपोलियन फार संतुष्ट झाला आणि त्याने मोहोरांची एक लहानशी पिशवी तिला बक्षीस दिली !

• • •

४

नेपोलियन सोळा वर्षांचा असतांना त्याचे वडिल वारले आणि संसाराला वाईट दिवस आले. त्यालाहि नोकरींत अगदी थोडा




आम्ही....कोण म्हणून काय पुसतां ?

( पान २१ वरून )

आहे. त्याने चाळीस वर्षांत घराबाहेर पाऊल टाकलें नव्हतें. त्याला कोणत्याहि प्रकारची शारीरिक विकृति नव्हती, पण मी उभा राहून चालूं लागलों की, चक्कर येते अशी मनाची खोटी समजूत त्याने करून घेतली होती. बाहेर जाण्याची भीति बाळगणारांनी हें लक्षांत ठेवलें पाहिजे की, संकट यायचेंच तर तें बसल्या जागीं येऊं शकतें. पुण्याला महापूर आला होता, तेव्हा एका कुटुंबांतील जीं माणसें घरास चिकटून होतीं तीं डोक्यावर घर कोसळून मृत्युमुखीं पडलीं, तर बाहेरगांवीं गेलेलीं सगळीं माणसें वांचलीं.

• • •

पगार मिळे; त्यांतच काटकसर करून आईला तो कांही पैसे पाठवीत असे. तो फक्त दिवसांत एकदाच जेवी आणि कपडे आठवड्यांतून एकदाच बदली. एका पत्रांत त्याने आईला लिहिलें, 'आई, तूं माझे अद्याप वीस फ्रँक देणें आहेस!' या शब्दांत त्याच्या मनःस्थितीची जी करुण झाक उमटलेली आहे, ती मनाला स्पर्श करून गेल्याशिवाय राहत नाही. दुर्दैवाच्या वेळीं सर्व संकटें जमा व्हावींत त्याप्रमाणे त्याची नोकरीहि गेली व अक्षरशः उपासमार होऊं लागली आणि या सर्वांचा कळस म्हणजे कॉर्सिकांतील त्याच्या शत्रूंनी बोनापार्ट कुटुंबाचें राहतें घर जाळलें, म्हणून त्याची आई निराधार होऊन सर्व मुलांना घेऊन मार्सेल येथे राहावयास आली. तिचेजवळ उपजीविकेचें कोणतेंहि साधन नव्हतें. अशा स्थितींत तिचें नेपोलियनला अतिशय करुण पत्र आलें होतें. या दुर्धर परिस्थितींत नेपोलियनच्या मनांत आत्महत्या करण्याचा विचार आला होता, पण डेमासिस या नांवाचा मित्र अचानक भेटल्यामुळे तो प्रसंग कसा टळला हें नेपोलियनच्याच शब्दांत पाहण्यासारखें आहे.

"यावेळीं माझ्या खिशांत फक्त एक डॉलर शिल्लक होता व नोकरी किंवा पैसा मिळण्याची कोठूनहि आशा नव्हती. तशाच उद्विग्न मनःस्थितींत घराबाहेर पडलों व सीननदीच्या कांठाने चालूं लागलों. आत्महत्या करण्याचा प्रबळ विचार वारंवार मनांत येत होता. विचारांच्या तंद्रींत आजूबाजूस कोण आहे याचेंहि भान नव्हतें. इतक्यांत समोरून येणाऱ्या कोणातरी व्यक्तीच्या अंगावरच मी आदळलों. त्याला मीं ओळखलें नाही. त्याचा वेष अगदी सामान्य कामकऱ्यासारखा दिसत होता. त्याने मला ओळखून माझ्या गळ्यालाच मिठी मारली आणि "किती दिवसांनी रे भेटलास!" म्हणून आनंद व्यक्त केला.

"हा मनुष्य म्हणजे "डेमासिस" तोफखान्याच्या तुकडींतला माझा एक मित्र. त्याने वेषांतर केलें असल्यामुळे मीं त्याला ओळखलें नाही.

"इतके दिवस कुठे होतास?' असें मीं त्याला विचारलें.

"'मीं देशांतर केलें! या फ्रान्समध्यें माझा कुठचा निभाव लागायला? बिचारी माझी आई इथेच फ्रान्समध्ये आहे. तिला भेटण्याकरितां वेष पालटून येथे येण्याचें धाडस केलें!'

"माझ्या पाठीवर प्रेमाने थाप ठोकून तो निघूनहि जाता, पण लगेच वळून म्हणाला—'गड्या! इतका कसल्या विचारांत मग्न आहेस? तूं बोलत कां नाहीस? सीन नदींत जीव तर द्यायला आला नाहीस ना?'

"हे शब्द त्याने उच्चारतांच नेमकें अंतःकरणावर बोट ठेवावें असें मला वाटलें आणि मग कांहीहि आडपडदा न ठेवतां माझी सर्व परिस्थिति मीं त्याला निवेदन केली.

"'इतकेंच ना?' असें म्हणून कोटाच्या आंतल्या खिशांतून त्याने मोहरांची एक पिशवी काढून माझे हातांत ठेवली.

"'ही घे! यांत सहा हजार डॉलर आहेत. ही रक्कम देतांना माझी कोणतीहि गैरसोय होत नाही. हे पैसे खुशाल तूं आपल्या आईकरितां खर्च कर!'

"ही देणगी त्याचे हातून मीं कशी घेतली, याचा आजतागायत माझ्या बुद्धीला कांही केल्या उलगडा होत नाही! पण ती रक्कम हातीं पडतांच, विस्मयाने बेभान होऊन मी तडक धावत सुटलों. आईकडे तत्काळ ते पैसे रवाना केले आणि मग मला डेमासिसची आठवण झाली!

"नदीवर पुनः येऊन पाहतों तों डेमासिस तेथे नव्हता. आपण हें काय केलें, असें त्यावेळीं मला वाटलें! मग दररोज मी नदीवर जाण्याचा उपक्रम ठेवला आणि संध्याकाळ होऊन अगदी दिवस मावळेपर्यंत तेथेच बसून राहीं. पुष्कळ ठिकाणीं त्याचा शोध केला, पॅरिस शहर पालथें घातलें, पण डेमासिसचा कोठेंहि पत्ता लागला नाही!

"पुढे मी बादशहा झाल्यावरहि कित्येक दिवसपर्यंत त्याच्या कसून शोधांत होतों, पण डेमासिसचें कित्येक वर्षें मला दर्शन झालें नाही.

"अखेर माझें राज्य जाण्याची वेळ आली; त्याच्या थोडें आधी डेमासिसचा मला पत्ता लागला, म्हणजे तो भेटल्याला यावेळीं पंधरा वर्षे लोटलीं होतीं! डेमासिस हा मनाने अत्यंत सज्जन मनुष्य. त्याचे पैसे मी परत करीन या भीतीने माझ्या दृष्टीसदेखील पडण्याचें तो टाळीत असे.

"पण सुदैवाने मीं त्याला हुडकून काढलें आणि त्याच्या सहा हजार डॉलरऐवजी साठ हजार डॉलर त्याला घ्यावयाला लावले! त्याने ती रक्कम अगदी मिनतवारीने नाईलाज म्हणून घेतली, पण तरीहि मीं त्याला इतक्यावर सोडलें नाही. सरकारी बागांवर 'डायरेक्टर' म्हणून त्याची दरसाल सहा लाख डॉलर पगारावर नेमणूक केली आणि त्याच्या भावालाहि चांगली नोकरी दिली.

"जगांत योगायोग कसा असतो पाहा! दोघां मित्रांमुळे माझ्या साऱ्या आयुष्याचें भवितव्य बदलून गेलें. पैकी डेमासिसमुळे माझें मन आत्महत्येपासून परावृत्त झालें आणि सिडन फिलिफ याजमुळे इजिप्तच्या स्वारीचा नाद मला कायमचा सोडून द्यावा लागला!"

● ● ●

५

नेपोलियनचा मुक्काम बोलोनच्या छावणीजवळ असतां एका इंग्रज खलाशी कैद्याला शिपयांनी पकडून त्याजकडे आणलें. हा कैदी फ्रान्सच्या तुरुंगांतून निसटला होता आणि मिळेल त्या उपायाने इंग्लिश चॅनेल ओलांडून इंग्लंडला जावें असा त्याचा धाडसी हेतु होता. त्याने झाडांच्या कांही फांद्या एकत्र बांधून एक तराफा केला होता आणि तोच समुद्रांत लोटून देऊन कसेंतरी वल्हवत पार होण्याचा त्याचा विचार दिसला. कांही जणांना वाटलें, कदाचित् तो हेरहि असेल! कारण यावेळीं इंग्लंडवरील मोहिमेची धामधूम जोरांत सुरू होती.

त्या कैद्याकडे आणि त्याने तयार केलेल्या क्षुद्र तराफ्याकडे पाहून नेपोलियनचे मनांत आलें की, हा कैदी जिवावर उदार झालेला दिसतो! एरवी इतका अविचार करण्यास तो उद्युक्त न होता! काय बेरें असेल त्याच्या मनांत?

"भल्या मनुष्या! तुला वेड बीड तर नाही ना लागलें? या तराफ्यावर बसून तूं चॅनेल कशी काय ओलांडणार?"—नेपोलियनने विचारलें.

—"महाराज! दया करून, जर मला घटकाभर सोडीत असाल, तर याच तराफ्यावरून मी खाडी ओलांडून दाखवितों!"

—"समजलों, तुझी एखादी प्रेयसी त्या दूर किनाऱ्याला तुझी वाट पाहत असेल. एरवीं असें धाडस करायला तूं तयार न होतास!"

—"काय प्रेयसी? मुळीच नाही." तो खलाशी निर्धाराने म्हणाला, "माझ्या आईला जाऊन भेटण्याची मला तीव्र उत्कंठा लागली आहे. माझ्याशिवाय तिला या जगांत दुसरें कोणी नाही!"

हे शब्द ऐकतांच बादशहाचें अंतःकरण सद्‌गदित झालें. अशा शूर, कर्तव्यनिष्ठ मुलाची आईदेखील तशीच असामान्य असेल! नेपोलियनने त्या खलाशाला तत्काळ बंधमुक्त केलें आणि त्याच्या आईस नजर करण्याकरितां एक मोहोराची पिशवी बक्षीस दिली. आणि इंग्रज गलबताकडे त्याला सुखरूप धाडून दिलें!

● ● ●

६

१७९५ सालीं पॅरिसमधील दंगा शांत करण्याचें काम शहराचा मुख्य संरक्षण-अधिकारी या नात्याने डायरेक्टरीने नेपोलियनकडे सोपविलें होतें. तें करण्यासाठी तो शहरांत फिरत असे.

एकदा रस्त्याने जात असतां एका कोळ्याची जाडजूड लठ्ठ बायको जमावाला उद्देशून तावातावाने भाषण करीत होती. "या नखरेबाज, बढाईखोर अधिकाऱ्यांना इतकें तुम्ही कां भितां? एकीकडे गरीब लोकांना खायलाहि नसतांना मानाच्या फिती लावून हे मिरवतात आणि आपण स्वतः मात्र गलेलठ्ठ होतात." नेपोलियन हें भाषण ऐकत जवळच उभा होता. पुढे होऊन त्या बाईला तो म्हणाला, "भले स्त्रिये! एकदा माझ्याकडे पहा बरं! तूं आणि मी यांत कोण अधिक लठ्ठ आहे?" या अनपेक्षित प्रश्नाने ती बाई गोंधळून गेली व निरुत्तर झाली. रस्त्यावरचे लोकहि हसूं लागले.

● ● ●

७

नेपोलियनच्या सैन्यांतील पलटणींत एक तरुण शिपाई होता. इतर शिपाई आपणाला अधिकाराची जागा मिळावी, बढती मिळावी यासाठी कांही मेहनत किंवा अभ्यास करीत. पण हा तरुण शिपाई कांहीहि करीत नसे. मात्र दिसण्यांत तो फार सुरेख होता. विशेष म्हणजे, त्याचें शरीरसौष्ठव असें होतें की, साऱ्या पलटणींत त्याच्यासारखा मनुष्य नसेल! याकरितां तो नेहमी स्वतःच्या शरीरावरच खूष असे. एकदा तो बादशहाकडे गेला असतां, नेपोलियन कांही कामांत असल्यामुळे हा शिपाई बाहेरच्या दालनांतच बसला. दालनांत एक मोठा आरसा टांगला होता आणि इतर कोणीच त्यावेळीं तेथे नव्हतें. बराच वेळ वर्दी येईना. तेव्हा तो आरशासमोर उभा राहून शरीरसौष्ठव पाहण्यांत गर्क झाला आणि स्वतःशीच पण मोठ्याने म्हणाला, "गड्या तुला जर गणित येतें तर आज तूं जनरलच झाला असतास!"

आकस्मितपणें नेपोलियन याचवेळीं मागून आला आणि त्याच्या पाठीवर हात मारून म्हणाला, "आहेसच तूं जनरल!"

आणि खरोखरच नेपोलियनने त्याला बढतीची जागा दिली. आपल्या सैन्यांतील तरुणांना प्रोत्साहन कसें द्यावें हें त्याला उत्तम कळत असे.

● ● ●

८

एकदा नेपोलियन दोघां अधिकाऱ्यांसमवेत सैन्याच्या तळाची पाहणी करीत असतांना एक सुस्वरूप तरुणी एक पांच वर्षांचा मुलगा हाताने धरून रस्त्याने मोठमोठ्याने रडत चालली आहे असें त्याला दिसलें. त्याचें तिचेकडे लक्ष वेधलें आणि साहजिकच आपला घोडा थांबवून त्याने तिच्या दुःखाची चौकशी केली. ती स्त्री कांहीच बोलली नाही, पण त्या लहान मुलाने सांगितलें की, 'बाबाने आईला खूप मारलें म्हणून ती रडत आहे.'

"तुझा बाप कुठे राहतो?"

"जवळच लष्करांतील डेपोवर तो ग्रेनेडियर आहे."

मग नेपोलियनने त्या तरुणीला नवऱ्याचें नांव विचारलें. पण तें ती कांही केल्या सांगेना. "भले स्त्रिये! नवऱ्याने तुला मारलें म्हणून तूं इतका आक्रोश करतेस, मग मी विचारतों तर त्याचें नांव कां सांगत नाहीस? यावरून त्याच्याकडे चूक नसून तुझीच कांही चूक असेल असें दिसतें."

मग त्या तरुणीने सांगितलें, "आपला नवरा तसा गुणांनी चांगला आहे, पण त्याच्यांत एक मोठा दोष आहे. तो फार संशयी आहे." एकदा त्याचें डोकें फिरलें म्हणजे तो किती मारझोड करील त्याला सीमा नाही. पण या लहानग्याकडे पाहून त्याचे सगळे दोष मी विसरून जातें. असें म्हणून प्रेमभराने तिने त्या लहान मुलाचें चुंबन घेतलें.

हें पाहून नेपोलियनला त्या सुस्वभावी स्त्रीचें फार कौतुक वाटलें व त्याने फिरून तिच्या नवऱ्याचें नांव विचारलें. त्यावर ती म्हणाली, "तुम्ही जरी प्रत्यक्ष बादशहा असलांत तरी नवऱ्याचें नांव मी सांगणार नाही."

यावर नेपोलियनचा नाइलाज झाला व तो निघून गेला. जातांना तो आपल्या सहकाऱ्यांना इतकेंच म्हणाला, "या खेडवळ स्त्रियांच्या अंगीं आपल्या नवऱ्याबद्दल जी निष्ठा व प्रेम आढळतें तितकें पॅरिसमधील सुशिक्षित स्त्रियांत कांही आढळणार नाही."

मग एकदोन दिवसांत दुसऱ्या अधिकाऱ्यांकडून तिच्या नवऱ्याचा शोध करवून नेपोलियनने त्याला बोलावून घेतलें. तो तरुण सुमारे पंचवीस वर्षांचा व सुस्वभावी दिसला. आपण बादशहा आहोत हें मात्र नेपोलियनने त्याला समजूं दिलें नाही.

"भल्या मनुष्या! तुझ्या बायकोला काल तूं इतकें मारलेंस त्याचें कारण काय? तूं आणि ती स्त्री यांत तीच मला अधिक सुस्वभावी वाटली. असला अविचारीपणा फ्रेंच सैन्यांतील ग्रेनेडियरला कांही शोभत नाही."

यावर तो शिपाई बेपर्वाईने म्हणाला, "कमानसाहेब! बायकांचें बोलणें जर खरें मानावयाचें तर सगळें आटोपलेंच. त्यांचेकडे चूक कधी नसायचीच! या माझ्या बायकोला मीं शंभर वेळां सांगितलं असेल की, तिने दुसऱ्या कोणाशीहि बोलून उपयोगी नाही, पण ती माझ्या मित्राशी नेहेमीं बातचीत करीत असते."

"इथेच तुझी चूक आहे. इतरांशी ती नुसतें बोलली तर त्यांत इतकें काय बिघडलें? स्त्रियांचा मुळी स्वभावच बोलण्याचा आहे. नदीच्या पात्राचें पाणी परत उगमाकडे वाहायला लावणें आणि स्त्रियांनी बोलूं नका म्हणून सांगणें दोन्हीहि अशक्य आहे. दुसऱ्यांशी बोलण्यानेच त्या सदासर्वकाळ आनंदी राहतात. तिच्या हातून खरोखरच कांही चूक घडली असती तर ती कांही इतकी आनंदी दिसली नसती! खरें की नाही? लक्षांत ठेव, पुनः असें आपल्या बायकोला मारूं नकोस

आणि तशी गोष्ट माझ्या कानीं आली तर ती हकीकत मी बादशहाच्या कानीं घालीन. त्याने विचारलें तर तूं काय उत्तर देशील ?"

"बादशहाला मी सांगेन, तूं आपल्या शत्रूंची काळजी कर आणि माझ्या संसाराची काळजी माझ्यावर सोपव."

"तर मग तूं आता प्रत्यक्ष बादशहाशीच बोलत आहेस असें समज !" नेपोलियन म्हणाला.

हे शब्द ऐकतांच तो शिपाई एकदम चमकला. आणि मोठ्या अदबीने कुर्निसात करून म्हणाला, "सरकार ! तसें असेल तर बाब वेगळी आहे. आपली आज्ञा मला मानलीच पाहिजे.'

मग बादशहाने त्याला सांगितलें, "तुझी बायको खरोखरच सद्‌गुणी आहे. तिचें तुझ्यावर प्रेम आहे. मीं विचारलें असतां कांही केल्या तिने तुझें नांव सांगितलें नाही. तुझा मुलगाहि चांगला आहे. अशा सद्‌गुणी स्त्रीच्या संसाराचें चीज केलें पाहिजे ! तुझी बढती आजपासून मीं सार्जेंटच्या जागेवर केली आहे. हे शंभर फ्रँक बक्षीस घे आणि दोघे आनंदांत राहा; पण लक्षांत ठेव, जर पुन्हा तूं बायकोला मारल्याचें माझ्या कानीं आलें, तर तुझ्याहि पाठींत मला दणके घालतां येतात हें विसरूं नको !"

यानंतर कांही वर्षांनी त्याच गांवावरून जाण्याची पाळी आली असतां, त्या स्त्रीची नेपोलियनला आठवण झाली आणि तिला बोलावून, "आता नवरा तुझ्याशी कसा वागतो ? तुला मारतो की नाही ?" असें त्याने विचारलें. त्यावर त्या स्त्रीने बादशहापुढे कृतज्ञतेने गुडघे टेकले आणि डोळ्यांत आसवें आणून ती म्हणाली, "आपली गाठ पडल्यापासून आमच्या संसारांत कसलेंहि विघ्न आलें नाही. मी आज सुखी स्त्री आहें !"

"तसें असेल तर तुम्ही दोघे चिरकाल आनंदांत राहा. हेंच माझें बक्षीस."

बादशहाने त्या स्त्रीस आनंदाने निरोप दिला.

● ● ●

## ९

नेपोलियनने आपल्या मुलांकरितां सीन नदीच्या उत्तर तीरावर एक भव्य राजवाडा बांधावयाचें ठरविलें व त्याकरितां एका कुशल इंजीनियरास नकाशेहि करण्यास सांगितलें. त्या जागेवर ज्यांचीं घरें, झोपड्या वगैरे होत्या त्या सरकारांतून नुकसानभरपाई देऊन विकत घेण्यांत आल्या. फक्त एका गरीब माणसाचें एकच खोपटें तेथे आता शिल्लक होतें. त्याची किंमत सरकारी अंदाजानुसार फार तर साडेबाराशे फ्रँक असेल.

सरकारी कामाकरितां तेथील इतर घरें जात आहेत हें पाहून त्या माणसाने आपल्या घराची किंमत सांगतांनाच वाढवून दहाहजार फ्रँक सांगितली. नेपोलियनच्या कानीं ही गोष्ट गेली, तेव्हा तो म्हणाला, 'ही किंमत जास्त आहे, पण त्या गरीब मनुष्याला दुसरें निर्वाहाचें कांहीच नसेल. त्याचें घर गेल्यावर त्याने काय करायचें ? द्या त्याला दहा हजार.'

त्याप्रमाणे दहा हजार फ्रँक त्याला देऊं करतांच त्याने किंमत चढवून तीस हजार फ्रँक केली. ती जागा घ्यायची तर ही किंमत गैरवाजवी होती, पण राजवाड्याचा नकाशा त्यामुळे बदलतां येण्यासारखा नव्हता. यामुळे ही अडचण पुनः नेपोलियन बादशहाचे कानावर घालण्यांत आली. बादशहा म्हणाला, 'जर आपणाला ती जागा घेण्यावांचून गत्यंतर नाही, तर दुसरा उपाय काय? देऊन टाका तीस हजार !'

हीहि मागणी मान्य झाल्यावर तो घरमालक फारच शेफारला. "या जागेची किंमत पन्नास हजार फ्रँकपेक्षां एक पैदेखील कमी पडणार नाही" असें तो म्हणूं लागला. तेव्हा मात्र इतरांना वाटलें की, नेपोलियन त्या मनुष्याला आता कांही एक किंमत न देतां ती जागा तशीच जबरदस्तीने खालसा करील. नेपोलियन त्यावर म्हणाला, "ही जागा सोडून देऊन आपण दुसरी एखादी जागा पसंत करूं म्हणजे झालें. कायद्याबद्दल माझ्या मनांत जो आदर आहे त्याचें स्मारक म्हणून या मनुष्याचें खोपटें आहे येथे असेंच राहूं द्या."

अखेर ती जागा सोडून-देऊन नकाशे बदलण्यांत आले आणि त्या जागेशेजारीच राजवाडा बांधण्याचें काम जोरांत सुरू झालें, तेव्हा मात्र त्या लोभी माणसाला आपल्या कृतीचा पश्चात्ताप झाल्याशिवाय राहिला नाही. दुर्दैवाने ही इमारत पुरी झाली नाही. बुर्बोन राजांनी ती पाडून टाकली.

● ● ●

## १०

नेपोलियन अदृष्टवादी होता. माझें अदृष्ट मला सांभाळतें असें तो म्हणत असे. स्वतःच्या शरीररक्षणाची तो कोणतीहि काळजी घेत नसे. आपले या जगांत दिवस किती हें ठरलेलें आहे. ठरलेल्या क्षणापेक्षा मृत्यु एक क्षणदेखील अगोदर येत नाही आणि तो क्षण आला म्हणजे मृत्यु एक क्षणहि थांबत नाही; म्हणून मनुष्याने अगदी निर्भयपणाने वागावें असें तो आपल्या शिपायांना नेहमी सांगत असे. शत्रूकडील गोळ्यांचा पाऊस पडत असतांना त्याला खुशाल आडवें होऊन घोड्यावरून आपल्या सैन्याची पाहाणी करीत तो फिरत असे. १८१४ सालच्या युद्धांत त्याने भरती केलेले शिपाई म्हणजे शाळा-कॉलेजांतील पंधरा-सोळा वर्षांचीं अल्लड पोरें होतीं. आपल्या सेनापतीच्या जीवाबद्दल त्यांना चिंता वाटे. तो त्यांना हसून म्हणे, "माझ्या तरुण मित्रांनो ! ज्या गोळ्याने मला मरण यावयाचें आहे तो अद्याप जगांतील कोणत्याहि कारखान्यांत ओतला गेलेला नाही."

एकदा शत्रूकडील तोफेचा गोळा आपल्या रोखाने येतांना पाहून एक सैनिक जीव बचावण्याकरितां प्रयत्न करूं लागला. नेपोलियन त्याला म्हणाला—"तो गोळा जर तुझाच जीव घेण्याकरितां सुटला असेल, तर तूं दहा फूट खोल खड्डा खणून जरी त्यांत स्वतःला पुरून घेतलंस तरी तेथेहि येऊन तो तुझा जीव घेईल !" पण सैन्यांतलीं मुलें तरुण, अननुभवी असल्यामुळे त्यांची त्रेधा होई. एकदा शत्रूकडील तोफेचा गोळा पलटणीच्या मध्यमार्गीच येऊन पडला, तेव्हा सैनिकांची भीतीने धावपळ होऊं लागली. नेपोलियन दुरून हा प्रकार पाहत होता. चटकन् घोड्याला टाच मारून तो जवळ आला आणि त्या तापलेल्या गोळ्याला त्याने आपल्या घोड्याचें नाक लावलें ! इतक्यांत गोळा फुटून त्याचा घोडा ठार झाला, पण नेपोलियनच्या अंगाला कसलीहि जखम झाली नाही, मग त्या तरुण मुलांकडे पाहत तो हसत म्हणाला—"पाहिलेंत ! माझें अदृष्ट मला सांभाळतें."

★

( पान ८ वरून चालू )

'गंगापूर' अक्षरशः खिळखिळी झाली होती. लिंबावरची माणसें रात्रीं ९॥ वाजतां मोठया अवघड प्रयत्नांनी खाली उतरवण्यांत आलीं. भटांनी श्री. अकलूजकरांना कुशींत घेऊन फांदीला बांधलेल्या लुगडयांच्या सोलावरून घसरत सर्रकन् खाली आणलें.

श्री. भट व मोडक यांनी ही विलक्षणच करामत केली. श्री. मोडक हे जवळच्याच ( १५७ नारायण ) घराचे मालक होते. त्यांचें घर साफ नष्ट झालें. त्यांत त्यांचें अपार नुकसान झालें. सुमारे एकशे साठ तोळे सोनें गेलें! हा घरंदाज माणूस निर्वासित झाला आहे!

श्री. हिराचंद गुजराथी यांच्या कोसळलेल्या घराबरोबर आणखी एक तरुण पुरांत पडला. त्याचें नांव श्री. वि. म. दातार. हे हिराचंदांचेच बिऱ्हाडकरू होते. दातारांना पोहतां येत होतें. ते पोहत होते. वाहत येणाऱ्या वस्तूंनी त्यांना जखमा होत होत्या. अखेर श्री. दातार हे एका इमारतीला लागले. ते त्या इमारतीवर चढले. ते दमले होते. ते तेथे जरा सुटकेचा विश्वास टाकतात न टाकतात तोंच तीहि इमारत कोसळली! पुन्हा जलप्रवास ठेचा-ठोकरा खात सुरू!

दातार अखेर नारायण पेठेंतीलच एका देवळाला लागले. त्यांनी त्याचा कळस पकडला, पण तो चुन्याचा कळस एकदम ढिसूळला! पण आंतली लोखंडी कांब त्यांनी धरली. अशा स्थितींत रात्रीं ८॥ वाजतां भयाण अंधारांत दातार खाली उतरले आणि पुन्हा सुखरूप-पणें मृत्युलोकाला पाय लागल्याचं समाधान दातारांना लाभलं!

अगदी अशाच स्थितींत म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव हे अमृतेश्वराच्या शिखरावर बारा तास बसले होते! वेदवाङ्मयांत नसलेला अनुष्ठानाचा हा नवाच प्रकार त्यांनी पार पाडला!

— ७ —

माणसं परोपकारी तशा कांही इमारतीहि परोपकारी! 'नारायण १४४, पेठकर बिल्डिंग' अशीच परोपकारी. ही इमारत आहे चार मजली. ही इमारत पाहिली की, असं वाटतं, हिला फक्त उंचीच आहे! रुंदी नाहीच! म्हणजे फार अरुंद आहे ही. पण हिचं हृदय फार विशाल! तिच्या मालकीणीच्या हृदयाएवढंच! श्री. पार्वतीबाई पेठकर यांची ही इमारत. श्री. पार्वतीबाईंनी स्वतः सज्जांत उभें राहून लोकांना आंत ओढून वांचविलें. सुमारे २५० माणसांनी ह्या इमारतींत आसरा घेतला होता. इतक्या लोकांचे प्राण तिने वांचविले. पण दीडच वर्षापूर्वी, दि. २८ डिसेंबर १९५९ रोजीं श्री. पार्वतीबाईंचे पति श्री. नंजनराव हे ह्याच इमारतीवरून अपघाताने कोसळून मरण पावले!

पुलाच्या वाडीजवळची आणखी एक इमारत अशीच. रोहिणी भाटे यांच्या नृत्याच्या वर्गाची ही इमारत. अगदी लहान. भवतींचीं सर्व घरें पडलीं. ही टिकली. जवळ जवळ पन्नासांना आश्रय दिला तिने. रोहिणी भाटे यांचें व त्यांच्या विद्यार्थिनींचें नर्तननैपुण्य मुठेच्या कानावर रोज जात होतं. आज मुठेनेहि आपला नाच रोहिणीबाईंना दाखवायचं ठरवलं होतं. सतत अकरा तास मुठा बेभान नाचत होती! नाचाचा प्रकार फक्त एकच होता—थैमान नृत्य! हें नृत्य पाहून प्रेक्षक भयभीत झाले होते! रडकुंडीला आले होते!

गोवा चळवळींत एकदा मरून जिवंत परत आलेले श्री. हेमंतराव सोमण यांनी या भागांतील लोकांना अलगद सोडवून सुखरूप बाहेर काढलें. ओढ असलेल्या धोक्याच्या प्रवाहांत हेमंतराव लोकांना आधाराचा हात देत होते. त्यांना मृत्यूचं काय भय म्हणा! मरायचं प्रॅक्टीस झालेलं आहे ना!

युद्धांत शत्रुपक्षाच्या सर्वस्वावर बॉंबहल्ले केले जातात, पण हॉस्पिटलस्वर मात्र कुणी बॉंब फेकीत नाही म्हणे! पण तेवढी सहृदयता तरी मुठेला कुठे होती? दिसेल त्याचा विध्वंस करायचा एवढंच तिला कळत होतं. स्मशानें आणि संसार, तेवढयाच बळाने ती उधळीत होती. मग हॉस्पिटलस्चं तिने काय केलं? अनेक प्रसूतिगृहें व रुग्णालयें तिला गवसलीं होतीं. त्यांचं काय झालं?

शनिवारांत मथुराबाई गोगटे यांच्या प्रसूतिगृहांत पाणी शिरलं. चार बाळंतिणी आपलीं बाळं उराशी धरून बसल्या होत्या. त्यांना वांचवावयास श्री. छबूराव आगाशे, वा. ग. भिडे व मधुकरराव साठे हे तरुण धावत गेले. त्यांनी मथुराबाईंना म्हटलं की, 'तुम्ही प्रथम बाहेर पडा! आम्ही या स्त्रियांना उचलून आणतों!' त्यावर मथुराबाई म्हणाल्या, 'आधी या माझ्या बाळंतिणी बाहेर न्या! मी शेवटीं येईन!'

अन् मग गळ्याइतक्या पाण्यांतून त्या बाळंतिणींना फुलासारखं अलगद उचलून या तरुणांनी सुस्थळीं नेलं.

डॉ. मधुमालती गुणे यांची तारांबळ तर कांही विचारूं नका! त्यांना आपल्या हॉस्पिटलमधील बाळंतिणीहि सांभाळाव्या लागल्या आणि तेथे आश्रयाला आलेल्या अवतीभवतीच्या असंख्य बायकामुलांनाहि सांभाळावं लागलं.

डॉ. वाय्. व्ही. फाटकांच्या रुग्णालयांतील सर्व रुग्ण भराभरा हलविण्यांत आले. सर्वांत शेवटीं बाहेर पडल्या तेथील नर्सेस. त्यावेळीं खांद्याइतकें पाणी होतें. एका हॉस्पिटलमधील रुग्णांना बाहेर काढावयास महाराष्ट्रीय मंडळांतील रमेश दामले वगैरे तरुण गेले. दुखण्याने जर्जर झालेले रोगी उदासपणें त्यांना म्हणाले, 'कशाला आम्हांला वांचवतांय्? मरूं द्या आम्हाला! म्हणजे आम्ही ह्या दुखण्यांतून सुटूं!'

काय एकेकाचीं दुःखं असतात हीं!

आमच्यापैकी एक प्रतिनिधि श्रीकांत देशपांडे हे प्रलयाच्या धुमाकुळांतून चालले होते. एका ठिकाणीं रस्त्याच्या कडेला एक विधवा स्त्री रडत उभी होती. त्यांनी थांबून तिला विचारलें, 'काय झालं बाई? तुमचं सामान गेलं का?'

त्यावर ती विधवा म्हणाली, 'हो सर्वस्व गेलं माझं! पण आमच्या वाडयांतून बाहेर पडतांना, ज्यांनी त्यांनी आपआपल्या बायकामुलांसाठी धावपळ केली. माझ्याकडे मात्र कुणींच लक्ष दिलें नाही. मी ह्या जगांत एकटी आहे! सर्वस्व गेल्यापेक्षा याचं दुःख मला सहन होत नाही!'

लोकांची केविलवाणी दैना पाहून डोळ्यांत पाणी येत होतं. गुंडांना अन् चोरांना आनंदच झाला होता. लोकांचीं घरें उघडीं पडलेलीं पाहून भर पुरांत पोहत जाऊन किती तरी गुंडांनी लूट केली. पद्धतशीर एका एका मोहल्ल्याचा ताबा 'रक्षण करतों आहोंत!' अशा बतावणी-खाली ताब्यांत घेऊन गुंडांनीं अपरंपार कमाई केली. सरकार त्यांचा बंदोबस्त करूं शकलें नाही. कारण ह्या दिवशीं पुण्यांत सरकार फक्त नांवालाच अस्तित्वांत होतं!

पण काय आश्चर्य! पुण्यांतील एक प्रख्यात मवाली दादा या महापुरांत खरोखरच मनापासून लोकांना मदत करीत होता! त्याचा नांव पत्ता कसा सांगूं?

भांबावलेल्या निराधार बाया-बापड्यांना फसविणारे गुंडहि अर्थात होतेच. एका अशाच निराधार तरुण मुलीला मदतीचें आश्वासन देऊन गुंडांनी आपल्या जाळ्यांत पकडलें आणि अखेर तिला चार दिवसांनंतर दि. १६ जुलैला दुपारच्या ३-१० च्या एक्स्प्रेसने मुंबईला नेण्यासाठी एका टॅक्सींत बसविलें. पोलिसांनी अचानक ही टॅक्सी पकडली!

पोलीस क्वचित् क्वचित् किती चांगलीं कामें करतात.

पुरांत आणि पुरानंतर गुडांनी जनतेला अत्यंत पद्धतशीर नागवलें. आणि दुसऱ्या बाजूला हीं अशींहि चित्रें दिसलीं.

पुरांत लोकांच्या किती तरी अमोल चिजा वाहत येत-जात होत्या. अहिल्यादेवी शाळेजवळ एक पेटी वाहत आली. गुंडांची आपले-पणाची दृष्टि त्या पेटीवर गेलीच. ते धावले, पण तेवढ्यांत श्री. विष्णु भिडे व श्री. दाजी खेडकर ह्या दोघा तरुणांनी जलदीने ती पेटी पकडली व आपल्या ताब्यांत घेतली. श्री. जगताप नांवाच्या सज्जनानेहि त्यांना मदत केली. भिडे-खेडकर यांनी ती पेटी श्री. मु. शं. वैद्य यांच्या स्वाधीन केली. पेटींत चांदी-सोन्याच्या वस्तु व दागिने वगैरे सुमारे तीन हजारांचा ऐवज होता! चांदीच्या भांड्यांवर नावें होतीं, ' हरि रामचंद्र पावणसकर '.

श्री. वैद्य यांनी पत्ता धुंडून काढून पावणसकरांच्या हातीं त्यांची पेटी दिली. श्री. पावणसकरांना केवढा गोड धक्का बसला असेल!

लोकांचे प्राण वांचविण्यासाठी अन्यहि सर्व प्रकारची मदत करण्यासाठी पुण्यांतील अगणित माणसें जातीने पाण्यांत घुसलीं. त्यांत तर कित्येक स्त्रियाहि होत्या! मंगळवार बाजारांतील झोपड-पट्टींतील लोकांना वांचविणाऱ्यांत एक महिला होत्या. इंदिराबाई आढाव त्यांचं नांव. सौ. माई केदारी याहि अशाच धाडसी उद्योग करीत होत्या. एरंडवण्यापासून संगमापर्यंत, किंबहुना मुंढव्यापर्यंत विविध पक्षांचे व विविध मतांचे असंख्य कार्यकर्ते अशा अमोल पण अत्यंत बिकट कामांत गढून गेले होते. रा. स्व. संघाची यंत्रणा सर्वांत मोठी व अनुशासनबद्ध हलतांना दिसत होती. राष्ट्रसेवादल, महाराष्ट्र मंडळ, होमगार्ड्स, निरनिराळ्या तालमी व मंडळें स्वतःला पार विसरून कामें करीत होतीं. ह्या सर्वांना एकच पदवी शोभते—' मानवतेचे शिलेदार!'

— ८ —

पूर चढूं लागल्यावर सगळ्या पुण्याचें तनमन केवळ नदीतीराकडे धावत होतें. सर्व संस्था व व्यवसाय बंद पडले होते. कोणाला कांही सुचतंच नव्हतं. पाणी संभाजी पुलावर पंधरा फुटावर चढलें होतें. दुपारचा बारा वाजण्याचा सुमार होता. लोक पूरग्रस्तांच्या मदतीसाठी धावत होते. नभोवाणी-मंत्री ना. डॉ. केसकर पुण्याहून मुंबईला जाण्याच्या गडबडींत होते. नभोवाणी केंद्र इतक्या अफाट गोंधळांतहि अत्यंत व्यवस्थित चालू होतें. पाणी चढत व पसरत होतें. तें आणखी किती चढणार, याचा कांहीच अंदाज येत नव्हता. कोण सांगणार हा अंदाज? दुपारचे १२॥ वाजले. चिखलाने भरलेल्या महिला, मुलंबाळं आणि कांही ना कांही काखेंत घेऊन पाण्याचा पाठलाग चुकवीत निवाऱ्याला जात होत्या. रेडिओ केंद्रावर महिलांसाठी कार्यक्रम सुरू झाला होता.

लोक अगदी पाण्याकडे टक लावून बघत होते की, हें पाणी आता केव्हां उतरूं लागणार? देवळांवर छपरांवर व झाडांवर बसलेले जीव आशेने बघत होते. ओंकारेश्वरासमोरच्या एका झाडावर एक मांजर पाण्याकडे टुकुटुकूं बघत होतें.

थोड्या वेळानंतर पाणी उतरूं लागलें. सर्वांना हायसं वाटूं लागलं. पानशेत धरणांतील पाणी खलास झालें होतें. खडकवासल्याचें धरण मात्र अजूनहि घो घो उतं जात होतें. एवढा पानशेतच्या पाण्याचा मारा सहन करून सात तास ह्या धरणाने तग धरला होता आणि खडकवासल्यांतील धरणावरच्या अधिकाऱ्यांना याचा आनंद, कौतुक आणि अभिमान वाटत होता.

तेवढ्यांत भयंकर घात झाला! धरणाला दृष्ट लागली! एकदम प्रचंड तडा गेला! खडकवासल्याचेंहि धरण फुटलें! ऐन मध्यावरं धरणाला खिंडार पडलें! पाण्याचा लोंढा पुण्यावर चालून निघाला! मृत्यूची ही राखीव फौज!

आणि उतरत चाललेला पुण्याचा पूर पुन्हा चढूं लागला! पहिला धिंगाणा तसाच पुन्हा पुढे चालू झाला! पाणी पुन्हा कां चढूं लागलें आहे, हेंच लोकांना कळेना! यावेळीं पोलिसांची एक मोटार पुरा-लगतच्या भागांतून गर्जत गेली—' आणखी सहा ते आठ फूट पाणी चढण्याची शक्यता आहे! सावध रहा!'

लोकांची धावपळ सुरू झाली. हें पाणी कशामुळे चढत आहे हें सांगितलें जात नव्हतें!

प्रचंड खिंडारांतून पाणी इतक्या झपाट्याने वाहत गेलें की, एक तासांत खडकवासल्याचें धरण रिकामें झालें! चिखलाने भरलेल्या प्रचंड घमेल्यासारखें! त्या चिखलांत आता मोठे मोठे मासे पाण्याविना तडफडत होते. उद्यापासून पुणें शहरहि असेंच पाण्यासाठी तड-फडणार होतें!

पुराची ही दुसरी स्वारी तुफान दौडत आली आणि दोन तास थैमान घालून पुढे गेली. नंतर पाणी उतरूं लागलें. बुडलेला एकेक भाग उघडा होऊं लागला. अंधार पडूं लागला. विजेचे दिवे बंद पडले होते.

रात्र ज्येष्ठाच्या अवसेची होती. सर्व रस्त्यांवरचें पाणी गुडघ्यापर्यंत उतरायला रात्रीचे आठ वाजले.

सर्वत्र भयाण स्मशानी वातावरण पसरलें होतें. लोक एकमेकांना हाका मारीत होते. पडक्या घरांचा खच व अतोनात चिखल सर्वत्र भरला होता. अडकून पडलेले लोक रस्त्यावर उतरून धडपडत, ठेचाळत बाहेर येत होते.

श्री. चित्रावशास्त्री देवळावरून खाली उतरले. अलका टॉकीज-विठ्ठल मंदिरावरची माणसें खाली उतरलीं.. आंधळा शंकर परदेशीहि खाली उतरला, पण लोक मरामरा निवाऱ्याला निघून गेले. परदेशी एकटाच उरला! चिखलांत आणि जगांत आला तो एकटाच होता. तो अलकापासल्या बस-स्टॉपपाशी येऊन मोठमोठ्याने म्हणूं लागला,

"अहो, अहो मला दिसत नाही! मला कुणीं तरी, कुठेतरी न्या हो!"

कुठं न्यायचं! अन् कुणीं न्यायचं! अखेर कुणा एका दयावंताचा हात पुढे आला. त्याने परदेशीला लक्ष्मीरोडवरील डॉ. अभ्यंकरांच्या दवाखान्यासमोरील फूटपाथवर आणून सोडलें. फूटपाथ! केवढा मोठा निवारा! रात्रभर परदेशी तेथेच कुडकुडत होता.

ती भयंकर काळरात्र! नदी अजून तुडुंब भरून रोंरावत होती. दाट काळोख होता. कुठून तरी रडण्याचे सूर येत. कुत्र्यांचें भुंकणें ऐकूं येई. चोरांचीं पावलें पडक्या, उघड्या घराकडे वळूं लागलीं होतीं.

पुरामुळे नारायण पेठेंत अडकलेले एक एरंडवणेकर त्या भीषण काळोखांतून, उद्ध्वस्त झालेल्या लकडीपुलावरून चाचपडत, धडपडत घरीं निघाले. खाली नदी, वर ढगाळ आभाळ. ते तसेच पलीकडे गेले. कर्वे रोडवर भयंकर चिखल होता. त्यांतूनच पावलें टाकीत ते एरंडवण्याला जात होते. घरीं लहानग्या दोन मुलांचें काय झालें असेल, घर तरी जागेवर असेल का, ही चिंता उरांत सुरी फिरवीत होती. सर्वत्र सामसूम झाली होती. वारा मळाळत होता. ते अखेर घरीं पोहोचले! घर सुखरूप होतें! पत्नीने अधीरतेने दार उघडलें. त्यांचीं दोन्ही बालकें त्यांची वाट बघून बघून झोपीं गेलीं होतीं.

— ९ —

दुसरा दिवस उजाडला. दि. १३ जुलै. लोकांच्या झुंडी पहाटे-पासूनच पुराच्या भागांत जाऊं लागल्या. अन् बघतात तों काय! काळीज करपवून टाकणारीं तीं दृश्यें होतीं. भयंकर बॉम्बहल्ला व्हावा असें त्या विध्वंसाचें रूप होतें! हजारो घरें पडलीं होतीं, रस्त्यांवर खच पडला होता, जागोजाग प्रेतें पडलीं होतीं, नारायण पेठेंतील १९ नं. शाळेजवळ एका आईने आपल्या बाळाला मिठी मारून जग सोडलें होतें, विजेच्या तारेवर एक प्रेत लोंबत होतें, चिखलांत अनेक दुर्दैवी जीव मरून पडलेले होते. म्हशी, गाई अन् वासरें तर किती तरी.

पुलाच्या वाडींत घरें होतीं की नव्हतीं अशी अवस्था झाली होती. धान्यें, कपडे, पुस्तकें इतस्ततः नाश होऊन विखुरलीं होतीं. मोटारी आणि ट्रक्स उलथेपालथे होऊन चिखलांत लोळत पडले होते. नाश! केवळ सर्वनाश! काल अर्धांग पाण्याने हा भाग झाकलेला होता, तेव्हा कल्पना नव्हती की, इतकें कांही झालें असेल! पण आज हें दृश्य पाहून काळजाचें पाणी पाणी झालें! ज्यांचीं ज्यांचीं माणसें कालपासून हरवलीं होतीं ते लोक वेड्यापिशासारखे चिखल तुडवीत शोधाशोध करीत होते, तीं प्रेतें पाहून तर शोधणारांच्या काळजाचा ठाव सुटत होता, आयांच्या कंठांतून दचकन् हुंदका उठत होता आणि मग आपल्या माणसाचं प्रत्यक्ष प्रेतच दिसल्यावर—! तो हंबरडा—! चिखलांतल्या प्रेताला पडणारी—ती मिठी—!

लक्ष्मीरोडवरील फूटपाथवर रात्रभर बसलेला शंकर परदेशी उठला. आपल्या आईला शोधायला तो अलकापासल्या विठ्ठल-मंदिरांत आला आणि आई सापडली! मंदिरांतील मारुतीपुढे चिखलांत पालथी मरून पडलेली आई सापडली!

पुलाच्या वाडीतील उद्ध्वस्त ढिगाऱ्यावर अंजिनीबाई भोसले उभ्या होत्या. आपलं घर नेमकं कुठेशी असावं याचा त्या शोध घेत होत्या! त्यांचं सर्वस्व वाहून गेलं होतं. सुदैवाने त्यांची आई बचावली होती. ऑफिसला जातांना घेतलेली प्लॅस्टीकची जाळीदार पिशवी फक्त त्यांच्या-पाशी उरली होती!

संभाजी बागेतील तीं गोजीरवाणी पाखरें मरून पडलेलीं होतीं. फुलझाडें नाश पावलीं होतीं. बागेतील एक पाटी मात्र अजून दिमाखाने उभी होती. तिच्यावर लिहिलें होतें, 'फुलझाडांना कोणींहि हात लावूं नये!'

उघडे पडलेले लोक शाळांच्या, देवळांच्या व कॉलेजांच्या इमारतींत जाऊन राहिले होते. त्यांतील हजारो लोक केवळ अंगावर-च्या वस्त्रानिशी आलेले होते. अंथरायला जमीन, पांघरायला आकाश! कोर्टाच्या इमारतींतहि गोर गरिबांनी आश्रय घेतला होता. त्यांना भुका लागल्या होत्या. आम्ही गोळा केलेल्या पोळ्या-भाकऱ्या घेऊन त्यांना वांटायला गेलों. कोर्टाच्या अंगणांत थोडीशी गर्दी दिसली. कसली? दीड-दोन महिन्यांचं एक तान्हं मूल उघड्यावर हातपाय हलवीत रडत होतं. एवढ्यांत पाऊस आला. लोक पांगले. पोर भिजत राहिलें. तें पाहून कोर्टांतली एक पूरग्रस्त बाई धावत आली. तिने आपल्या अंगावरचं वहतं त्या तान्हुल्यावर घातलं आणि त्याला उचलून निवाऱ्याला नेलं. नंतर पोलिसांनी तें मूल ताब्यांत घेतलं.

स्त्रियांचीं मनें पुरुषांना कधी कळायचींच नाहीत. भरलेले संसार महापुराच्या हवालीं करून एका वस्त्रानिशी बाहेर पडतांना हजारो गृहिणींना केवढ्या मनोवेदना झाल्या असतील! पै पै साठवून हौसेने सजविलेले संसार नष्ट झाले. पण आज पहाटेपासूनच त्या आपल्या संसाराचे अवशेष शोधायला आल्या होत्या. घरांतल्या माणसांची मदत घेऊन जेवढें जेवढें शोधतां येईल तेवढें त्या शोधीत होत्या. एखादा चमचा जरी सापडला तरी त्यांना केवढा आनंद होई! तें त्यांचं संसारावरचं प्रेम पाहून असं वाटलं की, ह्या महिला नक्की हिमतीने पुन्हा संसार उभा करणार! प्रथम दुःख व उदासपणा त्यांच्या चेहऱ्यांवर व बोलण्यांत दिसत होता, पण तास-दीड तासांत त्या संसार शोधण्यांत जणू रमून गेल्या!

शनिवारांत एके ठिकाणीं एक जोडपें मातीचा ढीग उपशीत होतें. त्याच्याकडे लक्ष नसल्यासारखं दाखवीत आम्ही नदीकडे पाहत उभे होतों. हौसेने त्यांनी घेतलेल्या खूप खूप गोष्टी संसारासकट वाहून गेलेल्या अशान्यांतसें दिसत होतें. तो फार खेदावलेला भासत होता. दुःखी व निराशेच्या शब्दांत तो बोलत होता. तेव्हा ती त्याला म्हणाली, "एवढं काय वाटून घेतां? विसरून जा! लोकांचं बघा केवढालं नुकसान झालं तें! लाखांनी! त्या मानानं आपलं काय?"

त्यावर तो म्हणाला, "अग पण आपलं आपल्याला लाखासारखंच नव्हतं का?"

"हुं! एवढं काय त्यांत! मी तुम्हाला दाखवीन पुन्हा घर सजवून!"

तिचं हें उत्तर ऐकून आम्ही चमकून मागे वळून पाहिलं. ती माती उकरण्यांत गढलेलीच होती.

नवरा-बायकोचं बोलणं चोरून ऐकूं नये म्हणतात! आम्ही हळूच गुपचुपांच्या गणपतीकडे सटकलों.

आढकर वकिलांच्या मागच्या रस्त्याला ढिगारे ओलांडीत जात होतों. देशपांडे, खडे वगैरे आमच्या कांही मित्रांच्या घरांची काय हवाल आहे तें पाहण्यासाठी गेलों, सगळीं पडलीं होतीं! तो देशपांड्या सहकुटुंब सहपरिवार चिखलाने रंगला होता अन् मग आम्हीहि रंगलों, त्याला मदत करूं लागलों; माती उकरतां उकरतां मीं त्याच्या बायकोला म्हटलं, "वहिनी, अहो पोलिसांनी काल सकाळीं लाऊडस्पीकरवरून तुम्हाला इशारा दिला होता ना? मग तुम्ही ताबडतोब कां नाही मोलाचं सामान हलवलंत?"

"कर्मांचा इशारा मेल्यांचा! इशारा देत होते कीं सार्वजनिक सत्यनारायणाचं निमंत्रण देत होते कुणास ठाऊक!"

अन् वहिनींचं पुढचं वाङ्मय भयंकर होतं! माती मात्र झपाट्याने उकरली जात होती!

ठिकठिकाणीं मोठ्या कष्टाने बायकापोरांनी ढिगारे उकरून शक्य तेवढें सामान काढलें होतें. गुंड आणि मुठाबाई यांच्या तडाख्यांतून वांचलेली मौल्यवान चीजवस्तूहि शोधून काढली होती. अनेकानी सामान उकरून वर काढून ठेवलेलें होतें. अन् तेवढ्यांत सर्वत्र एकच कल्लोळ उठला! 'पाणी आलें! पाणी आलें! पळा.'

कालच्या बेसावधपणांत आलेल्या प्रलयाने लोक इतके हादरले होते की, हा कल्लोळ ऐकल्याबरोबर अवघ्या पेठांतील लोक जीव वांचविण्यासाठी सर्वस्व सोडून सैरावैरा पळत सुटले! म्हातारे, बायका-पोरें, लंगडे-पांगळे सगळे! अत्यंत अत्यंत हृदयद्रावक चित्र होतें तें. त्यांना कोणीहि वाली उरला नव्हता. खडकवासल्याचें धरण कालच फूटून सर्व पाणी कालच वाहून गेलें आहे आणि आता पुन्हा पूर येणार नाही, हें त्यांना अजूनपर्यंत माहीतच नव्हतें! आणि मग लोकांनी कष्टाने उकरून ठेवलेली चीजवस्तु गुंडांनी यथेच्छ लुटली! अफवा विरल्यावर लोकांनी परत येऊन पाहिलं. जागेवर काय शिल्लक होतं? रिकाम्या हातांनी तीं बायकांमुळें परत गेलीं! तक्रार करायला जागा नव्हती.

'नारायण ३४' मध्ये लक्ष्मणशास्त्री सप्रे नांवाचे भिक्षुक राहत होते. घर कोसळलें! त्यांनीहि अशीच आपली चीजवस्तु उकरून काढली. स्वतःचें बारा तोळ्याचें किडुकमिडुक व बहिणीचे बरेचसे सोन्याचे दागिने असलेली पेटी मातींतून त्यांनी मिळविली. खूप आनंद झाला. मग इतरहि सामान शोधलें. कांही मिळालें. श्री. सप्रे हातगाडीवाल्याला घेऊन आले. सामान भरून निघाले आणि रस्त्यांत तो भयंकर गदारोळ उठला! 'पाणी, पाणी आलें! पळा!' भयंकर धावाधाव उडाली. चेंदाचेंद! आणि त्या पानपतांत सप्रे यांचें गवसलेलें सर्वस्व गेलें! उरला फक्त हाताला लागलेला चिखल!

—आणि दुपारीं रेडिओवरून आकाशवाणी झाली की, 'आज (म्हणजे दि. १३ ला!) खडकवासल्याचें धरण फुटलें!' ही बातमी ऐकून मा. यशवंतराव चव्हाणहि चकित झाले म्हणे! काल एकदा फुटलेलें धरण आज पुन्हा कसें फुटलें?

मुठा आता अगदी साळसूदपणें वाहत होती.

— १० —

मुठेचा पूर ओसरला होता आणि पुण्यांत माणुसकीचा महापूर लोटला होता. पुरांतील दुर्दैवी लोकांना महाराष्ट्रांतील कोटी कोटी जनता मदतीचे लोंढे सोडीत होती. पुण्यांतील सुरक्षित भागांतील जनतेने पूरग्रस्तांना परकें मानलेंच नाही. जवळ जवळ साठ हजार लोकांना पुण्यांतील मध्यमवर्गीयांनी आपल्या घरांत आणि वाडवाटींत सामावून घेतलं. सुमारे तीस हजार लोक मदतकेंद्रांत आश्रयास गेले.

घरें टिकलीं, पण घरांतील सर्वस्व गेलें असेहि असंख्य पूरग्रस्त होते. घरांत कांही म्हणतां कांहीहि उरलेलं नव्हतं. कुणाकडे मागायला जायला वा कुणीं आणून दिलं तरीहि तें घ्यायला हीं माणसें तयार होत नव्हतीं. एका कार्यकर्त्या समाजसेवक तरुणाच्या डायरींतील हें पाहा एक पान, "....त्यानंतर आम्ही मुरमुरे, ब्रेडस्, खजूर वगैरे वांटण्यासाठी निघालों. आज मी ज्या भागांत वांटत होतों, त्या भागांतील बरेचजण सुशिक्षित व घरंदाज घराण्यांतील होते. अशा लोकांना असली मदत देण्याचें कार्य मला कसेंतरीच वाटूं लागलें. हे लोक उपाशी राहतील, पण प्रतिष्ठा जाऊं देणार नाहीत, याबद्दल मला खात्री होती, पण त्यांना गुपचूप मदत देणें मला इष्ट वाटलें. मी त्यांच्या घरीं जाऊन रिकामें भांडें मागत असें. प्रथम ते नकोच म्हणत. 'नातलगांकडे जेवायला जाणार आहोंत' असें सांगत. 'आपण आमच्याकडून मदत घेतली हें आम्ही कोणासहि सांगणार नाही! शिवाय, ही मदत नसून हा शेजारधर्म आहे!' असें म्हटलें म्हणजे मग कुणी कुणी घेत."

श्रीमंत सरदार आण्णासाहेब रायरीकर हे तर पूजा करतां करतां सोवळ्याने घर सोडून आले होते. सर्वच गेलं त्यांचं! त्यांच्याकडे त्यांचे कुणी इष्टमित्र गेले. त्यांनी भीत भीत, संकोचत, खिशांतून दोन-एकशे रुपयांचें पुडकें काढून श्रीमंतांच्या पुढे ठेवलें आणि म्हटलें,

" आण्णासाहेब, कर्तव्य म्हणून आम्ही ही फुलाची पाकळी आपल्याला देत आहोंत. कृपा करून स्वीकारा ! "

त्यावर नम्रतेने आण्णासाहेब म्हणाले, " नको ! तुमचें प्रेम हेंच माझें धन आहे. सर्व कांही त्यांत मला मिळालें आहे. आता हें वेगळें धन मला नको. घेऊन जा परत. रागाऊं नका ! "

पण ते इष्टमित्र अतिशय आग्रह करूं लागले. ऐकेचनात. अखेर आण्णासाहेब म्हणाले, " ठीक आहे. घेतों मी ! तिथे देवापुढे ठेवा हे पैसे ! "

देवापुढे पैसे ठेवून ते इष्टमित्र गेले. नंतर कांही वेळकाळ गेला आणि एक पूरग्रस्त आण्णासाहेबांकडे आला. आपली कहाणी त्याने त्यांच्यापुढे सांगितली. त्याचें दुःख आण्णासाहेबांनी ऐकलें. ते उठले. देवापुढचे पैसे त्यांनी उचलले आणि त्या पूरग्रस्ताच्या हातावर ठेवले !

ह्या महापुराच्या लाटा आणि मानवतेचे अश्रु यांचा हिशेब कागदावर अचूक मांडणें अशक्य आहे. वाईजवळच्या पांचवड गांवचा गायकवाड नांवाचा वृद्ध शेतकरी एक टोपलीभर भाकरी घेऊन पुण्याला आला. संभाजी पुलापाशी तो आला. तेथें लष्करी इंजीनियर्स पुलाचं काम करीत होते. तो त्यांना म्हणाला, " साहेब, म्या भाकऱ्या आणल्याती ! कुठ नेऊन देऊं ? समद्यांना आता भुका लागल्या असतील ! "

एका सिंधी भगिनीने नातलगासाठी तयार केलेला बाळंतविडा जसाच्या तसा पूरग्रस्त बालकांच्या मदतीसाठी देऊन टाकला. हा सारा माणुसकीचा गहिंवर !

या काळांत माणसांनी माणुसकी दाखविली आणि अनेक व्यापाऱ्यांनी काळाबाजार दाखविला, पण असंख्य व्यापारी असेहि होते की, ज्यांनी पूरग्रस्तांना अपार मदतहि केली. किंचितहि भाववाढ न करणारे व्यापारीहि खूप होते.

टांगे-रिक्षा-टॅक्सीवाल्यांनी लोकांना चांगलेंच अडवून धरलें, पण कांहींनी आपलीं वाहनें लोकांच्या मदतीकरितां फुकट दिलीं. उदाहरणार्थ, श्री. आप्पा अनपट ( BYW 2175 ) आणि श्री. दत्तोपंत आपटे ( BYL 6444 ).तसेच ट्रकमालकांनी आर्. टी. ओ. श्री. मोरे यांच्या स्वाधीन आपल्या तीस ट्रक्स् निःशुल्क मदतीस दिल्या. शिवाय वर दीड हजार रुपये दिले !

सर्व प्रकारची मदत येत आहे. सर्व प्रकारचें नुकसान पुन्हा भरून काढतां येईल, पण विद्येचें झालेलें अफाट नुकसान कसें भरून निघणार ? वीस वीस वर्षांचें संशोधन वाहून गेलें ! श्री. आबा चांदोरकरांचेंहि संशोधन असेंच गेलें. पण ते म्हणाले, ' मी पुन्हा सर्व उभें करीन ! आबांचें वय सध्या फक्त ऐंशी वर्षांचें आहे !

लोक नेटाने साफसुफी करीत आहेत. कुजलेल्या धान्याची सर्वत्र घाण सुटलेली आहे, पण लोकांना त्याचीहि पर्वा वाटत नाही. त्यांना त्रास होत आहे फक्त रिकामटेकड्या बघे लोकांचा ! उद्ध्वस्त झालेल्या संसारांची ' गम्मत ' बघण्यासाठी ह्या बघ्यांच्या झुंडी फिरत आहेत. काम करणारांना ह्या बघ्यांचा भारी राग येत आहे. अनेक श्रीमंत बघे तर आपल्या मोटारींतून मजा बघत हिंडत आहेत. रस्त्यावर घाण येत आहे. नाकाला रुमाल लावीत बघे हिंडतच आहेत. अन् पूरग्रस्तांनी ठिकाठिकाणीं काय लिहून ठेवलं आहे बघा ! ३७१ शनिवार मुकुंद स्टोअर्सच्या दारावर पुढील सूचना लिहिलेली आहे— ' बघे लोकांनो, बघतां काय ? कामाला लागा ! हें प्रेक्षणिय स्थळ नव्हे ! ' भोसेकर किर्तनकारांच्या घरापुढे पुढील पाटी झळकते आहे. 'हा संभाजी पार्क नव्हे ! मागे फिरा ! नाकाला रुमाल लावून हिंडतां काय ? नाकाला रुमाल लावण्यापेक्षा त्या रुमालाचा उपयोग आमचे अश्रू पुसण्यासाठी करा ! '

अतिप्रचंड नुकसान झालेल्या इंटर नॅशनलच्या दीक्षितांनीहि धैर्याने व निश्चयाने पुन्हा आपला उद्योग सुरू केला आहे आणि लहानसान शिंप्या-वाण्यांनीहि जेवढी जागा धड मिळेल तेवढीच साफसूफ करून सडारांगोळी घालून धंदा सुरू केला आहे. एकाने तर आपल्या दुकानावर पाटीच लावली आहे–' पुनश्च हरिः ओम् ! '

पुरांत सापडलेल्यांचीं हृदयविदारक दुःखें पाहून प्रत्येकाने आसवें ढाळलीं. मा. यशवंतराव चव्हाण हे स्वतः त्या गुडघाभर चिखलांतून फिरले. शनवारवाड्याच्या फुटक्या बुरुजाजवळ ते आले. लोक भराभरा भवताली गोळा झाले. अतिशय मायेचं माणूस दुःखांत भेटलं की, हृदयाचे बांध फुटतात. नकळत अचानक स्तब्धता झाली आणि लोकांना हुंदका आला. यशवंतरावांनी मोठ्या प्रयत्नपूर्वक रोखून धरलेला बंधारा ढासळला. यशवंतरावांच्या डोळ्यांतून पाणी खळाळलें.

एवढ्यांत एक प्रौढ बाई गर्दीतून दोन पावलें पुढें सरकत म्हणाली, " अरे तुम्ही पुरुष माणसेंच अशीं डोळ्यांतून पाणी काढूं लागलांत तर कसं व्हायचं ? "

महापुराचा आम्हाला केवढा फायदा झाला. किती तरी गोष्टी आम्ही शिकलों. अनेक अवघड गोष्टी आम्हाला जमतात असं दिसून आलं. आता पूर ओसरून गेला आहे. उधळलेल्या संसारांची जुळवणी सुरू आहे. मुंगीच्या श्रमाने आणि घोरपडीच्या चिकाटीने, जीवनाच्या विविध क्षेत्रांत राबून आमचें गेलेलें वैभव दुपटीने परत मिळविण्याची महत्त्वाकांक्षा आता हवी आहे. आमची ही नव्या जीवनाची दिंडी त्या महत्त्वाकांक्षेची पताका घेऊन निघालीच आहे. सहकार्याचे टाळमृदंग घुमवीत ! एका तालांत ! एका सुरांत !

पण आता पानशेतच्या धरणाचें काय ?

पानशेतच्या धरणासाठी ज्या मावळी शेतकऱ्यांनी सुखाचा त्याग करून भजन करीत करीत, आपली जन्मभूमि सोडली व त्याच्या मोबदल्यांत दौंडजवळच्या दुष्काळी मुलखांत जाऊन संसार मांडले, त्या शेतकऱ्यांचें काय ? ते मावळे पानशेतच्या कालव्याची आतुरतेने वाट पाहत बसलेले असतील नाही ? मायभूमीवरच्या त्या पाण्याने ही दुष्काळी भूमि शिंपून निघेल आणि आपण त्यावर धान्यवैरणीचें समृद्ध सुखी गोकुळ सजवूं अशी त्यांची गोड आशा, आकांक्षा असेल—असणारच ! आहेच !

पण पानशेतधरणाचा नाश झाला आहे. त्याच्या २७०० फूट लांबीपैकी ११०० फुटाचें बांधकाम नष्ट झालें आहे ! फक्त १६०० फूट उरलें आहे !

नव्हे नव्हे ! धरण सोळाशे फूट बांधून पूर्ण झालें आहे ! आता फक्त अकराशेच फूट बांधावयाचें उरलें आहे ! फक्त अकराशे ! पानशेतधरण निम्याच्या वर बांधून तयार आहे ! आता प्रश्न असा विचारावयास हवा की, पानशेतधरण पूर्ण झाल्यानंतर पुढें काय ?

गेल्या दिवाळीपूर्वी प्रा. ज. ब. कुमठेकर हे आपल्या कांही मित्रांसह पानशेतला गेले होते. त्यावेळीं धरण अपूर्णच होतें. एका उंच टेकाडावर उभे राहून पानशेतचे इंजीनियर श्री. भालेराव यांनी सर्व माहिती सांगून त्यांना धरणाचें बांधकाम दाखविलें. सर्वांच्या डोळ्यापुढे अतिरम्य चित्र तरळत होतें. प्रा. कुमठेकरांनी श्री. भालेराव यांना हाच महत्वाचा प्रश्न विचारला,—"हें पानशेतधरण पूर्ण झाल्यावर पुढें काय ?"

श्री. भालेराव लगेच म्हणाले,

"पुढे ? पुढें वरसगांवचें धरण ! ती डोंगरांत खिंड पाडलेली दिसते ना, तेथून तिकडे जाण्याचा रस्तासुद्धा झाला आहे. आमची ही एक दिंडी आहे. गंगापूरहून ती घोडला गेली. घोडहून इथे आली. इथून वरसगांवला. तिथून पुढे कुठे जावं लागेल तिथे ती जाईल. प्रत्येक ठिकाणीं दिंडींत नवीन नवीन वारकरी सामील होताहेत. जुन्यांची तल्लीनता वाढते आहे. सुबत्तेच्या पंढरीच्या या वारींत सहभागी होतां येत आहे, हें आमचं भाग्य आहे ! "

समाप्त


★ पांढरे डाग ★

अनुभवप्रसिद्ध गुणकारी औषधें.

अनेक बक्षिसें व हजारो अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात.
औषधाची किं. ६ रु., पो. ख. १ रु. माहिती मागवा.

मोफत पाठवूं

नकली वैद्यांपासून सावध राहावें.

वैद्य—बी. आर. बोरकर,
आयुर्वेद भुवन,
मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)

व्ही. जोशी ॲण्ड को.

ब्लॉक मेकर्स

ॲंड

आर्ट प्रिंटर्स

शनिपार नजीक, शेवडे बोळ,
पुणें २.

लक्ष्मी लिथो वर्क्स

लिथोग्रॉफी व प्रिंटिंगचीं कामें

सर्वोत्कृष्ट व नियमितपणें केलीं जातात.

त्याचप्रमाणे

● निवडणुकीचीं पोस्टर्स, ● वर्णमाला, ● नकाशे, ● हँडबिल्स
उर्दू पुस्तकें व सर्व भाषेतील छपाईसाठी अग्रेसर

पत्ता—आर. एन. कुंजीर
३२० शनिवार पेठ, पुणें २

★ वि. आ. बुवा

★ अ. वा. वर्टी

★

या सिद्धहस्त लेखकांचें विनोदी साहित्य, 'माणूस'च्या दिवाळी अंकांत आहेच.

पण याला व्यंगचित्रांची जोड मिळाली तर काय बहार उडेल !

यासाठी 'माणूस' दिवाळी अंकासाठी व्यंगचित्रकथांची स्पर्धा जाहीर करीत आहे.

'पुण्याच्या पूरग्रस्त सासऱ्यानें आपल्या जावयाचा पहिलावहिला दिवाळसण कसा साजरा केला' ही मध्यवर्ति कल्पना.

चित्रसंख्या ५ ते १० च्या दरम्यान.

चित्रें पाठविण्याचा शेवटचा दिवस १० ऑक्टोबर १९६१.

★

एकूण शंभर रुपयांचीं पारितोषिकें

# ❀ प्रभात ❀

• •

चित्रपटसृष्टींत ' प्रभात ' हें एक महशूर नांव आहे.

एकाहून एक सरस चित्रपटांची मालिकाच या कंपनीने दहा–पंधरा वर्षांत प्रेक्षकांसमोर ठेवली होती.

' प्रभात ' च्या अभूतपूर्व यशामागील प्रेरणा कोणत्या ? नवमहाराष्ट्राने या कंपनीच्या उदयास्ता-पासून काय बोध घ्यावा ?

# ❀ माणूस ❀

पुढील महिन्यांत प्रसिद्ध होणाऱ्या दिवाळी अंकांत या विषयावर एक परिसंवाद आयोजित करण्यांत आलेला आहे.

## यांत भाग घेणारे कांही कलावंत

* एस्. फत्तेलाल
* गजानन जागिरदार
* केशवराव भोळे
* बाबुराव पेंढारकर
* शाहु मोडक

आणि

* शांता आपटे

संपादक - मुद्रक - प्रकाशक : श्री. ग. माजगांवकर ● प्रकाशन-स्थळ : राजहंस प्रकाशन, १०१५ सदाशिव, पुणें २.
मुद्रण-स्थळ : साधना प्रेस, ४३०–३१ शनवार, पुणें २.